



# हाकारा

वर्ष : चोविसावे • अंक पहिला–दुसरा

जानेवारी–जून २००३









## पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प

## राज्य अहवाल : मध्यप्रदेश

# ▪ महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद ▪

## ❖ कार्यकारी मंडळ ❖

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | प्रा. रा. के. मुटाटकर |
| उपाध्यक्ष | : | डॉ. विजय भानू |
| सचिव | : | डॉ. सुधाकर मोराणकर |
| सह सचिव | : | पुरूषोत्तम आगाशे |
| खजिनदार | : | जयवंत मंत्री |
| सभासद | : | ॲड. पद्माकर वळवी (आमदार) |
| | : | डॉ. मिलिंद बोकील |
| | : | सुधीर जोग |
| | : | ग. शां. पंडित |
| | : | आरती कौलगेकर |
| | : | सुमेध गुर्जर |

सर रतन टाटा ट्रस्ट, मुंबई
आणि
नॅशनल कौन्सिल ऑफ अॅप्लाईड इकॉनॉमिक रिसर्च, नवी दिल्ली

# पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प

## राज्य अहवाल

# मध्य प्रदेश

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध, पुणे ४११ ००७

वर्ष २००२

# ❖ संशोधन गट ❖

| | | |
|---|---|---|
| प्रमुख मार्गदर्शक | : | प्रा. रा. के. मुटाटकर |
| संशोधन समन्वयक | : | पुरूषोत्तम आगाशे |
| माहिती विश्लेषण | : | नीळकंठ कान्हेरे |
| संशोधन सहाय्यक | : | |

## धार जिल्हा

| | |
|---|---|
| **(अ) सरदारपूर तालुका** | कौशल गुप्ता |
| | विष्णु पडियाल |
| **(ब) मनावर तालुका** | अजय मुवेल |
| | मोहन वास्केल |

## इंदोर जिल्हा

| | |
|---|---|
| **(अ) देपालपूर तालुका** | राजेश जोशी |
| | दुर्गेश कुमरवाल |
| **(ब) इंदोर तालुका** | पुष्पेंद्रकुमार पांडे |
| | रणवीरसिंग चौहान |

## छत्रपूर जिल्हा

| | |
|---|---|
| **(अ) नौगाव तालुका** | श्री. पी. एन. शर्मा |
| | चंद्रप्रकाश अहिरवार |
| **(ब) गौरीहार तालुका** | रमेश अहिरवार |
| | चंद्रप्रकाश अहिरवार |

## पन्ना जिल्हा

| | |
|---|---|
| **(अ) गुनौर तालुका** | मनोजकुमार त्रिपाठी |
| **(ब) शाहनगर तालुका** | कमोद प्रसाद अहिरवार |

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता!
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक

वर्ष चोविसावे : अंक पहिला-दुसरा

# हाकारा

जानेवारी-जून २००३

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| संपादकीय | | ७ |
| Editorial | | ९ |
| Basic Rural Infrastructure Project | | ११ |
| Summary findings | | १५ |
| प्रस्तावना | | २२ |
| पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प | | २४ |
| मध्यप्रदेश : अभ्यास निष्कर्षांचा संक्षिप्त आढावा | | २६ |
| संक्षिप्त जिल्हा ओळख | : धार | ३३ |
| | : इंदोर | ३४ |
| | : छत्रपूर | ३४ |
| | : पन्ना | ३५ |
| सर्वेक्षित गावे | | ३७ |
| संशोधन पद्धती | | ४४ |
| अभ्यास करताना आलेल्या अडचणी | | ४६ |
| क्षेत्रकार्य निरीक्षणे | | ४७ |
| मध्यप्रदेश पाहणीचे निष्कर्ष | | ५६ |
| | : रस्ते आणि वाहतूक क्षेत्र | ६० |
| | : दूरसंचार क्षेत्र | ७३ |
| | : विद्युत क्षेत्र | ८३ |
| | : पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता क्षेत्र | ९८ |
| | : क्षेत्र सुधारणा प्राधान्यता | ११३ |
| समारोप | | ११७ |

**पत्रव्यवहाराचा पत्ता**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११००७
दूरध्वनी - ५८८४१५०

**मूल्य रू. ५०/-**

**संपादक**
रामचंद्र मुटाटकर

**कार्यकारी संपादक**
लेखन, छायाचित्रे ,मांडणी
पुरूषोत्तम आगाशे

**प्रकाशन**
रा. के. मुटाटकर
अध्यक्ष, महाराष्ट्र मानव विज्ञान
परिषद यांच्यासाठी
ज्ञान प्रबोधिनी मुद्रण विभाग,
५१०, सदाशिव पेठ, पुणे - ३०
येथे छापून प्रसिद्ध केले.

या अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी किंवा मतांशी संपादक व संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

# तक्त्यांची क्रमवारी


| तक्ता क्र. | तपशील | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | जिल्हावार सर्वेक्षण केलेली लोकसंख्या | ५६ |
| २. | गावाची सरासरी लोकसंख्या | ५७ |
| ३. | अनुसूचित जातीची सर्वेक्षित गावातील लोकसंख्या | ५८ |
| ४. | अनुसूचित जमातींची सर्वेक्षित गावातील लोकसंख्या | ५८ |
| ५. | गावातील सरासरी घरसंख्या आणि स्थलांतर | ५९ |
| ६. | राज्य व राष्ट्रीय महामार्गापासून गावाचे सरासरी अंतर | ६० |
| ७. | गावातून ये - जा करणारे दैनंदिन प्रवासी | ६१ |
| ८. | सरासरी किमान व कमाल प्रवास खर्च | ६२ |
| ९. | सरासरी किमान व कमाल मालवाहतूक खर्च | ६२ |
| १०. | प्रवास वाहतुकीची साधने | ६३ |
| ११. | गावातील अंतर्गत रस्त्यांचा दर्जा | ६५ |
| १२. | अंतर्गत रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती | ६६ |
| १३. | गावाला जोडणाऱ्या बाह्य रस्त्यांचा दर्जा | ६७ |
| १४. | गावाला जोडणाऱ्या रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती | ६८ |
| १५. | रस्त्यांच्या अवस्थेची कारणे | ६९ |
| १६. | गावातील रस्ता सुधारणेसाठी उपाययोजना | ७१ |
| १७. | गावातील सार्वजनिक दूरध्वनी उपलब्धता | ७३ |
| १८. | खाजगी दूरध्वनींची उपलब्धता | ७४ |
| १९. | दूरध्वनी सेवेचा वापर | ७५ |
| २०. | संभाषणासाठी लागणारे सरासरी मूल्य | ७६ |
| २१. | मोबाईल दूरध्वनी बद्दलची माहिती | ७७ |
| २२. | इंटरनेटबद्दलची माहिती | ७८ |
| २३. | दूरध्वनी सेवेच्या सद्यस्थितीची कारणे | ७९ |
| २४. | दूरध्वनी सेवा सुधारण्यासाठी उपाययोजना | ८१ |
| २५. | घरगुती वीजजोड टक्केवारी | ८३ |
| २६. | गावातील किरकोळ धंद्यासाठी वीज वापर | ८४ |
| २७. | उद्योगासाठी विजेचा वापर | ८५ |
| २८. | विजेवर चालणाऱ्या घरगुती उपकरणांचा वापर | ८६ |
| २९. | विजेच्या मागणीची पूर्तता | ८७ |

| तक्ता क्र. | तपशील | पान क्रमांक |
|---|---|---|
| ३०. | दर दिवसाची विजेची उपलब्धता | ८८ |
| ३१. | आठवड्यातील विजेची उपलब्धता | ८८ |
| ३२. | पावसाळ्यात विजेची उपलब्धता | ८९ |
| ३३. | वीज देयकाची रक्कम | ९० |
| ३४. | नविन वीजजोड घेण्यासाठी लाच | ९१ |
| ३५. | वीजजोड : लाचेची रक्कम | ९२ |
| ३६. | वीज पुरवठा अनियमिततेची कारणे | ९३ |
| ३७. | सुरळीत वीज पुरवठ्यासाठी उपाययोजना | ९६ |
| ३८. | पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत | ९८ |
| ३९. | एकूण व चालू हातपंप | ९९ |
| ४०. | नळ पाणीपुरवठा योजना | १०० |
| ४१. | पाण्याच्या स्त्रोताचे गावापासूनचे अंतर | १०२ |
| ४२. | उन्हाळ्यात पाणी खरेदी | १०२ |
| ४३. | ग्रामपंचायतीला द्यावी लागणारी पाणीपट्टी | १०३ |
| ४४. | पिण्याच्या पाण्याच्या सोयीबद्दल समाधान | १०४ |
| ४५. | गावातील अंतर्गत रस्त्याच्या बाजूची गटारे | १०५ |
| ४६. | घरातील सांडपाण्याच्या निचऱ्याची व्यवस्था | १०६ |
| ४७. | एकूण संडास व त्यांचा वापर | १०७ |
| ४८. | संडास बांधकामास अर्थसहाय्य | १०८ |
| ४९. | मलनिःसारणाची सोय | १०९ |
| ५०. | पावसाळ्यातील मुख्य समस्या | ११० |
| ५१. | पाण्याची समस्या सोडवण्यासाठी उपाय योजना | १११ |
| ५२. | गावातील चार क्षेत्रांच्या सुधारणेसाठीचा प्राधान्यक्रम | |
| | (अ) पहिली प्राधान्यता | ११३ |
| | (ब) दुसरी प्राधान्यता | ११४ |
| | (क) तिसरी प्राधान्यता | ११५ |
| | (ड) चौथी प्राधान्यता | ११६ |

# ❖ ऋणनिर्देश ❖

पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्पांतर्गत मध्यप्रदेशमधील धार, इंदोर, छत्रपूर व पन्ना या चार जिल्ह्यातील १८५ गावांमधून माहिती गोळा करण्यात आली. सर्व गावातील लोकांनी खरीप हंगामातील शेतीची कामे चालू असताना वेळात वेळ काढून पायाभूत सोयीसुविधांविषयी संशोधन गटाबरोबर चर्चा केली, सद्यपरिस्थिती, समस्या याविषयी माहिती दिली. या लोकांच्या सहकार्याशिवाय असा अभ्यास करणे केवळ अशक्य होते. या सर्वांचे आभार मानणे हे आम्ही आमचे आद्य कर्तव्य समजतो. सर्वांचे शतशः आभार.

नॅशनल कौन्सिल ऑफ अॅप्लाईड इकॉनॉमिक रिसर्च. (एन.सी.ए.ई.आर.) नवी दिल्ली या संस्थेने मध्यप्रदेश व महाराष्ट्र राज्यातील अभ्यासाची जबाबदारी महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेवर अतिशय विश्वासपूर्वक सोपवली. एन.सी.ए.ई.आर. या संस्थेच्या संचालकांनी अभ्यास प्रकल्पाच्या बैठकांमध्ये सहभागी होऊन सर्व राज्यातील संशोधन गटांना वेळोवेळी मार्गदर्शन केले, प्रोत्साहन दिले, प्रकल्प सल्लागार डॉ. ज्योत्स्ना बापट यांनी सतत चर्चा करून, अडीअडचणींमध्ये दिशा दाखवून संशोधन गटाचा उत्साह वाढवला, आम्ही त्याबद्दल अत्यंत ऋणी आहोत. त्याचबरोबर एन.सी.ए.ई.आर. संस्थेचे संशोधक, कर्मचारी वर्ग व अन्य राज्यातील संशोधन गट यांनी दिलेले बहुमूल्य सहाय्य देखील विसरता येणार नाही.

मध्यप्रदेशमध्ये क्षेत्रकार्य करत असताना धार जिल्ह्यात श्री. लक्ष्मीनारायण गर्ग, डॉ. मोरे, इंदोर जिल्ह्यात डॉ. शिरिष नांदेडकर, डॉ. जोशी, छत्रपूर व पन्ना जिल्ह्यातील मुख्य वैद्यकीय अधिकारी, तालुका वैद्यकीय अधिकारी तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील अधिकारी, व कर्मचारी यांनी अत्यंत आपुलकीने जी मदत केली त्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत ऋणी आहोत. प्रत्यक्ष गावांमधून क्षेत्रकार्य करताना स्थानिक संशोधन सहाय्यकांनी हिरीरीने भाग घेऊन अभ्यास पूर्ण करण्यात मोलाचा वाटा उचलला आहे. त्यांच्या कामाचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे.

पर्यायी उपाययोजनांचा अभ्यास करण्यासाठी अनेक लोक व संस्थांनी माहिती उपलब्ध करून दिली, चर्चा केली अशा सर्वांचे आभार मानणे हे आमचे कर्तव्यच आहे.

अभ्यास प्रकल्पाला ज्यांनी ज्यांनी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे हातभार लावला अशा सर्व व्यक्ती व संस्थांचे मनःपूर्वक आभार.

**पुरूषोत्तम आगाशे**
-संशोधन समन्वयक

# ❖ संपादकीय ❖

ब्रिटिश राजवटीच्या जोखडातून भारताची १९४७ साली मुक्तता झाली. त्यानंतर भारताने सार्वभौम प्रजासत्ताक म्हणून आपली वाटचाल सुरू केली. देशाचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून पंचवार्षिक योजनांचा कालबद्ध कार्यक्रम आखण्यात येऊन त्याप्रमाणे वाटचाल सुरू झाली. आतापर्यंत एकूण नऊ पंचवार्षिक योजना पूर्ण झाल्या आहेत. या योजनांचा आढावा घेतला असता असे लक्षात येते की गेल्या पन्नास - पंचावन्न वर्षांमध्ये आपण अनेक क्षेत्रांमध्ये भरीव कामगिरी केली आहे. विज्ञान तंत्रज्ञान, व्यापार, औद्योगिक विकास तसेच आरोग्य व शिक्षण यासारख्या सामाजिक क्षेत्रांमध्ये अनेक महत्त्वाचे टप्पे आपण गाठले. या कामगिरीमुळेच जागतिक पातळीवर झपाट्याने प्रगती करणारा विकसनशील देश अशी भारताची प्रतिमा तयार झाली आहे.

विकास प्रक्रियेचा परिपाक म्हणून शहरे व औद्योगिक केंद्रांचा झपाट्याने विकास होऊ लागला. नवनविन रोजगारांच्या संधी उपलब्ध होऊ लागल्या. मागासलेल्या ग्रामीण भागातून उदरनिर्वाहासाठी स्थलांतर करणाऱ्या लोकांची संख्या वाढली. नगरांची शहरे व व शहरांची महानगरे बनली. तेथील जनतेच्या गरजा पुरवण्यासाठी, अधिकाधिक सोयी निर्माण करण्यासाठी विकासाची प्रक्रिया शहरी केंद्राभोवतीच एकवटू लागली. ग्रामीण भागाच्या विकासाकडे दुर्लक्ष होऊ लागले. अशा प्रकारे शहरी भाग व ग्रामीण भाग यामध्ये विकासाची मोठी दरी निर्माण झाली व दिवसेंदिवस ती वाढतच चालली आहे. शिक्षण, आरोग्य यासारख्या सामाजिक क्षेत्रातील ग्रामीण भागाची परिस्थिती फारशी उत्साहजनक नाही. एकविसाव्या शतकात देखील साथीचे आजार, कुपोषण, भूक यामुळे बळी जाणाऱ्यांची संख्या मोठी आहे. रस्ते, वीज, दूरध्वनी, पिण्याचे पाणी यासारख्या पायाभूत सोयीसुविधा ग्रामीण भागातून पूर्णपणे विकसित झालेल्या दिसत नाहीत आणि जेथे जेथे विकास झाला आहे तो केवळ काही विशिष्ट विभाग अथवा विशिष्ट जातीवर्गापर्यंतच पोहोचू शकला आहे. मागास वर्गीय जनता विकास प्रक्रियेपासून वंचितच राहिलेली दिसते. ग्रामीण भारताचे हे चित्र तसे निराशाजनकच आहे.

नवी दिल्लीच्या नॅशनल कौन्सिल ऑफ ॲप्लाईड इकॉनॉमिक रिसर्च (एन.सी.ए.ई.आर.) या संस्थेने देशाच्या ग्रामीण भागातील पायाभूत सोयीसुविधांचा अभ्यास करण्यासाठी एक राष्ट्रव्यापी प्रकल्प हाती घेतला होता. या अभ्यास प्रकल्पामध्ये १० राज्यातील सुमारे ११०० गावातून रस्ते व वाहतूक, दूरसंचार, विद्युत, पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता या चार क्षेत्रांसंबंधी माहिती गोळा करण्यात आली. या माहितीवरून ग्रामीण भागातील पायाभूत सोयीसुविधा किती प्रमाणात विकसित झाल्या आहेत, सद्यस्थिती काय आहे व अजून कुठवर मजल गाठायची आहे याची कल्पना येते.

एन.सी.ए.ई.आर. ने या देशव्यापी प्रकल्पासाठी माहिती गोळा करण्याचे काम निरनिराळ्या राज्यातील मानवशास्त्र तज्ज्ञ वा संस्थांवर सोपवले होते. महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेवर महाराष्ट्राबरोबरच मध्यप्रदेश राज्याची जबाबदारी देण्यात आली होती.

हाकाराच्या या जोडअंकामधून वर्ष २००१ मध्ये करण्यात आलेल्या मध्यप्रदेशातील अभ्यासाचे निष्कर्ष मांडण्यात आले आहेत. मध्यप्रदेशमधील धार, इंदोर, छत्रपूर पन्ना या चार जिल्ह्यातील १८५ गावातून पायाभूत सोयीसुविधांचा अभ्यास करण्यात आला. धार जिल्ह्यात आदिवासींचे प्राबल्य आहे तर छत्रपूर व पन्ना जिल्ह्यात अनुसूचित जाती मोठ्या प्रमाणात आढळतात. विकास प्रक्रियेत हे तिन्ही जिल्हे मागे पडल्याचे दिसते. इंदोर हा मध्यप्रदेशमधील एक विकसित जिल्हा म्हणून ओळखला जातो. पायाभूत सोयीसुविधांच्या विकासाबाबत मध्यप्रदेश हे तसे मागासलेलेच राज्य राहिले आहे हे या अभ्यासातून दिसून येते. पायाभूत सोयीसुविधा केवळ काही गावातूनच व त्या गावातही उच्चवर्णीय लोकांच्या वस्तीपर्यंतच पोहोचले आहेत. आदिवासी व हरिजन वस्ती विकास प्रक्रियेपासून वंचित राहिलेले दिसतात. भ्रष्टाचाराच्या भस्मासूरामुळे विकास प्रक्रियेत मोठा अडथळा निर्माण झाला आहे.

ग्रामीण भागात पायाभूत सोयीसुविधांचा प्राधान्य तत्त्वावर विकास होणे गरजेचे आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील कृषीक्षेत्राच्या विकासाला चालना मिळून लोकांचे जीवनमान उंचावू शकेल. तसे न झाल्यास ग्रामीण भागातून मोठ्या संख्येने लोकांचे लोंढे शहरात येतील, शहरी भागातल्या नागरी सुविधांवर प्रचंड ताण येऊन ती व्यवस्था कोलमडून पडेल व देशाची आर्थिक घडी विस्कटून जाईल.

शहरी - ग्रामीण, गरीब - श्रीमंत अशी दरी कमी करण्यासाठी संशोधक नियोजनकर्ते, लोकप्रतिनिधी व प्रशासनाने एकत्रितपणे प्रयत्न केले, भ्रष्टाचारावर मात केली तरच मागास भागांचा विकास होऊ शकेल. त्यासाठी कल्पकतेने कार्यक्रमाची आखणी करून सुयोग्य पद्धतीने अंमलबजावणी झाली पाहिजे. अन्यथा मागास ग्रामीण भागाचा विकास हे केवळ मृगजळच ठरेल.

हाकाराचा हा जोडअंक अभ्यासक, सामान्य वाचक, कार्यकर्ते यांना आवडेल अशी आशा आहे. या अभ्यासासंदर्भातील आपली मते जरूर कळवावीत, स्वागतच होईल.

**- पुरूषोत्तम आगाशे**

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने या नियतकालिकास अंशतः अनुदान दिले असले तरी नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

# ❖ Editorial ❖

India was freed from the British rule in the year 1947. It became Sovereign Republic State and started efforts for comprehensive development. Five year plans formed backbone of this effort. Till date nine five year plans have been completed and we have achieved many goals. Progress made in the field of Science &Technology, Trade & Commerce, Industries, social sectors like Health & Education is remarkable. It has consolidated India's position as fastest developing nation in the world.

As a result of the development, towns got transformed into cities and cities into metropolis. Heavy migration took place from the rural to urban areas. To cater to the needs of the growing population, most of the resources were allocated to these urban centres, ignoring rural areas. It has led to the asymmetrical development of urban and rural area.

Benefits of green and white revolution have reached only in certain pockets of the rural India and benefited certain castes and communities only. Other areas and communities have not gained from the agriculture advancement. We have entered twenty first century but still the scenario in rural India is very disappointing. Deaths due to hunger, malnutrition, communicable diseases are a regular phenomenon in interior areas in almost all the States. Backward rural areas and disprivileged groups are far away from the process of development.

There exists big gap between urban and rural areas and also within the rural areas.

National Council of Applied Economic Research ( NCAER ), New Delhi undertook a nationwide research project to study basic rural infrastructure. Under this project information from 1100 villages across 10 States about four major sectors viz. - Roads & Transportation, Telecommunication, Electricity and Drinking Water &

Sanitation was collected. Aim of the project was to find out the progress made in the field of basic rural infrastructure.

Experts and Organisations from the field of Anthropology from different States were involved in studies for the research project. The Maharashtra Association of Anthropological Sciences (MAAS) was entrusted with the responsibility for the State of Maharashtra as well as for Madhya Pradesh.

In this special issue of Hakara, research findings from the State of Madhya Pradesh have been presented. The data was collected from 185 villages in Dhar, Indore, Chhatarpur and Panna districts. The data shows that, in Madhya Pradesh, development of basic rural infrastructure is very poor for all the four sectors, inefficiency and corruption being the major hurdles in the process of development.

There is utmost need to give priority for development of overall basic rural infrastructure in general and settlements of backward and marginalised communities in particular. It will boost agriculture development and will improve the quality of life of the rural people.

**- Purushottam S. Agashe**

❑❑❑

# ❖ Basic Rural Infrastructure Project ❖

## Introduction

Even though 70% of the country's population is living in rural area undue attention has been paid to the development of urban and industrial centres. Basic rural infrastructure which is a prerequisite for development remains one of the most neglected area and needs immediate attention.

Roads are the lifelines of the villages. Good roads and transportation facilitates the development. Good roads leads to the increased mobility, which in turn leads to increase in transportation facilities and also opportunities for villagers to engage in gainful activities. Good roads also facilitate marketting of agriculture produce. Today, in almost all the states rural roads are in sorry condition.

Regular electricity supply could change the rural life in big way. Electricity could run tubewells for irrigation, could be used for modern agriculture equipment's. It will also assist in building cold storage infrastructure in rural areas. Electricity is also prerequisite for running of rural water supply schemes. As the gap between production and demand is increasing very rapidly rural areas are the worst sufferers of frequent power cuts.

Telephone is no more a luxurious gadget in the era of Information Technology. In rural areas telephone is an handy tool to send messages in emergency. It saves time, money and manpower. However till date, most of the telecom services have been developed in urban and semi urban areas. In rural areas spread of public and private telephones is very limited and having a good working telephone is a distant dream.

Safe drinking water is the basic need of human life. How ever there are many villages in India where people do not even get safe drinking water supply for whole year. During summer women spend major part of their time in water collection, it also affects their health. Morbidity and mortality due to impure drinking water is also the regular phenomenon for interior villages in rural areas during monsoon as well as in summer. Several man days and valuable lives are lost due to spread of water borne communicable diseases. In India, most of the villages are devoid of

latrines and waste water disposal system.

During last 54 years Central and State Governments have spent billions of rupees on rural basic infrastructure - roads, electricity, telephones, drinking water & sanitation. Many international funding agencies have also funded infrastructure projects. What has happened to that money? Does the benefits have reached to the Indian villages? If yes, what changes have been brought out in villages ? If not, what are the main hurdles? What do the common man think about the basic infrastructure? How does the villages are coping with situation? What needs to be done to improve the situation? Are there any alternatives to develop infrastructure? What is the process and what are the costs involved in the alternative solution? Can that alternative be replicated elsewhere in the country?

To answer above questions and find out the solution to the problem NCAER undertook a nationwide research project on basic rural infrastructure.

**The Project**

Sir Ratan Tata Trust (SRTT), Mumbai funded NCAER to undertake the research project on rural infrastructure in India, mainly focussing on issues related to physical infrastructure. The four main sectors covered in this project were - Rural roads & transportation, Power, Telecommunication and Drinking Water and Sanitation.

The data about the rural infrastructure was collected in phased manner to get the complete picture of rural India.

1. Primary Data collection
2. Case studies
3. Secondary data collection

**1. Primary Data collection :-** Data about four sectors viz. Rural roads & transportation, Power, Telecom and Drinking Water and Sanitation was collected from ten major Indian States. In each State two districts were selected on the basis of the socio-economic indicators. Considering the large geographical area, 4 districts were covered each from Madhya Pradesh and Uttar Pradesh. From among the selected districts, two taluks each were selected using the same criteria. And from each taluk, infrastructure data from 20-25 villages was collected. The selection of the

villages was carried out at the field level. Villages along the longest road from taluk headquarter to taluk boundary were selected as per the sample design. Schedule was used to collect data from the villages. Primary data has given first hand information about the four sectors from rural India.

**2. Case Studies:** Two case studies from each sector were also carried out from every State from which primary data has been collected. Case studies highlighted the alternative solutions used by the people to overcome the problem. Economics, feasibility, replicability of the alternatives was also looked into. Case studies have shown us the efforts made by the people and also guides us to adopt new ways for improving rural infrastructure.

**3. Secondary data:** Secondary data from all the states was collected for the period of last 5 years ( i.e. 1995-2000 ). The data was collected to find out the official targets and achievements, financial outlays and expenditure for the four sectors. However in most of the States data was poorly maintained it was difficult to get the required data from the concerned departments. Secondary data has given the idea about the targets achieved by the State governments and backlog of development.

As part of this all India project, The Maharashtra Association of Anthropological Sciences was entrusted with the responsibility of primary data collection from Maharashtra and Madhya Pradesh and secondary data from Maharashtra, Madhya Pradesh, Gujarat and Rajasthan. Case studies were also carried out in these four states.

In this issue of Hakara, summary findings of primary data from Madhya Pradesh has been discussed.

**Methodology :**

Research Coordinator from MAAS went to the study area in the selected districts. Considering local situation, language barrier and other factors two investigators were hired in each taluk for data collection. In Madhya Pradesh, health care personnel were working in the

Primary Health Centres at taluk place, were found most suitable for data collection as they had good knowledge about the field villages. Hence they were hired for the study. Selected investigators were given rigorous training about the data collection schedule. Since it was an All India study, data collection schedule was printed in English, it was translated into local language / dialect. Each question was discussed and explained to the investigators. Investigators wrote down questions in local dialect in the sample schedule given to them.

Longest route in the taluk from headquarter place was selected in consultation with local key informants. Local jeep was hired for the study. On first day, tour was made on the selected route, mapping all the villages, distances and approximate population. From among the mapped villages, study villages were selected, as per the criteria laid down by the NCAER.

Selected villages were visited. Meeting was called at the common place in village like Chaupal or village temple. Village Sarpanch, Grampanchayat members, teachers and other dignitaries in the village were invited for the meeting. Introduction of the research team was given and purpose of the visit was explained to the villagers.

Questions were asked to the villagers in local dialect. One investigator asked questions while other recorded the answers. Where ever necessary questions were explained to the villagers in details. To ensure the quality of data, the Research Coordinator checked filled schedules regularly.

Either before or after the village meeting transect walk was made through the village. Observations about quality of internal road, public telephones, non metered electricity connections, drinking water source, sanitation & hygiene etc. were recorded. The facilities available in main village as well as Harijan and Adivasi settlements were also observed and noted down.

Field data thus collected was entered into the computer as per the NCAER format and was analysed in Excel package.

❑❑❑

# ❖ Summary Findings ❖

As part of this nationwide project, field work for the state of Madhya Pradesh was undertaken by MAAS ( The Maharashtra Association of Anthropological Sciences ), Pune. The summary findings of the research study are as follows:

## Population

In Madhya Pradesh, 185 villages were covered from the four districts viz. Dhar, Indore Chhatarpur and Panna. The total population coverage was 2,30,142. The average population density for surveyed districts in MP was 1,244 individuals per village.

Out of the total population covered 21.9% belonged to Scheduled Caste ( SC ). Chhatarpur ( 38% ) and Panna ( 22% ) districts had the largest SC population. 16.3% population belonged to Scheduled Tribe ( ST ) category with Dhar district having 50% population.

The average no. of individuals outmigrating from MP villages was just 4 individuals per village. The out migration was mainly from Chhatarpur and Panna district as these districts lacked industries, people migrated out to the industrial towns in Delhi, Haryana and Uttar Praddesh. There they worked as unskilled labourers.

### Roads & Transportation Sector

In Madhya Pradesh, on an average State highway was 9.3 kms away from the surveyed village while the distance of National highway was 37.5 kms.

On average, 26 commuters were traveling daily to and from the village to earn their livelihood. Daily commuters include teachers, health workers and other government staff, factory workers, milkmen etc.

In MP, mostly private buses ply along the village routes. State Transport buses only ply between major town places, cities. In some districts, jeeps and tempos ferry from taluk place to nearby villages. Private buses, jeeps and tempos are allowed to carry passengers by taking permit from the transport authorities. The state average for minimum and maximum transportation

cost per kilometer paid by the passenger is almost same.( Rs. 0.58 and Rs. 0.59 respectively ). People also walk on foot and use bicycle for transportation.

Goods are transported mainly by tractors or tempos or by truck to the nearest market. For transportation of goods the minimum and maximum cost per kilometer per quintal was Rs. 1.33/- and Rs. 1.76/- respectively

**Internal roads :** Internal roads in the villages are supposed to be maintained by Grampanchayat. But in actual practice, internal roads are hardly repaired or maintained due to lack of funds. The quality of internal roads as reported by the villagers could be summerised as follows :- Kachha road of bad quality ( 58% ), internal road of very bad quality ( 10% ), quality of internal roads satisfactory ( 38% ). The internal roads in villages of good quality were reported from very few villages - Kachha good quality road ( 2 % ) and Pakka good quality road ( 3% )

**External roads :** Public Works Department ( PWD ) of the State government repairs and maintains the external roads. In all the surveyed districts the quality of external roads is very bad. The state of external roads as told by the villagers is as follows :- Kachha road with bad quality ( 76% ), Pakka road with bad quality ( 7% ), very bad quality road i.e. difficulty even in walking on the road - ( 10% ). Only 6% villages expressed that quality of external roads is satisfactory and only 5% said that external roads are of good quality i.e. mettled surface with no potholes.

**Reasons :** The reasons for bad quality roads in Madhya Pradesh are:- Ignorance by the government ( 49% ), lack of funds ( 47% ), corruption ( 42 % ), people are not involved ( 8% ), diversion of funds ( 8% ), no road maintenance ( 3% ), encroachment ( 3% ), and poor work quality ( 2% ).

In villages where internal and external roads were good the reasons given by the villagers are - good political support, availability of funds, no corruption by - contractors, Grampanchayat and PWD.

**Solution for good roads :** For preparing good internal and external roads villages have given many suggestions. Most of the roads in Madhya Pradesh ( internal as well as external ) are kachha. So in all the districts people have suggested to make the funds available to Grampanchayat and PWD. The second most important suggestion made by villages is that the people should be

involved in the road construction process. A committee of villagers should be formed to monitor the work. All villagers should be given detailed information about the road construction work - length of road, budget details, material specifications etc.

The summary of suggestions made by the villages for good internal and external roads is as follows:- Funds be made available ( 52% ), Peoples involvement ( 37% ) Removal of corruption ( 25% ), proper supervision by government ( 15% ), good maintenance ( 12% ).

In MP, people mostly travel on foot. Use of private bus is 62%. Motorcycle are used only in 10% villages so also bullock carts. Use of Jeeps and tempos for travelling is very low - just 5%.

## Telecommunication Sector

In Madhya Pradesh 50% villages have public telephones. Thus availability of Public telephone per village is (0.51 ). The availability of private telephones is much lower than that of public telephones. Private telephones were available in only 30 % villages with an average of 2.9 telephones per village. On an average there were 33 individuals per village who use the telephone once in a week. The average cost of outgoing local call for three minutes was Rs. 2.60/- per call.

People in 67% villages do not know anything about cellular phones, in 27% village about 5-10 people had some knowledge about it, and in 4% villages people had heard name only.

In most of the villages, people had no knowledge ( 88% ) about the internet technology. In only 12% villages it was found that some persons have knowledge.

In the telecom sector, picture for Madhya Pradesh is as follows :- Since many of the villages do not have public or private telephones, the answer for present state of telephone services was don't know ( 43% ). The other reasons given by the villagers for non-functioning telephones were - Ignorance by the telecom department 40%, don't attend complaints 13%, corruption 10%, no maintenance. In only 6% villages it was reported that telephones are in good working condition because telephone authorities work properly.

For Madhya Pradesh the suggestions for improving telecom services could be summerised as follows : Since, in most of the villages public or private telephones were not present, in 59% villages people demanded to install telephone in Grampanchayat so that everybody in village will have access to it. 12% villages demanded improvement in telecom services, while 12% also demanded for underground cables, 11% villages suggested good supervision on staff by the authority and 7% villages demanded for removal of corruption to improve the situation.

## Electricity Sector

In Madhya Pradesh about 67% rural households are with electricity, out of which 41% are metered connections and 26% non metered connections. 33% households in villages use chimneys and lanterns for lighting their houses.

On an average the business electric connections per village ranged between 1.6 connections to 1.9 connections with the state average of 1.7 connections per village.

Except Indore district there was hardly any industrial activity using electricity in villages. In Indore district there were only 2 industries that were run on electricity.

The average electricity available in rural areas was 8.6 hours per day and electricity was available for 3.5 days in a week. During monsoon months ( 90 days ) availability was only for 38.6 days. Thus in rural areas of Madhya Pradesh, there is acute shortage of electricity. Situation becomes worse during winter. During Rabbi season, electricity demand for irrigation increases due to water pumps on tube wells, but the supply remains same. People complained that during winter they hardly get electricity for 4 hours in a day. Some farmers use diesel generators for drawing water from tube wells. People are ready to pay bills even at higher rates but are demanding uninterrupted power supply for stipulated hours especially during winter.

In 60% villages it was reported that villagers have to pay bribe to the linesmen for getting new electrical connection. On an average villagers pay Rs. 225/- as bribe.

The domestic gadgets that are widely used in the villages are Fan ( 86% ), Television ( 76% ) tape recorders (41%)

There were only 2 industries in the surveyed MP villages that too in Indore district. And out of that,only one industry was making use of diesel generator to meet the electricity demand.

In 89% villages, people don't do anything to overcome electricity shortage . In only 7 villages (4%) people said that some families in village use rechargeable batteries or lights.

For Madhya Pradesh, reasons for electricity shortage are as follows :- less production of electricity ( 51% ), ignorance by SEB ( 35% ), corruption ( 26% ), asymmetrical distribution of electricity in urban and rural area ( 17% ), theft of electricity ( 15% ), no proper maintenance ( 10% ), non payment of electricity bills ( 4% ), more connections than available capacity ( 3% )

In all the districts, suggestion has been made to increase the electricity production for improving the power supply ( 60% ). Corruption in MPSEB has been reported from all the districts. Suggestion has been made to remove the corruption ( 30% ). The other measures suggested are - proper supervision by the authorities ( 24% ), theft of electricity be stopped (22% ), distribution of electricity be improved ( 16% ) - by taking measures like installing sub station, new powerful transformers etc. Regular supply of electricity and maintenance of machinery and equipment ( 5%), recovery of bills from customers ( 4% ), use of alternative sources like solar energy ( 2% ).

## Drinking water & Sanitation Sector

Tube wells are present in all the villages. The percentage of dug wells is ( 65% ). Piped stand posts were reported in 21% villages while 15% villages had piped house connection. In most of the villages water sources are within the village only.

Out of the total tube wells 76% are in working condition.Only 28% villages have water schemes. Out of these schemes, 17% have been constructed from Grampanchayat funds, 3% from assistance by central government, and 2% ( 4 villages ) by the state government. In 3%

villages water schemes have been constructed from people's contribution.

On an average villagers travel 1.3 Km. to fetch water. Bullock cart or cycles are used to carry the water in 23% villages especially during summer.

People in about 5% villages purchase water during summer. The cost of water ranged from 5 paise per liter to 30 paise per liter. On an average, the cost of 100 liter water in Madhya Pradesh was Rs. 9.10/-

Since water schemes are present in very few villages, water tax is collected from very few villages. The average amount of water tax paid to Grampanchayat in MP villages was Rs. 25.30/- per year.

In MP, only 31% villages are satisfied with the existing provision of drinking water services, 69% are unhappy about it. Thus drinking water is one of the major area where satisfaction of villagers is very low and many inputs are needed to satisfy the basic need of the people.

In 80% villages, there were no nullahs along the internal roads. In 13% villages nullahs existed partly ( i.e. about 40-50% of the total internal roads ). And in about 8% villages, nullahs were present in whole village.

In Madhya Pradesh, 80% villages had no waste water disposal system in the villages. In only 11% villages soak pits were present, that too partly. In 9% of the villages gutter system is present. Waste water disposal in kitchen garden is negligible.

Latrines have been constructed in 60% villages while 40% villages still don't have access to latrines. On an average 12 latrines per village have been constructed. Out of the total latrines constructed, 79% are in working condition. and on an average 1 latrine is shared by 92 individuals.

Out of the total latrines, 51% latrines have been constructed from people's contribution, by Janpad Panchayat in 7% villages and in 5% villages Grampanchayat and people both have contributed for latrine construction.

In Madhya Pradesh solid waste from latrines is mostly discharged in septic tank. Only 2 villages - one each from Chhatarpur and Panna district have reported to have dug hole latrines.

Problems during monsoon could be summerised in the following way - muddy roads ( 76% ), mosquitoes ( 59% ), inconvenience due to non availability of latrines ( 44% ), impure drinking water ( 21% ), poor sanitation and hygiene ( 5% )

In Madhya Pradesh, 40% villages have demanded tap water schemes, 24% villages have asked for water storage tank. 24% villages have also demanded new dug wells / bore wells. 14% villages have asked for hand pumps on tube wells. The other suggestions are - electric motor on wells ( 5% ), increasing depth of existing wells ( 5% ) and good ( uninterrupted ) electric supply for water pumps ( 1% )

## Priority

The priorities among four sectors differed from village to village and from district to district depending on the availability. However for Madhya Pradesh the priorities among the four sectors could be generalized in following way :-

1. **Electricity**
2. **Roads**
3. **Drinking water and sanitation**
4. **Telephones.**

❑❑❑

# ❖ प्रस्तावना ❖

स्वातंत्र्यानंतरच्या ५०-५५ वर्षामध्ये देशाने आर्थिक व सामाजिक क्षेत्र विकासात मोठी प्रगती केली आहे. मात्र हा विकास असंतुलितपणे झाला असल्याचे दिसते. ७०% जनता ग्रामीण भागात रहात असली तरी त्याप्रमाणात विकास कार्यक्रमांसाठी तेथे अर्थ गुंतवणूक होताना दिसत नाही. त्यामुळेच ग्रामीण जनतेला आजही स्थानिक विकासाचे प्रश्न मार्गी लागावेत म्हणून झगडावे लागत आहे. आरोग्य व शिक्षण या सामाजिक क्षेत्रातील सुविधा आता गावापर्यंत पोहोचल्या आहेत मात्र त्यांचा दर्जा फारसा समाधानकारक नाही. रस्ते व वाहतूक, दूरसंचार, विद्युत तसेच पिण्याचे पाणि व सार्वजनिक स्वच्छता यासारख्या पायाभूत सोयीसुविधा देखील सर्व खेडेगावांपर्यंत पोहोचल्या आहेत असे म्हणता येणार नाही. ग्रामीण पायाभूत सोयीसुविधांच्या क्षेत्रात अजून खूप दूरवरची मजल गाठायची आहे.

चांगला पक्का डांबरी रस्ता ही गावाची जीवनरेखाच असते. बाह्य जगताशी जलदगतीने संपर्क साधण्यासाठी अशा रस्त्यांचा उपयोग होतो, गावातील लोकांना निरनिराळ्या व्यवसायांची संधी उपलब्ध होते. शेतामध्ये तयार झालेला नाशवंत माल बाजारपेठेत पोहोचवण्यासाठी पक्के रस्ते सहाय्यभूत ठरतात. लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी, सर्वांगीण विकासासाठी रस्ते विकास हा महत्त्वाचा घटक आहे. रस्ते बांधणी व देखभाल दुरूस्ती ही राज्य सरकारची जबाबदारी आहे. आज सर्वच राज्यातील ग्रामीण भागातील रस्ते समाधानकारक दर्जाचे नाहीत.

हरित क्रांतीमध्ये धान्योत्पादन वाढवण्यासाठी सिंचनाने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. आजही अनेक राज्यातील शेतकरी कृषीपंप वापरताना दिसतात. चांगले पीक येण्यासाठी कृषीपंपांना नियमित व योग्य दाबाने वीजपुरवठा होणे आवश्यक आहे. शेतीसाठी वापरल्या जाणाऱ्या अन्य यांत्रिक साधनांसाठी, शीतगृहात शेतीउत्पादने साठवून ठेवण्यासाठी विजेची आवश्यकता असते. गावातील घरांना नळाद्वारे पाणी पुरवण्याचे काम विजेशिवाय होऊच शकत नाही. अशा प्रकारे ग्रामीण भागाच्या विकासात वीज हा एक महत्त्वाचा घटक बनत आहे. आजचे चित्र असे आहे की, विजेची मागणी व उत्पादन यातील फरक वाढत असल्याने ग्रामीण भागाला कमी प्रमाणात वीज उपलब्ध होत आहे. ग्रामीण जनता अनियमित व बेभरवशाच्या वीज पुरवठ्यामुळे त्रस्त झाल्याचे सर्व राज्यातून पहायला मिळते.

दूरध्वनीची उपलब्धता आता गरजेची झाली आहे. ग्रामीण भागही याला अपवाद नाही. दूरध्वनीचा प्रसार ग्रामीण भागात झाल्यास पैसा, वेळ व मनुष्यबळ या सर्वांची बचत होऊ शकेल. संगणक व इंटरनेटच्या माध्यमाद्वारे ग्रामीण भागातील प्रशासन गतिशील करता येईल. सध्या मात्र दूरसंचार सोयीसुविधा मुख्यत्वे शहरी व उपनगरी क्षेत्रातच आढळतात. ग्रामीण भारतात सार्वजनिक वा खाजगी दूरध्वनी अत्यंत मर्यादित प्रमाणातच उपलब्ध आहेत व तेथेदेखील सेवांमध्ये अनियमितता असल्याचे बघायला मिळते.

आरोग्यदायी जीवन जगण्यासाठी स्वच्छ पिण्याचे पाणी हा एक आवश्यक घटक आहे. देशाच्या अनेक गावातून बारा महिने स्वच्छ पिण्याचे पाणी मिळू शकत नाही. उन्हाळ्यामध्ये पाणी आणण्यासाठी स्त्रियांना वणवण फिरावे लागते. अशुद्ध पाण्यामुळे होणारे आजार व मृत्यु ही तर जवळजवळ सर्वच राज्यातील नित्याची बाब आहे. त्यापैकी थोड्याच घटना प्रसिद्धी माध्यमांद्वारे आपल्या समोर येतात. अशा घटना टाळणे सहज शक्य आहे. खेडेगावातून संडास व सांडपाण्याच्या निचऱ्यासाठी गटारे अभावानेच आढळतात. त्याचा गावाच्या सार्वजनिक आरोग्यावर परिणाम होतो.

स्वातंत्र्यानंतरच्या पाच दशकांमध्ये केंद्र व राज्य सरकारांनी ग्रामीण पायाभूत सुविधांसाठी कोट्यावधी रूपये निरनिराळ्या योजनांतर्गत खर्च केले. अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांनी त्यासाठी मदत केली. या पैशाचा विनियोग कसा करण्यात आला? त्याचा फायदा प्रत्यक्ष गावांपर्यंत पोहोचला का? त्यामध्ये कोणते अडथळे आले? किती प्रमाणात गावांचा फायदा झाला? सामान्य जनतेचे त्याबद्दल काय मत आहे? लोकांनी परिस्थितीशी कसे जुळवून घेतले आहे? परिस्थिती सुधारण्यासाठी काय केले पाहिजे? पायाभूत सोयी मिळवण्यासाठी कोणकोणत्या पर्यायी उपाय योजना अमलात आणल्या आहेत? अशा पर्यायी उपाय योजनांची पुनरावृत्ती इतर ठिकाणी करता येणे शक्य आहे का?

वरील प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी नॅशनल कौन्सिल ऑफ ॲप्लाईड इकॉनॉमिक रिसर्च या संस्थेने ग्रामीण पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प हाती घेतला होता. या प्रकल्पाची चर्चा हाकाराच्या या अंकातून करण्यात आली आहे. प्रकल्पाचा आराखडा पुढे दिला आहे.

# ❖ पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प ❖

सर रतन टाटा ट्रस्ट, मुंबई या संस्थेने देशाच्या ग्रामीण भागातील पायाभूत सोयीसुविधांचा अभ्यास करण्यासाठी दिल्लीच्या नॅशनल कौन्सिल ऑफ ॲप्लाईड इकॉनॉमिक रिसर्च (एन.सी.ए.ई.आर.) या संस्थेला संशोधन अनुदान दिले. या संशोधन प्रकल्पाचा मुख्य हेतू ग्रामीण भागातील भौतिक सोयीसुविधांचा अभ्यास करणे हा होता. या अभ्यास प्रकल्पामध्ये पुढील चार महत्वाच्या क्षेत्रांचा समावेश होता - रस्ते व वाहतूक क्षेत्र, दूरसंचार, विद्युत आणि पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता.

या चार क्षेत्रातील प्रगतीची माहिती टप्प्याटप्प्याने अनेक राज्यातून विविध संस्था व तज्ज्ञांच्या मदतीने गोळा करण्यात आली. ही माहिती प्रामुख्याने तीन स्वरूपात होती.

१. प्राथमिक माहिती

२. पर्यायी उपाय योजना अभ्यास

३. दुय्यम माहिती

**१. प्राथमिक माहिती -** रस्ते व वाहतूक, दूरसंचार, विद्युत, पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता या चार क्षेत्रातील ग्राम पातळीवरची माहिती भारताच्या दहा मुख्य राज्यातून गोळा करण्यात आली. प्रत्येक राज्यातील दोन जिल्हे त्यासाठी निवडण्यात आले होते. या दोन जिल्ह्यांची निवड करताना सामाजिक व आर्थिक निकषांचा प्रामुख्याने विचार करण्यात येऊन राज्यामधून अति मागास व अति प्रगत असा एक-एक जिल्हा निवडण्यात आला. उत्तरप्रदेश व मध्यप्रदेश यासारख्या आकारमानाने मोठ्या असलेल्या राज्यातून ४ जिल्ह्यांची निवड करण्यात आली. निवड केलेल्या जिल्ह्यांमधून आर्थिक निकषांच्या आधारे प्रत्येकी दोन तालुक्यांची निवड करण्यात आली. राज्यामधील जिल्हा, तालुका निवडीची प्रक्रिया एन.सी.ए.ई.आर. संस्थेनेच पूर्ण केली होती.

या तालुक्यातील प्रत्येकी सुमारे २०-२५ गावांची निवड करून त्यातून सर्व क्षेत्रांविषयी माहिती गोळा करण्यात आली. ही गावे निवडण्याचे स्वातंत्र्य माहिती गोळा करणाऱ्या संबंधित संस्थांना देण्यात आले होते मात्र त्यासाठीचे निकष ठरवून देण्यात आले होते. ते पुढीलप्रमाणे - तालुक्याच्या मुख्यालयापासून तालुक्याच्या हद्दीपर्यंत अनेक रस्ते असतात. त्यापैकी सर्वात जास्त लांबीचा रस्ता

निवडायचा. या रस्त्याचे चार समान विभाग करायचे आणि प्रत्येक विभागातून साधारणपणे सहा गावे निवडायची त्यापैकी निम्मी रस्त्याच्या डाव्या बाजूची तर निम्मी उजव्या बाजूची. निवडलेल्या गावाची लोकसंख्या ५००० पेक्षा कमी असावी. गावामधील पायाभूत सोयीसुविधांची माहिती गोळा करण्यासाठी एन. सी. ए. ई. आर. संस्थेने प्रश्नावली तयार केली होती. या प्रश्नावलीच्या मदतीनेच सर्व राज्यांमधून निवडलेल्या गावांमधून लोकांकडून प्राथमिक माहिती गोळा करण्यात आली. त्यामुळे ग्रामपातळीवर उपलब्ध असलेल्या पायाभूत सोयीसुविधा व त्यांची सद्यस्थिती याचे पूर्णपणे आकलन होते.

**२. पर्यायी उपाय योजना अभ्यास :** प्राथमिक व दुय्यम माहितीच्या बरोबरीनेच प्रत्येक क्षेत्रातील सरकारी योजनांना पर्याय म्हणून ज्या काही वेगळ्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत अशा दोन योजनांचा अभ्यास प्रत्येक राज्यातून करण्यात आला. लोकांनी केवळ सरकारी मदतीवर अवलंबून न राहता पायाभूत सोयीसुविधा विकासासाठी कोणता पर्यायी मार्ग निवडला त्याचे अर्थशास्त्र, व्यवहार्यता, पुनरावृत्ती क्षमता वगैरे गोष्टींचा समावेश या अभ्यासात होता. या पर्यायी उपाययोजना अभ्यासातून लोकांनी सुधारणेसाठी केलेले प्रयत्न तर दिसून येतातच त्याचबरोबर भविष्यकालीन पायाभूत सोयीसुविधा सुधारणेसाठी विविध पर्यायांच्या उपलब्धतेची दिशा पण मिळते.

**३. दुय्यम माहिती -** चारही पायाभूत क्षेत्रांसाठीची गेल्या पाच वर्षासाठीची माहिती (वर्ष १९९५ - २०००)देशातील सर्व राज्यांमधून गोळा करण्यात आली. या आकडेवारीवरून राज्य सरकारचे अपेक्षित उद्दिष्ट व साध्य झालेले उद्दिष्ट, करण्यात आलेली अर्थ तरतूद व प्रत्यक्षात झालेला खर्च याविषयीची माहिती मिळाली. मात्र दुय्यम माहिती गोळा करताना अनंत अडचणींना तोंड द्यावे लागले. बऱ्याचशा राज्यातून नोंदी अद्ययावत नसल्याचे तर काही ठिकाणी राज्य सरकारकडे देखील आकडेवारी एकत्रित स्वरूपात नसल्याचे आढळले संबंधित विभागातून माहिती मिळवण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागले.

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेला मध्यप्रदेश व महाराष्ट्र या दोन राज्यातून प्राथमिक माहिती गोळा करण्याची तसेच वरील दोन राज्यांच्या जोडीला गुजरात व राजस्थान राज्यातून दुय्यम माहिती मिळवण्याची जबाबदारी देण्यात आली होती.

हाकाराच्या या अंकातून मध्यप्रदेश राज्यातून गोळा करण्यात आलेल्या प्राथमिक माहितीचीच चर्चा करण्यात आली आहे.

❑❑❑

# ❖ मध्यप्रदेश : अभ्यास निष्कर्षांचा संक्षिप्त आढावा ❖

सर रतन टाटा ट्रस्ट, मुंबई या संस्थेने देशातील ग्रामीण पायाभूत सोयीसुविधांचा अभ्यास करण्यासाठी दिल्लीच्या नॅशनल कौन्सिल ऑफ ॲप्लाईड इकॉनॉमिक रिसर्च (एन.सी.ए.ई.आर) या संस्थेला अर्थसहाय्य दिले. या प्रकल्पामध्ये देशाच्या ग्रामीण भागात असलेल्या पायाभूत सोयीसुविधांच्या सद्यस्थितीचा अभ्यास करण्यात आला. यामध्ये रस्ते व वाहतूक, वीज, दूरसंचार, पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता या चार प्रमुख क्षेत्रांचा अभ्यास करण्यात आला.

भारतातील दहा महत्त्वाच्या राज्यातून सुमारे ११०० गावातून प्राथमिक स्वरूपाची तर दुय्यम माहिती सर्व राज्यातून गोळा करण्यात आली. महाराष्ट्र व मध्यप्रदेश या दोन राज्यातून माहिती गोळा करण्याचे काम महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेवर सोपवण्यात आले होते. त्यानुसार मध्यप्रदेशातून धार, इंदोर, छत्रपूर व पन्ना या चार जिल्ह्यातून माहिती गोळा करण्यात आली. या माहितीचे विश्लेषण केल्यानंतर मध्यप्रदेशचे जे चित्र उभे रहाते त्याचा संक्षिप्त आढावा खाली देण्यात आला आहे तर त्यासंबंधीची जिल्हावार आकडेवारीनुसारची सविस्तर चर्चा पुढील प्रकरणात केली आहे.

**लोकसंख्या**

मध्यप्रदेशमधील धार, इंदोर, छत्रपूर, पन्ना या चार जिल्ह्यातून एकूण १८५ गावांचे सर्वेक्षण करण्यात आले. या सर्व गावांची मिळून एकूण लोकसंख्या २,३०,१४२ होती तर एका गावाची सरासरी लोकसंख्या १२४४ एवढी होती.

एकूण लोकसंख्येपैकी २२% लोकसंख्या अनुसूचित जातीची होती. छत्रपूर (३८%) व पन्ना (२२%) जिल्ह्यात अनुसूचित जाती मोठ्या प्रमाणात आढळल्या. सर्व सर्वेक्षित गावांमधून अनुसूचित जमातींची लोकसंख्या १६.३% असल्याचे दिसले. धार जिल्ह्यामध्ये (५०%) आदिवासींची सर्वात जास्त लोकसंख्या होती.

सर्वेक्षित गावांमधून सरासरी केवळ ४ लोक अर्थार्जनासाठी शहराकडे स्थलांतर करत असल्याचे दिसले. स्थलांतरचे हे प्रमाण छत्रपूर व पन्ना जिल्ह्यामध्ये जास्त होते. या जिल्ह्यांमध्ये उद्योगधंदे अजिबातच नसल्याने येथील लोक उत्तर प्रदेश, दिल्ली, हरियाना राज्यातील औद्योगिक शहरांमध्ये अकुशल कामगार म्हणून काम करतात.

## रस्ते व वाहतूक क्षेत्र

सर्वेक्षित गावांपासून राज्य महामार्ग सरासरी ९.३ किमी तर राष्ट्रीय महामार्ग ३७.५ किमी दूर असल्याचे दिसले. गावांमधून दररोज नोकरी व्यवसायानिमित्त ये-जा करणाऱ्यांची संख्या २६ असल्याचे आढळले. दैनंदिन प्रवास करणाऱ्यांमध्ये शिक्षक, आरोग्य खात्याचे कर्मचारी, इतर सरकारी कर्मचारी, कामगार यांचा समावेश होता.

मध्यप्रदेशमध्ये ग्रामीण भागातील मार्गांवर खाजगी बसेस चालतात. राज्य परिवाहन मंडळाच्या बसेस मुख्य तालुका व शहरांच्या दरम्यान धावतात, ग्रामीण भागात त्या चालवल्या जात नाहीत. काही जिल्ह्यांमध्ये तालुक्याच्या ठिकाणापासून आजूबाजूच्या गावांमध्ये जीप व टेंपोद्वारे प्रवासी वाहतूक केली जाते. खाजगी बसेस, जीप व टेंपो यांना वार्षिक शुल्क आकारून प्रवासी वाहतुकीसाठी परवाना दिला जातो.

एक किलोमीटर अंतराचा प्रवास करण्यासाठी मध्यप्रदेशमध्ये सरासरी ५९ पैसे इतका खर्च येतो. माल वाहतुकीसाठी एक क्विंटल माल एक किलोमीटर वाहून नेण्यासाठी कमीत कमी सरासरी दर १.३३ रूपये तर जास्तीत जास्त सरासरी दर १.७६ रूपये एवढा होता. माल वाहतूक मुख्यत्वे ट्रॅक्टर, टेंपो अथवा ट्रकने केली जाते.

**अंतर्गत रस्ते :** गावातील अंतर्गत रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती ग्रामपंचायतीतर्फे केली जाते. प्रत्यक्षात निधीच्या अभावामुळे देखभाल व दुरूस्ती झाली नसल्याचे दिसून आले. गावाच्या अंतर्गत रस्त्याच्या स्थितीचे लोकांनी सांगितलेल्या वर्गीकरणानुसार टक्केवारी पुढील प्रमाणे - कच्चा व खराब दर्जाचा रस्ता (५८%), अति खराब दर्जाचा रस्ता (१०%) समाधानकारक दर्जाचा अंतर्गत रस्ता (३८%) फारच थोड्या गावांमधून अंतर्गत रस्ता चांगल्या दर्जाचा असल्याचे लोकांनी सांगितले- कच्चा व चांगला दर्जा (२%), पक्का व चांगला दर्जा (३%).

**बाह्य रस्तेः -** गावाच्या बाहेरील रस्ते राज्य सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे दुरूस्त करण्यात येतात. सर्व सर्वेक्षित जिल्ह्यांमध्ये बाह्य रस्त्यांची अतिशय दैन्यावस्था असल्याचे दिसले. लोकांनी वर्णन केलेली बाह्य रस्त्यांची स्थिती पुढे दिली आहे. कच्चा व खराब रस्ता (७६%), पक्का व खराब रस्ता (७%), अतिशय खराब रस्ता की ज्याच्यावरून पावसाळ्यात चालणे देखील अवघड आहे (१०%). केवळ ६% गावातील लोकांनी बाह्य रस्त्यांचा दर्जा समाधानकारक असल्याचे सांगितले. तर फक्त ५% गावातून बाह्य रस्ते पक्के डांबरी असल्याचे व त्यांचा दर्जा अतिशय चांगला असल्याचे दिसले.

मध्यप्रदेशमधील ग्रामीण भागातील रस्त्यांच्या दुरावस्थेची कारणे पुढीलप्रमाणे देता येतील- राज्य सरकारचे दुर्लक्ष (४९%), निधीचा अभाव (४७%), भ्रष्टाचार (४२%), रस्त्याचा निधी दुसऱ्या कामांसाठी वळवला जातो (८%), लोकांना रस्ता बांधणी प्रक्रियेत सहभागी करून घेतले जात नाही (८%), रस्त्यांची देखभाल केली जात नाही (३%).

ज्या गावांमधून चांगले अंतर्गत व बाह्य रस्ते होते तेथील लोकांनी त्यासाठी पुढील कारणे दिली- चांगले राजकीय पाठबळ, निधीची उपलब्धता, कंत्राटदारांकडून तसेच ग्रामपंचायत वा अन्य सरकारी विभागाकडून भ्रष्टाचार झाला नाही.

राज्यातील रस्त्यांची स्थिती सुधारण्यासाठी लोकांनी अनेक उपाय सुचवले आहेत. मध्यप्रदेशमधील बहुतांश रस्ते कच्चे असल्याने लोकांनी ग्रामपंचायत व सार्वजनिक बांधकाम विभागाला पुरेशा प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. दुसरी अत्यंत महत्त्वाची सूचना म्हणजे रस्ता बांधणीच्या प्रक्रियेत गावातील लोकांना सहभागी करून घेतले जावे. त्यासाठी ग्रामस्थांची एक समिती नेमली जावी. सर्व गावकऱ्यांना रस्ता बांधणीच्या तपशीलाबाबत माहिती देण्यात यावी. यामुळे काम योग्य दर्जाप्रमाणे होत आहे की नाही. वापरले जाणारे साहित्य योग्य दर्जाचे आहे की नाही, भ्रष्टाचार तर होत नाही ना वगैरे गोष्टींवर देखरेख करता येईल.

लोकांनी केलेल्या सूचना व त्यांची टक्केवारी पुढीलप्रमाणे - निधी उपलब्ध करून द्यावा (५२%), रस्ते बांधणीत लोक सहभाग (३७%), भ्रष्टाचारास आळा (२५%), सरकारने कामावर योग्य देखरेख करावी (१५%), रस्त्यांची चांगली देखभाल करावी.

मध्यप्रदेशमध्ये आसपासच्या गावात जाण्यासाठी बहुतांश लोक चालत किंवा सायकलने जातात. प्रवासासाठी वापरली जाणारी वाहतुकीची साधने पुढीलप्रमाणे - खाजगी बस (६२%), बैलगाडी (१०%), मोटार सायकल (१०%), जीप व टेंपोचा वापर केवळ ५% प्रमाणात होतो.

## दूरसंचार क्षेत्र

मध्यप्रदेशमध्ये केवळ ५०% गावातूनच सार्वजनिक दूरध्वनी उपलब्ध आहेत. सरासरी प्रत्येक गावामध्ये ०.५% सार्वजनिक दूरध्वनी म्हणजेच दोन गावामागे एक दूरध्वनी उपलब्ध आहे. उपलब्ध असलेले बहुतांश सार्वजनिक दूरध्वनी ग्रामपंचायतीचे असून त्यातील काही ग्रामपंचायतीत तर सार्वजनिक दूरध्वनी सरपंचाच्या घरात बसवले असल्याचे दिसले. मात्र योग्य प्रकारे देखभाल न झाल्याने सार्वजनिक दूरध्वनी बंदच असल्याचे बघायला मिळाले.

खाजगी दूरध्वनी केवळ ३०% गावातूनच होते. परंतु एकूण सर्वेक्षित गावांची संख्या लक्षात घेतली तर एका गावामागे सरासरी ३ खाजगी दूरध्वनी होते. एका आठवड्यामध्ये एका गावातून सरासरी ३३ लोक दूरध्वनीचा वापर करत होते. तीन मिनिटांच्या संभाषणासाठी सरासरी २.६० रूपये एवढे मूल्य लोकांना खर्च करावे लागते.

मोबाईल दूरध्वनी बाबत ग्रामीण भागातील लोकांना फारशी माहिती असल्याचे दिसत नाही. मध्यप्रदेशमधील ६७% गावातील लोक मोबाईल दूरध्वनी बद्दल अनभिज्ञ होते. ४% गावातील काही लोकांनी केवळ नाव ऐकले होते तर २७% गावातील ५ ते १० लोकांना त्याबद्दल माहिती होती.

इंटरनेटच्या माहितीचा प्रसार देखील मध्यप्रदेशच्या ग्रामीण भागातून झालेला नाही. ८८% गावातील लोकांना इंटरनेट व त्याविषयीची कसलीच माहिती नाही. उरलेल्या १२% गावातील काही लोकांनाच त्याबद्दल थोडीफार माहिती आहे. ही गावे मुख्यतः धार जिल्ह्यातील आहेत. या जिल्ह्यात 'ज्ञानदूत' हा इंटरनेटद्वारे प्रशासनाचा प्रयोग वर्ष १९९९ पासून सुरू आहे.

मध्यप्रदेशमधील दूरसंचार क्षेत्राच्या सद्यस्थितीची लोकांनी सांगितलेली कारणे पुढीलप्रमाणे - दूरसंचार खात्याचे दुर्लक्ष (४०%), तक्रारींची दखल घेलती जात नाही (१३%), भ्रष्टाचार (१०%). केवळ ६% गावातून असे सांगण्यात आले की गावामध्ये दूरध्वनी सेवा अतिशय सुरळीतपणे चालू आहे कारण दूरसंचार खात्याचा कारभार व्यवस्थितपणे चालतो.

दूरध्वनी सेवा सुधारण्यासाठी लोकांनी सुचवलेल्या उपाययोजना पुढीलप्रमाणे - निम्म्यापेक्षा जास्त गावातून सार्वजनिक अथवा खाजगी दूरध्वनी उपलब्ध नाही. त्यामुळे ५९% गावातील लोकांनी गावामध्ये सार्वजनिक दूरध्वनी बसवण्याची मागणी केली आहे. १२% गावांनी दूरसंचार खात्याच्या सेवेत सुधारणा करण्याची मागणी केली. इतर सूचना अशा -भूमिगत वाहिन्या (१२%), कर्मचाऱ्यांवर अधिकाऱ्यांकडून नीट देखरेख (११%), भ्रष्टाचारास आळा (७%).

## विद्युत क्षेत्र

मध्यप्रदेशमधील ६७% घरातून वीज उपलब्ध आहे. त्यापैकी ४१% घरातून अधिकृत मीटरवरून वीजजोड घेण्यात आले आहेत. अनधिकृतपणे - दुसऱ्याच्या मीटरवरून अथवा थेट वीजवाहक तारांवरून वीजजोड घेणाऱ्या कुटुंबांची संख्या बरीच म्हणजे २६% आहे. ३३% घरातून मात्र अजूनही चिमणी, कंदिल अशा पारंपारिक साधनांचाच वापर केला जातो. यामध्ये हरिजन व आदिवासी कुटुंबांची संख्या मोठी आहे.

एका गावातून विजेवर चालणारे सरासरी १.७ किरकोळ उद्योग होते. यामध्ये पिठाची गिरणी, वेल्डिंग मशीन, इस्त्री दुकान वगैरेचा समावेश आहे. एकूण सर्वेक्षित १८५ गावांपैकी केवळ २ गावांच्या हद्दीतच विजेवर चालणारे कारखाने होते. त्यापैकी एक कारखाना वीज पुरवठ्यासाठी विद्युत मंडळावरच अवलंबून असतो तर दुसऱ्या कारखान्यात जनरेटरचा वापर केला जातो.

मध्यप्रदेशातील खेडेगावांमधून दिवसाला केवळ ८.६ तासच वीजपुरवठा होतो तर आठवड्यातील केवळ ३.९ दिवसच वीज मिळते. वर्ष २००० मध्ये पावसाळ्याच्या तीन महिन्यात (९० दिवस) केवळ ३८.६ दिवसच वीज उपलब्ध होऊ शकली. ही सर्व आकडेवारी पाहता असे दिसून येते की राज्यामध्ये वीजपुरवठ्याची स्थिती गंभीर आहे. रब्बी हंगामात - हिवाळ्यात तर परिस्थिती अधिकच गंभीर होते. शेतामध्ये गहू लावल्याने, गव्हाला विंधन विहिरीतून पाणी देण्यासाठी विजेची मागणी खूप वाढते. परंतु पुरवठा मात्र तेवढाच रहात असल्याने वारंवार वीज पुरवठा खंडित होतो. दिवसातून चार तास देखील वीज मिळू शकत नाही. त्यामुळे काही शेतकरी डिझेल पंप वापरून गव्हाला पाणी पुरवतात. तेथील ग्रामीण भागातील जनतेची एकच मागणी आहे. ठराविक वेळेमध्ये नियमित दाबाने अखंड विजेचा पुरवठा व्हावा. त्यासाठी वीज जास्त दराने घेण्यास देखील लोक तयार आहेत. अट मात्र एकच - अखंडित वीज पुरवठा.

६०% गावातील लोकांनी नविन वीज जोड घेताना वीज कर्मचाऱ्यांना लाच द्यावी लागत असल्याची तक्रार केली. लोकांना या लाचेपोटी सरासरी २२५ रूपये कर्मचाऱ्यांना द्यावे लागतात तरच त्यांचे काम केले जाते.

मध्यप्रदेशमध्ये विजेवर चालणाऱ्या घरगुती उपकरणांचा वापर फारसा प्रचलित नाही. केवळ पंखा (८६%), दूरदर्शन (७६% ), टेपरेकॉर्डर (४१%) या साधनांचा वापर केला जातो, कंसातील आकडेवारी गावांची टक्केवारी दर्शवते. प्रत्येक गावातील मोजक्याच कुटुंबाकडे ही साधने होती.

वीज पुरवठा अनियमिततेच्या ग्रामस्थांनी दिलेल्या कारणांची वर्गवारी पुढीलप्रमाणे करता येईल - कमी वीज उत्पादन (५१%), राज्य विद्युत मंडळाचे कामाकडे दुर्लक्ष (३५%) भ्रष्टाचार (२६%), शहर व ग्रामीण भागासाठी असमान वीज वितरण (१७%), विजेची चोरी (१५%), योग्य देखभाल केली जात नाही (१०%), थकित वीजदेयके (४%), उपलब्ध क्षमतेपेक्षा जास्त वीज जोड (३%).

वीज टंचाईचा सामना करणयासाठी लोकांनी अनेक उपाययोजना सुचवल्या आहेत. सर्व जिल्ह्यातून वीज टंचाईचा सामना करण्यासाठी वीज उत्पादनात वाढ करावी असे सुचवले आहे

(६०%). मध्यप्रदेश राज्य विद्युत मंडळामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत आहे त्याला आळा घालण्यात यावा अशी सूचना ३०% गावांनी केली आहे. लोकांनी सुचवलेले इतर उपाय पुढीलप्रमाणे - अधिकाऱ्यांनी योग्य देखरेख करावी (२४%), विजेच्या चोरीला आळा घालावा (२२%), अधिक क्षमतेचे रोहित्र, नविन केंद्रे उभारून वीज वितरणात सुधारणा करावी (१६%), वीजवहन यंत्रणेची नियमित देखभाल व दुरूस्ती आणि नियमित वीजपुरवठा (५%), थकित वीज देयकांची वसुली (४%), सौर उर्जेसारख्या अपारंपारिक उर्जा स्त्रोतांचा वापर करून वीज निर्मिती (२%).

## पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता क्षेत्र

मध्यप्रदेशमधील सर्व गावातून हातपंप उपलब्ध आहेत तर ६५% गावातून विहिरीतून देखील पाणी भरले जाते. राज्यातील २१% गावातून सार्वजनिक नळ कोंडाळी आहेत तर १५% गावांमधून घरगुती नळजोड पुरवण्यात आले आहेत.

एकूण उपलब्ध असलेल्या हातपंपापैकी ७६% हातपंप सर्वेक्षणाच्या वेळेस चालू स्थितीत होते तर बाकीचे २४% हातपंप नादुरूस्त होते. हे प्रमाण फार मोठे आहे.

एकूण गावांपैकी केवळ २८% गावातूनच नळ पाणीपुरवठा योजना बांधल्या असल्याचे दिसले. सरासरी १.३ किमी अंतरावरून पाणी आणावे लागते. उन्हाळ्यामध्ये पाणी आणण्यासाठी २३% गावातून लोकांना बैलगाडी अथवा सायकलचा वापर केला जातो.

५% गावांनी उन्हाळ्यात पाणीटंचाईच्या काळात पाणी खरेदी करावे लागत असल्याचे सांगितले. पाणी खरेदीचे मूल्य एका लिटरसाठी ५ पैशापासून ते ३० पैशापर्यंत होते. सरासरी १०० लिटर पाण्यासाठीची खरेदी किंमत ९.१० रूपये एवढी होती.

मध्यप्रदेशामध्ये नळपाणी पुरवठा योजना थोड्या गावतूनच उपलब्ध आहे (२८%). या गावातूनच ग्रामपंचायतीद्वारे पाणीपट्टी वसूल करण्यात येते. ज्या गावामध्ये केवळ हातपंप अथवा विहिरी आहेत तेथे पाणीपट्टी गोळा केली जात नाही. त्यामुळे पाणीपट्टीचा वार्षिक सरासरी दर २५.३० रूपये एवढाच आहे.

या राज्यातील ३१% गावे सध्याच्या पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताबद्दल समाधानी आहेत तर ६९% गावे त्याबाबत असमाधानी आहेत.

शुद्ध पिण्याचे पाणी वर्षभर मिळण्यासाठी मध्यप्रदेशातील गावकऱ्यांनी सुचवलेल्या उपाययोजना

पुढीलप्रमाणे - नळ पाणीपुरवठा योजना (४०%), पाण्यासाठी साठवण टाकी बांधणे (२४%), नविन हातपंप किंवा विहिरी (२४%), तर १४% गावांनी सध्या असलेल्या विंधन विहिरींवर हातपंप बसवण्याची मागणी केली आहे. इतर सूचनांमध्ये पुढील गोष्टींचा समावेश होता - विहिरीवर पंप बसवून पाणीपुरवठा करणे (५%), सध्याच्या विहिरीची खोली वाढवणे (५%), पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे म्हणून पंपासाठी अखंडित वीज पुरवठा (१%).

७९% गावातून अंतर्गत रस्त्याच्या बाजूने गटारे अजिबातच नव्हती तर १३% गावात केवळ निम्म्या गावातच गटारे बांधली गेली होती. ८% गावांमधून संपूर्ण गावामध्ये अंतर्गत रस्त्यांच्या बाजूने गटारे बांधलेली असल्याचे आढळून आले.

घरातील सांडपाण्याचा निचरा करण्यासाठी देखील गावामध्ये काही व्यवस्था असल्याचे फारसे आढळले नाही. ८०% गावातील घरांमधून सांडपाणी घराबाहेर नुसरेच सोडले जात होते. ११% गावांमधून शोषखड्डे काही प्रमाणात बांधले असल्याचे दिसले तर ९% गावांमधून घरातील सांडपाण्याचा निचरा गटारांमध्ये केला जात असल्याचे दिसले.

मध्यप्रदेशातील ६०% गावांमधून किमान एक किंवा त्यापेक्षा जास्त संडास उपलब्ध आहेत तर ४०% गावांमधून संडास अजिबात नाहीत. सरासरी एका गावामध्ये १२ संडास असल्याचे दिसून आले. बांधण्यात आलेल्या एकूण संडासांपैकी ७९% संडासांचाच वापर केला जात होता. लोकसंख्या व एकूण संडास यांचे गुणोत्तर काढले असता असे दिसते की ९२ लोकांमागे १ संडास आहे.

ग्रामीण भागातील लोकांना पावसाळ्यामध्ये ज्या मुख्य समस्यांना तोंड द्यावे लागते त्या अशा - चिखलाने भरलेले रस्ते (७६%), डासांचा प्रादुर्भाव (५९%), संडास नसल्याने खास करून होणारी महिलांची गैरसोय (४४%), अशुद्ध पिण्याचे पाणी (२१%), गावात असणारी अस्वच्छता (५%).

सर्वेक्षित गावांमधील लोकांनी आपापल्या गावातील स्थानिक गरजा लक्षात घेऊन चार मुख्य क्षेत्रांची प्राधान्यता ठरवली. संपूर्ण मध्यप्रदेशचा विचार केला तर पुढीलप्रमाणे प्राधान्यता क्रम सांगता येईल. -

**१) वीज पुरवठ्यात सुधारणा**
**२) रस्ते सुधारणा**
**३) पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता**
**४) दूरध्वनी**

❑❑❑

# ❖ संक्षिप्त जिल्हा ओळख ❖

मध्यप्रदेशमध्ये ज्या चार जिल्ह्यातून पायाभूत सोयीसुविधांचे सर्वेक्षण करण्यात आले त्या जिल्हयांची आपण थोडक्यात ओळख करून घेऊ.

## धार जिल्हा

धार जिल्हा मध्यप्रदेशच्या नैऋत्येला वसलेला आहे. या जिल्ह्याच्या उत्तरेला रतलाम व उज्जैन जिल्हे, दक्षिणेला निमाड जिल्हा, पूर्वेला इंदोर तर पश्चिमेला झाबुआ जिल्हा आहे. जिल्ह्याचे क्षेत्रफळ ८१४९ चौरस कि.मी. एवढे आहे. वर्ष २००१ च्या जनगणनेनुसार धार जिल्ह्याची लोकसंख्या १७,४०,५७७ इतकी आहे.

जिल्ह्याचे नाव मुख्यालयाच्या नावावरून पडले आहे. पूर्वीच्या काळी धार हे गाव 'धारानगरी' या नावाने ओळखले जात होते. धार येथे असलेल्या किल्ल्यावरून त्याला 'किला धार' असेही संबोधले जात असे.

नवव्या शतकामध्ये परमार घराण्यातील राजा वैरीसिंग याने आपल्या राज्याची राजधानी उज्जैन येथून धार येथे आणली. धार जिल्ह्यातील मांडू येथे माळवा प्रांताची राजधानी होती.

अकबराच्या काळात धार शहराला पुन्हा एकदा महत्त्व प्राप्त झाले. १७३२ ते १९४८ या काळामध्ये धार संस्थानावर पवार या मराठा घराण्याची सत्ता होती. संस्थानांचे स्वतंत्र भारतात विलीनीकरण झाल्यानंतर पूर्वीच्या धार संस्थानातून कुक्षी, बदनावर, धार, मांडू आणि धरमपुरी हे तालुके तसेच सरदारपूर, मनावर हे ग्वाल्हेर संस्थानातील आणि निसारपूर या इंदोर राज्यातील तालुक्यांचा मिळून धार जिल्हा तयार करण्यात आला.

धार जिल्ह्यामध्ये आदिवासी जमाती बहुसंख्येने राहतात. भिल, भिलाला व पटेलिया या मुख्य आदिवासी जमाती आहेत. कुक्षी तालुक्यामध्ये सर्वात जास्त आदिवासी लोकसंख्या आढळत असून तेथे ७५% एवढे प्रमाण आहे.

धार जिल्ह्यामध्ये एकूण १५७१ गावे असून त्यापैकी १४८४ गावांमधून लोकवस्ती आहे तर ८७ गावे ओसाड असल्याची महसूल खात्याकडे नोंद आहे. जिल्ह्यामध्ये बहुतांश म्हणजे ९०% लोकसंख्या ग्रामीण भागातूनच वसली आहे. एका गावाचे सरासरी क्षेत्रफळ ३.२ चौ. कि.मी. एवढे असून त्यामध्ये सरासरी ३९२ लोक राहतात.

१९५१ च्या जनगणनेप्रमाणे या जिल्ह्यात ३० बोलीभाषा बोलल्या जात असल्याचे दिसते. त्यानंतर हीच संख्या ४९ झाल्याचे १९६१ च्या जनगणनेनुसार आढळते. त्यानंतर जिल्ह्यामध्ये हिंदी, निमाडी व उर्दू बोलणाऱ्यांची संख्या बऱ्याच प्रमाणात वाढली आहे.

# इंदोर जिल्हा

माळवा प्रांताच्या मध्यावरती इंदोर जिल्हा वसलेला आहे. इंदोर जिल्ह्याच्या उत्तरेला उज्जैन तर दक्षिणेला निमाड, पूर्वेला देवास तर पश्चिमेला धार जिल्हा अशी सीमा आहे. इंदोर जिल्ह्याची २००१ च्या जनगणनेनुसार २५ ,८५,३२१ एवढी लोकसंख्या आहे.

जिल्ह्याचे इंदोर हे नाव इंदूर या नावावरून पडले. इंदूर या नावाची उत्पत्ती इंद्रेश्वर अथवा इंद्रपूर या नावावरून झाली. पूर्वीच्या काळी छोटेसे खेडेगाव असलेल्या या भागाचे अवशेष अजूनही जुनी इंदोर या मध्यवर्ती भागात पहायला मिळतात.

सध्याच्या इंदोर जिल्ह्यातील भाग मुघल राजवटीच्या काळात उज्जैन व मांडू या दोन संस्थानांमध्ये विभागला गेला होता. उत्तरेकडील कंपेल, देपालपूर व सांवेर परगाणा उज्जैन संस्थानात तर दक्षिणेकडील बेटमा व होसीलपूर परगाणा मांडू राजाच्या अधिपत्याखाली होती. मुघलांच्या उत्तर काळात इंदोर शहर कंपेल परगाण्यात जोडले गेले. वाढत्या व्यापारामुळे १७२० साली इंदोरला परगाण्याच्या राजधानीचा दर्जा मिळाला.

१७३० साली होळकरांनी माळवा प्रांतात आपली सत्ता प्रस्थापित केली आणि प्रांताची राजधानी इंदोरहून कंपेलला हलवली. मल्हारराव होळकरांच्या मृत्युनंतर महाराणी अहिल्याबाई होळकर यांनी इंदोरला पुन्हा राजधानी बनवले.

जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात शहरीकरण झालेले आहे. इंदोर, महू, देपालपूर व सांवेर या चार शहरात मिळून ६०% लोकसंख्या रहाते. तर उरलेली ४०% जनता ग्रामीण भागातून रहाते. जिल्ह्यात असलेल्या ६६९ गावांपैकी २५ गावे ओसाड आहेत.

जिल्ह्यामध्ये जास्त करून (६०%) हिंदी बोलीभाषा बोलली जाते. याशिवाय माळवी बोली बोलणाऱ्यांचे प्रमाणदेखील लक्षणीय आहे. मराठी, उर्दू, सिंधी, गुजराती, राजस्थानी या काही अन्य बोलीभाषा आहेत.

# छत्रपूर जिल्हा

जिल्ह्याचे नाव छत्रपूर या जिल्हा मुख्यालयावरून पडले. राजा छत्रसाल बुंदेला याने १७०७ मध्ये हे राज्य स्थापन केले म्हणून छत्रपूर हे नाव पडले. दुसऱ्या एका मत प्रवाहानुसार राजा छत्रसालाने हे राज्य स्थापन केले नसून त्याने या जागेला केवळ राजधानीचे महत्त्व प्राप्त करून दिले.

छत्रपूर जिल्ह्याने पूर्वीच्या बुंदेलखंड प्रांताचा मध्यभाग व्यापला आहे. जिल्ह्याची पूर्व व पश्चिमेकडची सीमा अनुक्रमे केन व धसान या नद्यांच्या पात्रामुळे आरेखित केली गेली आहे. छत्रपूर जिल्ह्याच्या उत्तरेला उत्तर प्रदेशातील हमीरपूर जिल्हा, दक्षिणेला दमोह, पूर्वेला पन्ना तर पश्चिमेला टिकमगड असे जिल्हे आहेत.

मध्ययुगीन काळामध्ये या प्रांतावर कालाचुरी, चंदेला, गोंड व बुंदेला या घराण्यांनी राज्य केले. अठराव्या शतकात पन्नाच्या छत्रसाल राजने या प्रांताचा आपल्या राज्यात समावेश केला. त्यानंतर त्याने आपले राज्य स्वतःची मुले व पहिला बाजीराव पेशवा यांच्यामध्ये विभागून दिले. मात्र अंतर्गत कलह व भाऊबंदकीमुळे या भागामध्ये अनेक छोटी छोटी राज्ये व जहागिरी निर्माण झाल्या. ब्रिटिशांनी त्यांना सनद दिली.

स्वातंत्र्यानंतर अलीपुरा, छत्रपुर, चरखारी, बिजावर, गरौली, गौरीहार, लुगासी, नायगवां, रीबाई ही संस्थाने तसेच पन्ना व अजयगड या संस्थानातील काही भाग पूर्वीच्या विंध्य प्रदेशातील छत्रपूर जिल्ह्यात समाविष्ट करण्यात आला. १ नोव्हेंबर १९५६ पासून छत्रपूर जिल्हा मध्यप्रदेश राज्यामध्ये समाविष्ट करण्यात आला.

## पन्ना जिल्हा

पुरातन काळी विष्णु पुराण व भविष्य पुराणात पद्मावती नगरीचा उल्लेख आढळतो. तेच आजचे पन्ना असे मानले जाते. स्थानिक लोकांची अशी धारणा आहे की राजा दधिची व राजा पद्मावत यांनी तेथेच राजधानी वसवली होती.

रामायण कालात पन्ना जिल्हा हा दंडकारण्याचाच एक भाग होता. त्यानंतर या भागावर मौर्य, शुंग व गुप्त घराण्यांनी राज्य केले. तेराव्या शतकापर्यंत या भागात गोंडांची वस्ती होती. दहाव्या ते तेराव्या शतकादरम्यान येथे चंदेलांचे अधिराज्य होते. सतराव्या शतकात हा भाग बुंदेला घराण्याच्या अधिपत्याखाली आला व बुंदेलखंडाचा एक भाग बनला.


राजा छत्रसाल बुंदेला याने येथे सापडणाऱ्या हिऱ्यांच्या मदतीने आपल्या राज्यासाठी भक्कम आर्थिक पाठबळ उभे केले. त्यानंतर त्याने पन्ना शहराला आपल्या राज्याची राजधानी बनवली. त्यामुळेच या शहराचे महत्त्व अधिक वाढले.

सध्याच्या पन्ना जिल्हा पूर्वीच्या पन्ना व अजयगड या संस्थानाच्या अधिपत्याखाली असलेल्या प्रदेशापासून बनलेला आहे. मध्यप्रदेशातील ईशान्य भागात असलेल्या या जिल्ह्याच्या पूर्वेला सतना जिल्हा, दक्षिणेला कटनी जिल्हा, पश्चिमेला दमोह व छत्रपूर तर उत्तरेला प्रदेशातील बांदा जिल्हा आहे.

वर्ष २००१ च्या जनगणनेप्रमाणे जिल्ह्याची लोकसंख्या ८,५४,२३५ इतकी आहे. पन्ना जिल्ह्यात सुमारे ८५% लोक ग्रामीण भागातून रहातात. जिल्ह्यामध्ये ६ मोठी गावे तर १०४८ गावे आहेत. जिल्ह्यातील तालुक्यांची संख्या ५ आहे.

पन्ना जिल्हा येथील खाणींमध्ये सापडणाऱ्या हिऱ्यांसाठी जगप्रसिद्ध आहे. त्याशिवाय जिल्ह्यामध्ये अन्य उद्योगधंदे दिसून येत नाहीत. तेथील लोक मुख्यतः शेतीवरच अवलंबून आहेत.

❑❑❑



धार जिला
पैमाना 0 10 किमी.
गुजरात
उज्जैन
इंदौर
झाबुआ
धार
पश्चिम निमाड़
बरवानी
सरदारपुर
मनावर
धार
बदनावर
धामनदा
बड़नगर
खरसोद कलां
फतेहाबाद
तिलगरा
धारसीखेड़ा
हरमतिया
कानवन
पलवाड़ा
नागदा
बिडवाल
बरमंडल
लबरिया
बोरिया
तिमयाची
बोला
दत्तीगाँव
सोनगम
दौलतपुरा
दसाई
तीसगाँव
कैसूर
बिजूर
सादलपुर
बगवार
गुनावद
पीपलखेड़ा
उटावद
अहू
अनारद
कर्डावद
घोटादा
लेरगाँव
मोनगढ़
राजगढ़
छरावद
तिरला
रिंगनोद
मोरगाँव
बंदेरी
सगवाल
गुमानपुरा
ढाकनबाड़ी
बलेरी
अमझेरा
नववापुरा
पाल्यी
रामगढ़
सल्कनपुर
कुंजरोद
बेडला
डिगथान
बछनपुर
टांडा
होलीबोदरी
अमघोटे
गरारावद
बीरपुर
बोरी
पिपलवा
गोरबोरी
नीमखेड़ा
जीराबाद
कुण्डला
नलोहा
बैरोपुरा
मोती
गंधवनी
हल्दारी
करोंडिया
खेड़ी
माण्डु
अवल्दा
उमरपांड कलां
उन्डली
अंजनिया
बिरलई
खेड़री
ब्राह्मनपुरी
पटलावद
काकड़ा
खोखिया
मनावर
अजनई
खरगोन
धमनोद
कुक्षी
लोहारी
सिंघाना
गिरवानिया
तलवाड़ा
अली
अमलाल
बरवानिया
देशवालिया
धर्मपुरी
खलघाट
बकानेर
तवालई
ब्राह्मनगाँव
निसारपुर
केनपुर
करोली
नर्मदा
कोंडा
दही
धरमराई
चिखल्दा
गंगली
गुजरी
महेश्वर
कसरावद
बामंडा
ठीकरी
बरवानी
अंजद
सैलानी
लिम्बी
पाटी
राजपुर
पीपरी
धेगावा
लिखी
तेमला
जुलवानिया
सेगाँव
खरगोन
गंधावल
बोखराटा
पल्सुद
बालसमन्द
मोरवानी
झबुआ
थांदला
पेटलावद
रायपुरा
उदयगढ़
मेघनगर
पारा
रानापुर
कल्याणपुरा
खनिअंबा
काकनवानी
जोबट
नानपुर
थाल्ली
खट्टाली
तलवड़ी
बाजना
रतलाम
सैलाना
शिवगढ़
बामनिया
करवार
सारंगी
जाम्ली
देवली
देपालपुर
गौतमपुरा
सगोर
अकोलिया
चोली


# थार जिल्ह्यातील सर्वेक्षित गावे

## (अ) सरदारपूर तालुका

| | | | |
|---|---|---|---|
| १. | नेपावली | २. | साजोद |
| ३. | रानीखेडी | ४. | गोदीखेडा ठाकूर |
| ५. | बसलाई | ६. | सेलवा खेडी |
| ७. | सेलवा | ८. | खुटपला |
| ९. | गोदीखेडा चारण | १०. | कुंडलपाडा |
| ११. | बोडिया | १२. | सिंगेश्वर हनुमंतिया |
| १३. | मोलाना | १४. | नयापुरा |
| १५. | पंच पिपलिया | १६. | जोलाना |
| १७. | भास्करनगर | १८. | रूपाखेडा |
| १९. | बोदली | २०. | अहमद |
| २१. | नरसिंग देवला | २२. | पसावदा |
| २३. | नोना खेडा | २४. | हनुमंतिया |
| २५. | बडवेली | | |

## (ब) मनावर तालुका

| | | | |
|---|---|---|---|
| १. | ब्राम्हनपुरी | २. | भैसावद |
| ३. | रणतलाव | ४. | अंजनिया |
| ५. | देवगड | ६. | सिर्सी |
| ७. | मांडवी | ८. | डोंगरगाव |
| ९. | कोसवाडा | १०. | बोरूद |
| ११. | पलासी | १२. | उदिया खेडी |
| १३. | कुराडखाल | १४. | जाजम खेडी |
| १५. | देदला | १६. | गोराडिया |
| १७. | भोरी बायडी | १८. | दसवी |
| १९. | झापडी | २०. | मेहताखेडी |
| २१. | बागलिया | २२. | खुमानपुरा |


इन्दौर जिला
पैमाना 0
10 किमी.
उज्जैन
देपालपुर
इन्दौर
महू
सांवेर
फतेहाबाद
गिरोता
फुलान
छडोदा
गौतमपुरा
पलसौदा
अस्याना
फरकोदा
कुनगारा
काकवा
जमगोदा
रुद्राख्या
अजनाद
हरियाखेडी
नाफपुवासरा
रतनखेडी
गिरगोढ़ा
पलास्यापार
सुमटा
मांगलिया
काकरियावाडया
मुरखेड
करकी
स्नावदा
टाकीपुरा
चान्देर
पेमलपुर
बड़ोदापाथ
नेवरी
अटावदा
पलासिया
उत्तरसी
रंगवासा
सनावदा
बोरया
खानपुरा
राजपुरा
सेजवानी
सगवाई
सलेमपुर
रंगवास
भाटखेड़ी
सिलोटा
भरदला
सूलीया
कमदपुर
कोदरिया
कुबाली
आसापुरा
सीहोद
यशवंतनगर
वोरदी
मानपुर
गोलखेडा
कदवाली
मेण
नहारखोदरा
सेजगढ
कलेरिया
खुर्दी
थोड़ा
जाम
चौराखाना
छिमाली
बुडानापथ
पोटलोद
बिसनपुरा
सिमरिढ
जमोड़ी
माथूखेडी
तराना
सालीखेडी
बिसाखेडी
टाकून
सोलासिवा
बालोदा
जेतपुरा
ताऊडी
अर्जुनवराडिया
डकाधया
शहूखेडी
कदावली
पंचडेहन्या
पवारजुनादी
हातोद
यशवंत सागर
बुदानिया
मालीबड़ोदया
जाखत
मोगालिया
पानोड़
घासखेडी
बरोदियादौलत
धतुरिया
खेमाना
कनाडिया
पिपल्याकुम्हार
गोगाखेडी
मिचोलीहबशी
खुडेल
घुलेट
दूधिया
डिगवाल
बरोदियहाट
सिरपुर
नावदापथ
बिजलपुर
लिम्बोदी
उमरीखुर्द
रानदरा
कम्पेल
कवडिया
उन्डेल
खन्डेल
पेडमी
प्रतापगढ़
असरावद
माचला
पानदा
पांजरिया
जामविया
हरसोल
दतोदा
चिखली
अम्बाचदन
पातालपानी
भगोरा
भेरुघाट
मेन्डल
कालाकुन्ड
सेन्डल
सलेन्डी
मवाडा
सुरतीपुर
मिकारियाखेड़ी
राजपुरा
चोरल
बेका
कुलठान
काटकूट
बागरी
गुजरी
बागोड़
सुलटॉन
बड़वाह
प श्चि म नि मा ड़
सांवेर
37
40
59
23
54
3


## इंदोर जिल्ह्यातील सर्वेक्षित गावे

### (अ) देपालपूर तालुका

१. गिरोता
२. खडी
३. जलोदिया पंथ
४. बरोदिया पंथ
५. हरनासा
६. धन्नाड
७. धरावरा
८. गलोंडा
९. लिल्लेडी
१०. राजपुरा
११. भंवरगड
१२. छोटी बेटमा
१३. बिजनपूर
१४. बरोडा पंथ
१५. कालासुरा
१६. शंकरपुरा
१७. सलमपूर
१८. ग्रीडलाईन
१९. रावत
२०. दौलताबाद
२१. सेजवानी
२२. धुरेरी
२३. हिम्मतगड
२४. अटावदा
२५. चिकलोंडा

### (ब) इंदोर तालुका

१. सिवनी
२. गढी
३. फली
४. झरनिया
५. बावलिया खुर्द
६. गोगाखेडी
७. आसाखेडी
८. मोरोध
९. काजी पलासिया
१०. छोटी खुडेल
११. सिंधी बरोडा
१२. मुंडला दोस्तदार
१३. उज्जैनी
१४. धमनाय
१५. कपाल्या खेडी
१६. हंसा खेडी
१७. सोन गुराडिया
१८. असरावद बुजुर्ग
१९. माली खेडी
२०. बडिया किमा
२१. उमरिया
२२. रादरा
२३. जामनिया
२४. सनावदिया



छतरपुर जिला
पैमाना 0 10 किमी.
उ त्त र प्र दे श
आ र ते
छ त र पु र
टीकमगढ़
पन्ना
सागर
बाँदा
महोबा
गोरिहार
बिजावर
छतरपुर
राजनगर
खजुराहो
लौंडी
नौगाँव
महाराजपुर
बड़ा मलहरा
बक्स्वाहा
अजयगढ़
अमानगंज
जतारा
पलेरा
निवारी
चन्दला
अलीपुर
कटरा
पहरा
परेई
दटहरी
बारीगढ़
बिजरिसन
बलरामपुर
सरवई
मनुरिया
खड़ेहा
नेहरा
माधौपुर
परसनिया
लवकुशनगर
डुमरा
देवकलियन
राजापुर
बछौन
अतरी
प्रतापपुरा
बिक्रमपुर
गंगापथ
गठेवरा
बसारी
महलवार
छतीपुरा
बमीठा
राजागढ़
गुडपारा
सीलोन
अमरोनिया
नोनापांजी
पलकोंहा
भोरखुवा
देवरा
धरमपुरा
डिलारी
कुथ
किशुनगढ़
भसरगर
मतीपुरा
नगदा
जेतपुर
शाहगढ़
चौपरा
सुरजपुराकालान
महाराजगंज
बम्होरी
भरतपुर
गुलगंज
अनमौर
रंगोली
हीरापुर
हिम्मतपुरा
दालोन
गढ़ीपुरा
रामनगर
ईशानगर
परापट्टी
बचौखुर्द
सलपुरा
नयेघर
गर्रोली
टीकमगढ़
मऊरानीपुर
कुलपहाड़
खरखारी
राठ
पनवाड़ी
ज्याराहा
पुरवा
बम्होरी
सरदारपुर
लुगासी
फुरौता
मरा
पुरवा
टटरा
बलदेवगढ़
चौंदेरी
सेरोरा
सोरखी
भगवान
कुँवरपुरा
बौरा
बमनोरी
धनगर्रा
रामटोरिया
हीरापुर
दरगवां
मलार
निमानी
सगोरिया
गढ़ोही
कसेरा
निवार
बम्होरी
कुही
चोरई
देवरी
बैनागिर
सिमारिया
पवई
बोरसनी
जोडपुर
छकरभाटा
गोनौर
गुन्नौर
बारीस
A
B
C
D
1
2
3
4
5
50
100


# छत्रपूर जिल्ह्यातील सर्वेक्षित गावे

## (अ) नौगाव तालुका

| | | | |
|---|---|---|---|
| १. | फुलारी | २. | बुधरक |
| ३. | बरोही | ४. | मनकारी |
| ५. | नाथपूर | ६. | पुतरी |
| ७. | सिमर्धा | ८. | नेंगुवा |
| ९. | गौरारी | १०. | गढी |
| ११. | पडवाहा | १२. | गौर |
| १३. | मदारी | १४. | सिंदुरकी |
| १५. | नौना | १६. | मदारत्ता |
| १७. | चौखाडा | १८. | भदेसर |
| १९. | हिरापूर | २०. | झिंझन |
| २१. | खुदरा | २२. | पत्रपुरा |
| २३. | मानपुरा | २४. | सिंगरावन कला |

## (ब) गौरीहार तालुका

| | | | |
|---|---|---|---|
| १. | करहारी | २. | मुदनहारा |
| ३. | टिकरी | ४. | धवारी |
| ५. | बजरंगपूर | ६. | छोटी चौहानी |
| ७. | केवलाहा | ८. | रामपूर |
| ९. | बलरामपूर | १०. | इंद्रपुरी |
| ११. | सिचहरी | १२. | चितारी |
| १३. | बरहा | १४. | लौलासा |
| १५. | हिनौती | १६. | छोटा किरटपूर |
| १७. | चुरयारी | १८. | थान पुरवा |
| १९. | कितपुरा | २०. | हनुखेडा |



पन्ना जिला
पैमाना 0 10 किमी.
उत्तर प्रदेश
सकरा
दासेमी
धरमपुर
मोलरी
जैतपुरा
किशनपुर
चौपरा
भापदार
अजयगढ़
सिमरिया
पहाड़ी खेरा
टोरिया
दमचुआ
लेया
बंगला
बरयारपुर
पेरा
धरमपुर
भसूड़ा
शाहपुर
धौधर
सरकोहा
जमुनाहाई
इटवा
छ त र पु र
पन्ना
काटेरा
बिक्रमपुर
बडौर
महराजपुर
सलोर
बारौर
खोरवेन्ट
कसई
शिवराजपुर
जमुनहाई
सतना
बडगरी
परार
बडगांव
अकोला
सलैनई
बरौर
47
सलाई
त्रिलसाय
कटहरा
नागौद
आलर
झुठन
ककरहटी
करहरिया
प न्ना
निवारी
स त ना
गहदरा
बिक्रमपुर
सुहाला
सिलोली
भा र त
रामपुर
सिरवा
पतरहा
मटनवारा
सिमरा सेलहा
असातगंज
तुराह
अमटा
चिकलहाव
रिधोरा
गुनौर
गंज
सिधोरा
इटौरी
मलेया
सोहजनी
सहिलवारी
दतूनिया
मडमरे
रैगंवा
देवजेत
पगरा
बरह
सरकारी
कोनी
घोमुख
काटीया
खोमा
हरदुआ
जुरा बरोही
बिजदाह
तियारा
सिमरिया
संकतरा
पवई
खबरी
ककरी
सिमरिया
करहिया
बाहोली
अतरहाई
हथकुरी
सैनपुर
भगरपुरा
जमहा
मोन्तोरा
सरी
कुसमी
हीरापुर
बिरपुरा
मोहेरिया
शिकारपुरा
शाहनगर
मोहनद्रा
कुटारी
बसोरा
कोठी
मैनहा
डुगरिया
महाराजगंज
गोरी
सोल्या
कलिया
जगसिघा
खलातोला
नादन
चौरा
बारी
बीलेपुरा
दमुइया
कुटाहिया
जोधपुर
झिलमिला
हरदुआकला
रमधान
खजुरी
मरहा
7
हरदुआ मुरता
सुरी
गिघोडा
जुकेही
नवातोला
फतेहपुर घुंहटी
बगरौर सलैया
महगवा
शाहनगर
पुखा
सतराहाई
जरगुवा
सुमरहा
बीजाखेडा
रायपुरा
ज ब ल पु र
जमुनहाइ
A
B
C
D
1
2
3
4
5

## पन्ना जिल्ह्यातील सर्वेक्षित गावे

### (अ) गुन्नोर तालुका

१. पगरा
२. बिलहा
३. हिनौता
४. हतौरी
५. मजगवा सरकार
६. दुआरी
७. रतनपुरा
८. पिपरवहा
९. अंधारखुआ
१०. करहैय्या
११. घटारी
१२. गौरा
१३. झुमठा
१४. हिनौती
१५. बेली
१६. पाली
१७. पाटन कला
१८. टिकरिया
१९. सालघडा
२०. पुरैना
२१. दिघोरा
२२. सलहेवरा
२३. इमलिया मालजु
२४. कांचनपुरा

### (ब) शाहनगर तालुका

१. मेघवा चका
२. हरदुआ मेमारी
३. धरमपुरा
४. कचौरी
५. दुगरगवा
६. रगौली
७. भदरा
८. बुधरौड
९. रेंगवा
१०. परासी
११. पिपरिया
१२. देवरी
१३. आमा
१४. हरवंश पुरा
१५. झिन्ना
१६. बिजा खेडा
१७. लमतरा
१८. ठेपा
१९. चकारभाटा
२०. ठरका
२१. रामपुरा खजौरी

# ❖ संशोधन पद्धती ❖

मध्यप्रदेशमधून जी प्राथमिक माहिती गोळा करण्यात आली त्यासाठी पुढील पद्धतीचा वापर करण्यात आला.

क्षेत्रकार्य सुरू करण्याआधी मध्यप्रदेश बाबत माहिती गोळा केली गेली. मात्र ही माहिती तशी अपुरीच होती. त्यामुळे तेथील निवडलेल्या जिल्ह्याच्या ठिकाणी जाऊनच माहिती मिळवावी लागली. इंदोर येथील परिचितांच्या ओळखीने निवडलेल्या तालुक्यातील मान्यवर व्यक्तींशी संपर्क साधण्यात आला व त्यांच्यामार्फत संशोधन समन्वयकाची रहाण्याची सोय तसेच संशोधन सहाय्यकाची निवड करण्यात आली.

धार जिल्ह्यासाठी निवडलेले संशोधन सहाय्यक पदवी शिक्षण घेणारे युवक होते. इंदोर जिल्ह्यामध्ये कुष्ठरोग प्रकल्पावर काम करणाऱ्या तरूण कर्मचाऱ्यांची मदत झाली. छत्रपूर व पन्ना जिल्ह्यामध्ये जिल्हा वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या व तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मदतीने तालुक्याच्या ठिकाणी काम करणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांना संशोधन सहाय्यक म्हणून निवडले गेले. या कर्मचाऱ्यांना तालुक्यातील सर्व गावांची माहिती असल्याने संशोधनास चांगली मदत झाली.

प्रत्येक तालुक्यामध्ये निवडलेल्या संशोधन सहाय्यकांना प्रश्नावली कशी भरावी यासंदर्भात संपूर्ण दिवसाचे प्रशिक्षण देण्यात आले - प्रश्न कसे विचारायचे, त्यातून कोणती माहिती मिळणे आवश्यक आहे, स्थानिक बोली भाषेतून हे प्रश्न कसे विचारता येतील याची चर्चा करण्यात येत असे. इंग्रजीमधून असलेल्या प्रश्नावलीचे स्थानिक बोलीभाषेत रूपांतर करून घेतले जायचे व प्रश्न विचारण्यात सराव करून घेण्यात यायचा.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तालुक्यातील रस्त्यांचा नकाशा घेऊन, तालुक्यातील मुख्यालयापासून ते सीमेपर्यंत असलेला सर्वात जास्त लांबीचा रस्ता स्थानिक व्यक्तींच्या सल्ल्याने निवडला जायचा. गावांना भेटी देण्यासाठी स्थानिक जीप चार दिवसांसाठी भाड्याने घेतली जायची.

सर्वप्रथम निवडलेल्या सर्वात लांब मार्गावर जीपमधून प्रवास करून वाटेत लागणारी सर्व गावे, त्यांचे मुख्य रस्त्यापासूनचे अंतर, अंदाजे लोकसंख्या, एकूण घरे याबद्दलच्या माहितीची नोंद केली जायची. तालुका सीमेपर्यंत प्रवास झाल्यानंतर एन.सी.ए.ई.आर. ने घालून दिलेल्या मार्गदर्शक

तत्त्वांनुसार नोंद केलेल्या गावांच्या यादीतून २५ गावांची निवड केली जायची.

त्यानंतर निवड केलेल्या गावांना भेट दिली जायची. गावातील सार्वजनिक ठिकाणी- मंदिर, चौपाल (आपल्याकडची चावडी) ग्रामपंचायत अशा ठिकाणी गावकऱ्यांची सभा बोलावली जायची. गावातील सर्व जातीजमातीच्या लोकांना त्याठिकाणी बोलवले जात असे. सरपंच व ग्रामपंचायत सदस्य तसेच गावातील इतर मान्यवर व्यक्तींच्या उपस्थितीत सभा घेतली जायची. रामराम, नमस्काराच्या औपचारिकतेनंतर गावकऱ्यांना संशोधन गटाची ओळख करून दिली जायची. गावामध्ये येण्याचे प्रयोजन तसेच पायाभूत सोयीसुविधांच्या अभ्यासाची पूर्ण कल्पना दिली जायची व त्यांच्याकडून सहकार्य मागितले जायचे. गावकऱ्यांनी प्रश्न विचारण्यास संमती दिल्यानंतर प्रश्नावलीतील प्रश्न विचारण्यास सुरूवात केली जायची.

लोकांना स्थानिक बोलीभाषेतून प्रश्न विचारले जायचे. एक जण प्रश्न विचारायचा तर दुसरा उत्तरे नोंदवायचा. लोकांना प्रश्न न समजल्यास, अधिक माहिती हवी असल्यास, शंका असल्यास संशोधन समन्वयक त्या गोष्टींचे निराकरण करत असे. भरून झालेली प्रश्नावली संशोधन समन्वयक तपासत असे व काही त्रुटी असल्यास दूर केल्या जात असत.

प्रश्नावली भरून झाल्यानंतर उपस्थित लोकांचे आभार मानून सभा संपत असे. त्यानंतर लोकांच्या बरोबर गावातून फेरफटका मारला जायचा. मुख्य गावातून तसेच 'हरिजन वस्ती' मधून पण गावातील अंतर्गत रस्ते, अनधिकृत वीजजोड, पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत, सार्वजनिक स्वच्छता, सार्वजनिक दूरध्वनी याबाबत निरीक्षण करून नोंदी केल्या जायच्या, आवश्यकता वाटल्यास लोकांना प्रश्न विचारले जायचे.

मुख्य गाव व हरिजन वस्तीतून फेरफटका मारून आल्यानंतर सर्वांचे आभार मानून पुढील गावाकडे प्रयाण व्हायचे.

अशा प्रकारे क्षेत्रकार्यामधून प्रश्नावली भरून गोळा करण्यात आलेली आकडेवारी संगणकामध्ये विंडोज एक्सेल या पॅकेजमध्ये भरण्यात आली. मध्यप्रदेशमधील १८५ गावांच्या आकडेवारीचे संगणकाच्या मदतीने विश्लेषण करून तयार केलेल्या तक्त्यांचा वापर अहवालामध्ये करण्यात आला.

❑❑❑

# ❖ अभ्यास करताना आलेल्या अडचणी ❖

१. एन.सी.ए.ई.आर. ने तालुक्यातील गावे निवडण्यासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे घालून दिली होती. मात्र ही मार्गदर्शक तत्त्वे पाळणे सर्वच तालुक्यातून शक्य झाले नाही.

(अ) धार जिल्ह्यातील मनावर आणि छत्रपूर जिल्ह्यातील गौरीहार हे दोन तालुके आकाराने अतिशय छोटे आहेत. त्यामुळे या तालुक्यांमध्ये सर्वात मोठ्या लांबीच्या रस्त्यावर कमीत कमी आवश्यक असलेली २० गावे मिळणे देखील अवघड झाले. दुसऱ्या रस्त्यावरची काही गावे सर्वेक्षणासाठी निवडण्यात आली.

(ब) शाहनगर (जिल्हा पन्ना) या तालुक्यातील केवळ १/३ गावांनाच जायला तालुक्यापासून थेट रस्ता आहे. इतर २/३ गावांना पोहोचण्यासाठी शेजारच्या तालुका अथवा जिल्ह्यातून प्रवास करावा लागतो. त्यामुळे ज्या गावांना थेट रस्ते होते अशी एकूण २१ गावे अभ्यासण्यात आली. सर्वात जास्त लांबीच्या रस्त्यावर केवळ १४ गावेच होती.

२. जोरदार पाऊस, भरून वाहणारे ओढे, चिखलमय रस्ते यामुळे अनेक गावांचा संपर्क क्षेत्रकार्य सुरू असताना तुटला होता. त्यामुळे अशी गावे रद्द करून त्याऐवजी दुसऱ्या पर्यायी गावांची निवड करावी लागली.

३. मध्यप्रदेशात जून - सप्टेंबर २००१ या कालावधीत क्षेत्रकार्य करण्यात आले. हा खरीपाचा हंगाम असल्याने ग्रामीण भागातील लोक शेतीच्या कामात गुंतलेले होते. त्यामुळे काही गावात खूप प्रयत्न करूनही केवळ ५-१० लोकच जमू शकत.

४. लोकसंख्या व घरांची अचूक आकडेवारी ग्रामपंचायतीकडे उपलब्ध नव्हती. जनगणना २००१ ची आकडेवारी अधिकृतपणे घोषित न केल्याने मिळू शकली नाही. त्यामुळे या आकडेवारीसाठी लोकांनी सांगितलेल्या आकडेवारीवरच अवलंबून रहावे लागले.

५. काही गावांमधून अनधिकृत वीज जोडाच्या संदर्भात प्रश्न विचरल्यावर उपस्थित लोकांमध्ये वादावादी झाली.

❑❑❑

# ❖ क्षेत्रकार्य निरीक्षणे ❖

मध्यप्रदेशात चार जिल्ह्यातून क्षेत्रकार्य करायचं होतं तेही धार, इंदोर, छत्रपूर व पन्ना अशा निरनिराळ्या जिल्ह्यातून. या जिल्ह्यातील संस्था वा व्यक्तींशी अजिबातच ओळख नव्हती. त्यामुळे तिथं जाऊन ओळख काढणे, रहाण्याखाण्याची सोय करणे व खेडेगावातून क्षेत्रकार्य करणे हे एक मोठे आव्हानच होते. मात्र क्षेत्रकार्य सुरू झाल्यावर एकातून एक ओळखी निघत गेल्या व माहिती गोळा करण्याचे काम निर्धारित वेळात पार पडू शकले. याकामी मध्यप्रदेशमधील आरोग्य खात्याच्या कर्मचाऱ्यांचा फार उपयोग झाला. अनेक व्यक्तींशी ओळखी झाल्या. क्षेत्रकार्याचा चांगला अनुभव मिळाला. क्षेत्रकार्य करताना केलेली जिल्हावार निरीक्षणे पुढीलप्रमाणे :-

## धार जिल्हा

भिल, भिलाला, पटेलिया या आदिवासी जमातींचे लोक काही ठराविक गावातून आढळले. ठाकूर, जाट, पाटीदार या मुख्य जाती. त्याचबरोबर बलुतेदार जाती व हरिजन थोड्या प्रमाणात आढळले. बंजारा समाज देखील २-३ गावातून असल्याचे दिसले.

जिल्ह्यात शेती हाच मुख्य व्यवसाय. मका, सोयाबीन, कापूस, गहू ही येथील मुख्य पिके. मात्र दोन वर्ष दुष्काळ पडत असल्याने जिल्ह्यात रोजगाराचा मोठा प्रश्न निर्माण झाला असल्याचे क्षेत्रकार्यादरम्यान दिसून आले. त्यामुळे अनेक लोकांनी स्थलांतर केले होते. जिल्ह्यामध्ये चोऱ्या-माऱ्यांच्या प्रमाणातदेखील लक्षणीय वाढ झाली होती.

**रस्ते व वाहतूक -** ग्रामीण भागामध्ये राज्य परिवहन मंडळाच्या बसेस अजिबातच धावत नाहीत, या मार्गांवर खाजगी बसेसच चालतात. सरदारपूर व मनावर या तालुक्याच्या ठिकाणाहून आसपासच्या १०-१५ किलोमीटरच्या परिघात असलेल्या गावांमधून जीप चालतात. गावातील काही लोकांकडे सायकली आहेत, मोटारसायकलींची संख्या फारच कमी.

सरदारपूर ते बदनावर हा ४५ किमी अंतराचा रस्ता अतिशय खराब स्थितीत आहे. हे अंतर कापायला संशोधन गटाला तब्बल दोन तास लागले. स्थानिक लोकांनी सांगितले की हा रस्ता सुमारे ४० वर्षापर्यंत बनवला आहे मात्र त्यानंतर आजतागायत कोणी ढुंकून सुद्धा पाहिलेले नाही. रस्त्याची देखभाल वा दुरूस्ती तर अजिबातच झालेली नाही. गेल्या ४० वर्षात डांबराने एक खड्डा जरी भरला गेला असेल तर शप्पथ. मनावर तालुक्यातील रस्त्यांची परिस्थितीदेखील फारशी काही वेगळी

नव्हती. रस्त्यांबद्दलच्या तक्रारी प्रत्येक गावातून ऐकायला मिळाल्या. ज्या गावांमधून अंतर्गत रस्त्याचे काम झाले होते ते केवळ उच्च जातीय लोकांच्या वस्तीपुरतेच मर्यादित होते. आदिवासी वा हरिजनांच्या वस्तीपर्यंत अजून कोणत्याही पायाभूत सोयीसुविधा पोहोचलेल्या नाहीत.

**वीज -** दिवसात १० तासापेक्षादेखील वीज कमी मिळते, ती सुद्धा आवश्यकता नसताना. आम्ही दिवसभर घराबाहेर असतो तेव्हा वीज असते. संध्याकाळी परत आल्यावर हातपाय धुवून जेवायला बसलो, तोंडात घास घेतला की वीज गेलीच म्हणून समजा. मग रात्री उशिरा कधी तरी वीज येते, त्याचा काय उपयोग? अशी प्रतिक्रिया अनेक गावातून ऐकायला मिळाली. राज्य वीज मंडळाचे कर्मचारी अतिशय अकार्यक्षम व भ्रष्टाचारी असल्याचे लोकांनी सांगितले. राज्य सरकार शहरी भागाला नियमित पुरवठा करते तर ग्रामीण भागातील शेतकऱ्याला वाऱ्यावरच सोडून दिले आहे अशी सार्वत्रिक नैराश्याची भावना लोकांमध्ये आढळली.

**दूरध्वनी -** जिल्ह्यात खाजगी दूरध्वनी जोड नगण्य प्रमाणात आहेत. सार्वजनिक दूरध्वनींचे प्रमाणदेखील कमी असून त्यापैकी बहुतांश दूरध्वनी बंद पडलेले आहेत. ग्रामीण भागातून भूमिगत वाहिन्या टाकण्याचे काम भारत संचार निगम लिमिटेड मार्फत जून २००१ मध्ये सुरू होते. हे काम झाल्यानंतर दूरध्वनीच्या परिस्थितीत सुधारणा होईल अशी आशा लोकांनी व्यक्त केली.

**पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता -** जिल्ह्यातील गावांना हातपंपाद्वारे तसेच काही गावातून नळाद्वारे पाणीपुरवठा केला जातो. विंधन विहिरीतून पंपाद्वारे पाणी खेचून गावाला सार्वजनिक नळाद्वारे पाणीपुरवठा केला जातो. मात्र अनियमित वीजपुरवठ्यामुळे पाणीपुरवठ्यात व्यत्यय येतो तसेच साठवण टाकी बांधलेली नसल्याने नळ पाणी पुरवठ्यावर फारच मर्यादा आलेल्या आहेत. हिवाळ्यात शेतीपंपासाठी विजेची मागणी वाढत असल्याने वीज पुरवठा केवळ ४-६ तासच होतो त्यामुळे नळाद्वारे पाणी उपलब्ध न झाल्यास लोकांना लांबून पाणी आणावे लागते. संडासांचा वापर उच्च जातीय लोकांकडून जास्त प्रमाणात केला जातो.

## इंदोर जिल्हा

देपालपूर तालुक्यात कलोता समाज मोठ्या प्रमाणावर वसलेला आहे. राजपूत, पाटीदार, खाती, ठाकूर यांची संख्या मोठी आहे तर हरिजन व अन्य मागासवर्गीय समाजाची लोकसंख्या बऱ्यापैकी आहे.

शेती हाच जिल्ह्यातील लोकांच्या मुख्य व्यवसाय. गहू व सोयाबीन ही पिके मोठ्या प्रमाणावर घेतली जातात. कोबी, टोमॅटो, कोथिंबिर यासारख्या भाज्यादेखील पिकवल्या जातात. अनेक

गावातून दुधाचा जोडधंदा केला जातो. जिल्ह्यात भूगर्भ पाण्याची पातळी फारशी खोल नसल्याने (५० ते १०० फूट) अनेक शेतकऱ्यांनी एकापेक्षा जास्त विंधन विहिरी शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी खोदल्या आहेत.

पीठमपूर ही औद्योगिक वसाहत जवळच असल्याने देपालपूर तालुक्यातील प्रत्येक गावातील सरासरी ५०-१०० लोक कारखान्यामध्ये कामाला जातात.

**रस्ते व वाहतूक** - ग्रामीण भागामध्ये सरकारी बससेवा नाहीच. तालुक्याच्या ठिकाणाहून इतर महत्त्वाच्या गावांसाठी खाजगी बसेसच जास्त चालतात. १५-२० किलोमीटरच्या परिघातील गावांसाठी जीप व तीन चाकी टेंपो चालतात. औद्योगिक कारखान्यातून काम करणाऱ्या कामगारांचा भर सायकल चालवण्याकडे आहे. फारच थोड्या प्रमाणात स्वयंचलित दुचाकी वाहने दिसतात.

पावसाळ्यामध्ये कच्च्या रस्त्यांची फारच दयनीय अवस्था झालेली बघायला मिळाली. ट्रॅक्टरसारखी वाहने जाऊन, चिखल झाल्याने गावामध्ये चालणे कठिण होऊन बसले होते. ज्या गावातून अंतर्गत रस्ते झाले होते त्याची व्याप्ती केवळ, उच्च जातीच्या भागापुरतीच मर्यादित होती. गावकुसाच्या बाहेर असलेल्या 'हरिजन बस्ती' पर्यंत रस्ते अजून पोहचलेलेच नाहीत. हे लोक दुर्दैवाच्या फेऱ्यातच अडकलेले दिसले. पावसाचे पाणी अथवा घरातील सांडपाण्याच्या निचऱ्यासाठी कोणतीही व्यवस्था असल्याचे दिसले नाही.

इंदोर-नेमावर हा राज्य महामार्ग क्रमांक २२ अतिशय खराब असून पावसाळ्यामुळे तर परिस्थिती अधिक बिकट बनली होती. रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनांना खड्ड्यामधून वाट शोधत मार्गक्रमण करावे लागत होते.

**वीज** - इतर जिल्ह्यांप्रमाणेच इंदोर जिल्ह्यात देखील ग्रामीण भागातील वीज परिस्थिती अतिशय गंभीर आहे. दिवसातून सरासरी ७-८ तासच वीज उपलब्ध होते. रब्बी हंगामाच्या वेळेस शेतीला पाणी पुरवठ्यासाठी विजेची आवश्यकता असते. पुरवठा मात्र केवळ ३-४ तासच होतो. शेतकऱ्यांनी पिके वाचवण्यासाठी दिवसाला पाच-पाचशे रूपये खर्च करून डिझेल पंपांनी शेतीला पाणी दिले. हंगामासाठी ५०,००० रूपये अंदाजे डिझेलचा खर्च आला. वीज देयकासंबंधित तक्रारी गावागावातून ऐकायला मिळाल्या. शहरी व ग्रामीण भागात वीज पुरवठा करताना भेदभाव केला जातो अशी लोकांची सार्वत्रिक तक्रार.

दोन वर्षापूर्वीपर्यंत वीज पुरवठ्यासाठी लागणाऱ्या सर्व साहित्याचा खर्च राज्य वीज मंडळ करत असे. आता त्यासाठीचा खर्च लोकांकडूनच वसूल केला जातो. त्याबद्दल गावकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली.

काही गावातून वीज पुरवठ्यासाठी आवश्यक असलेल्या खांबांची उभारणी 'हरिजन वस्तीच्या' दारापर्यंत देखील पोहोचलेली नाही, हरिजनांची घरे विजेच्या दिव्यांनी उजळून जाण्याचे स्वप्न तर दूरच.

**दूरध्वनी -** मध्यप्रदेशातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेने इंदोर जिल्ह्यात त्यामानाने दूरध्वनींची स्थिती व उपलब्धी बरी म्हटली पाहिजे. मात्र चांगली सेवा मिळवण्यासाठी खात्याच्या कर्मचाऱ्यांना लाच द्यावी लागते असे लोकांनी सांगितले.

छोटी बेटमामधील एकाने सांगितले की सहा वर्षापूर्वी दूरध्वनीसाठी लागणारी अनामत रक्कम भरली तरीही दूरध्वनीजोड मिळाली नाही. कारण इतरांसारखी कर्मचाऱ्यांना त्याने लाच दिली नाही. त्याच्या नंतर अनेक लोकांनी लाच देऊन तातडीने दूरध्वनी जोड मिळवले. कोणाकडे दाद मागायची या विवंचनेत तो सध्या आहे.

**पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता -** पिण्याच्या पाण्यासाठी हातपंप तसेच विंधन विहिरी उपलब्ध आहेत. मात्र वीज पुरवठ्यातील अनियमिततेमुळे पाणीपुरवठ्यावर परिणाम होतो. शंकरपुरा येथील गावकऱ्यांनी स्वतः पुढाकार घेऊन लोकवर्गणीतून अपूर्ण योजना पूर्ण करून गावातील पाण्याचा प्रश्न सोडवला.

गलोंदा या गावातील निम्म्यापेक्षा जास्त घरातून सांडपाण्याचा निचरा शोषखड्ड्यातून होत असल्याचे दिसले. गावातील काही युवक पांडुरंगशास्त्री आठवल्यांच्या स्वाध्याय परिवाराच्या संपर्कात आले. परिवाराच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन गावामध्ये श्रमदानातून शोषखड्डे बांधले. इतर गावातून मात्र सांडपाण्याच्या निचऱ्यासाठी कोणतीही व्यवस्था नाही. त्यामुळे विशेष करून पावसाळ्यामध्ये सार्वजनिक स्वच्छतेचा मोठा प्रश्न निर्माण होतो.

## छत्रपूर जिल्हा

जिल्ह्यातील गावांमध्ये जाट, ठाकूर, ब्राम्हण या जातींचे प्राबल्य आहे त्याचबरोबर हरिजन व इतर छोट्या छोट्या जाती देखील आढळतात.

शेती हाच येथील मुख्य व्यवसाय आहे मात्र त्याच्याबरोबरीने दुग्ध व्यवसायासारखे जोडधंदे अभावानेच आढळतात. जिल्ह्यात उद्योगधंदे फारसे नाहीत. येथील लोक दिल्ली, हरियाना व आसपासच्या औद्योगिक भागात अकुशल कामगार म्हणून काम करायला जातात.

गौरीहार तालुका हा तर फारच मागासलेला. जिल्ह्याच्या ठिकाणाहून इथं यायला दिवासातून

फक्त तीन बसेस. शेजारच्या उत्तर प्रदेशातील बांदा, महोबा या जिल्ह्यांशी त्यामानाने जास्त संपर्क. तालुक्याचं ठिकाण असलं तरी खेडेगावच. जेवणासाठी साधी खानावळदेखील उपलब्ध नाही. क्षेत्रकार्यादरम्यान गौरीहार पासून जवळच असलेल्या ६ किमी अंतरावरच्या गावामध्ये कॉलऱ्याची साथ सुरू झाली. तिथं पोहोचायला धड रस्ता नाही. बैलगाडीतून रूग्णांना प्राथमिक आरोग्य केंद्रात आणेपर्यंत दोन १०-१२ वर्षांची मुले मरण पावली. इतर रूग्णांना जागेअभावी आरोग्यकेंद्राच्या आवारातच सलाईन लावून वाचवण्यात कर्मचाऱ्यांना यश आले. तालुक्याच्या ठिकाणीच एवढे मागासलेपण तर इतर गावातून काय परिस्थिती असेल याची पुरेपुर कल्पना आली.

**रस्ते व वाहतूक -** जिल्ह्यातील कुठल्याच गावामध्ये पक्के अंतर्गत रस्ते आढळून आले नाहीत अपवाद फक्त गढी या गावाचा. नौगाव तालुक्यातील बाह्य रस्त्यांच्या अवस्था अतिशय शोचनीच होती. गौरीहार तालुक्यात पक्का डांबरी रस्ता मिळणे अवघड. जिल्हा मुख्यालय छत्रपूरला जोडणारा रस्ताच केवळ डांबरी होता. या रस्त्याचे एप्रिल २००१ मध्ये डांबरीकरण झाले होते मात्र ४ महिन्यातच त्याला जागोजागी खड्डे पडले. रस्त्याचे बांधकाम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाले असून रस्तेबांधणीत खूप मोठा भ्रष्टाचार झाला असल्याचे लोकांनी सांगितले.

नौगाव तालुक्यात वाहतुकीसाठी खाजगी बस, जीप यासारखी अनेक साधने उपलब्ध आहेत. याउलट गौरीहार जिल्ह्यात काही बसेस सोडल्या तर ग्रामीण भागातील लोकांना अन्य कोणतेही साधन उपलब्ध नाही.

छत्रपूर जिल्ह्यात रस्ते विकास फारसा नाहीच म्हटला तरी चालेल. नद्या, नाले यावर पूल, मोऱ्या बांधलेल्या नसल्याने पावसाळ्यात अनेक दिवस गावांचा संपर्क तुटतो, वाहनातून गावापर्यंत पोहोचणे अशक्य होते. संशोधन गटालादेखील त्याचा अनुभव आला त्यामुळे काही गावांना जाणे रद्द करावे लागून त्याऐवजी पर्यायी गावातून माहिती गोळा करावी लागली.

**वीज -** जिल्ह्यातील वीज उपलब्धता यथातथाच आहे. काही गावातून वीज वाहक तारा खांबावरून गेल्या असल्या तरी त्या गावात मात्र वीज जोड दिलेले नाहीत. अनियमित वीज पुरवठ्याबाबत अनेक गावातून तक्रारी ऐकायला मिळाल्या. मात्र आश्चर्याची गोष्ट म्हणजे, नविन वीज जोड घेताना कर्मचाऱ्याला लाच द्यावी लागत नाही असे बहुतांश गावातून लोकांनी सांगितले.

**दूरध्वनी -** दूरध्वनी सेवेच्या बाबतीत छत्रपूर जिल्हा अतिमागास असे म्हटले पाहिजे. ग्रामीण भागातून क्वचितच सार्वजनिक वा खाजगी दूरध्वनी उपलब्ध आहे. आणि ज्या गावात दूरध्वनी आहे तेथे महिन्यातून केवळ १०-१५ दिवसच सेवा सुरळीतपणे चालते.

**पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता -** जिल्ह्यामध्ये भूगर्भ पाण्याची पातळी फारशी खोल नाही. १५-२० फुटांपासून ते जास्तीतजास्त ५० फुटापर्यंत पाणी लागते आणि ते वर्षभर पुरते. अनेक गावातून लोकांनी स्वतःच्या घराच्या आवारात खाजगी विहिरी खोदून घेतल्या आहेत. वर्षभर भरपूर पाणी उपलब्ध असल्याने जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याच्या पाण्याबद्दल कोणतीही समस्या नाही मात्र पावसाळ्यात अशुद्ध पिण्याचे पाणी मिळत असल्याने त्यापासून होणाऱ्या साथीच्या रोगांचे व मृत्युंचे प्रमाण देखील मोठे आहे. हे सहज टाळता येऊ शकते.

सांडपाण्याचा निचरा करण्यासाठी गावात कोणत्याही प्रकारची व्यवस्था छत्रपूर जिल्ह्यात आढळून आली नाही. मात्र घरातील सांडपाण्याचा निचरा बाहेर साठवण खड्ड्यात केला जातो. हा साठवण खड्डा सांडपाण्याने भरल्यावर ते पाणी बादलीने उपसून परसबागेत अथवा गावाबाहेर नेऊन टाकले जाते.

## पन्ना जिल्हा

जिल्ह्यातील गावांमधून अठरा पगड जाती दिसतात. त्यामध्ये ठाकूर, जाट, ब्राम्हण या स्वतःला उच्च समजणाऱ्या जाती आहेत तसेच इतर मागासवर्गीय व हरिजन पण आहेत.

जिल्ह्यातील बहुतांश लोकसंख्या शेतीवरच अवलंबून आहे. शहरी व औद्योगिक केंद्राची वाढ अजिबातच दिसत नाही. त्यामुळेच हरियाना, दिल्ली येथे मोलमजुरी करण्यासाठी थोड्या प्रमाणात स्थलांतर होते. हिऱ्यांच्या खाणींसाठी जगप्रसिद्ध असलेल्या या जिल्ह्यातून फिरताना मात्र ग्रामीण भागाचे अतिमागासलेपण ठळकपणे नजरेत भरते. येथील एका नागरिकाने 'खाऊ लोगों का जिला' (खाणाऱ्या (भ्रष्टाचारी) लोकांचा जिल्हा) असे या जिल्ह्याचे वर्णन केले.

**रस्ते व वाहतूक -** मागास अशा या जिल्ह्यातील निम्म्या गावांच्या आतील रस्ते मात्र 'फरशीकरण' झालेले दिसतात. याचे मुख्य कारण म्हणजे जवळच्याच डोंगरात उपलब्ध असलेली फरशी. गावागावांना जोडणारे रस्ते मात्र कच्चे व खराब असल्याचे दिसते. तालुक्यातून जाणारा मुख्य रस्ता सोडल्यास इतर कुठलाही रस्ता डांबरी झालेला नाही. शाहनगर तालुक्यात तर तालुका मुख्यालयापासून केवळ एक तृतीयांश गावांनाच थेट रस्त्याने जाता येते उरलेल्या दोन तृतीयांश गावांना जाण्यासाठी शेजारच्या तालुक्यातून वा जिल्ह्यातून वळसा घालून मगच जाता येऊ शकते. तेथे डोंगराळ भागात रस्त्यांचा विकास अजिबातच झालेला नाही. पन्ना ते कटनी हा सुमारे १०० किलोमीटर लांबीचा राज्य

महामार्ग जवळजवळ कच्चाच आहे. त्यावर काही किलोमीटर (५-१०) लांबीचे डांबरी तुकडे मधेमध्ये आढळून येतात. अशा रस्त्यावरून प्रवास करणे हे मोठे अग्निदिव्यच असते.

रस्तेबांधणीमध्ये जिल्ह्यात सर्वाधिक भ्रष्टाचार असल्याचे लोकांनी सांगितले. जिल्ह्यामध्ये रस्त्यासाठी पैसा मंजूर झाला की जिल्हाधिकारी स्वतःचा ३०% वाटा काढून घेतो. त्यानंतर तो पैसा जनपद पंचायतीकडे (पंचायत समिती) येतो तेथील अधिकारी व कर्मचारी आपला २०% वाटा काढून घेतात. मग तो ग्रामपंचायीकडे येतो तेथे सरपंच, सचिव (ग्रामसेवक), सदस्य व कंत्राटदार आपआपला वाटा घेतात. अशा प्रकारे केवळ १०% रक्कमच प्रत्यक्ष कामावर खर्च होते तर मग कसा काय रस्ते विकास होणार? हीच गत अन्य विकास कामांची पण आहे. भ्रष्टाचाराचा नायनाट करणे अवघड आहे. अशी सर्वसामान्य लोकांची प्रतिक्रिया होती.

**वीज** - पन्ना जिल्ह्यातदेखील वीज उपलब्धता फारशी आनंददायक नाही. गुन्नोर सारख्या तालुक्याच्या ठिकाणीदेखील रात्री केवळ २ ते ४ तास वीज उपलब्ध असते. याचा चांगलाच अनुभव संशोधन करताना आला. ग्रामीण भागातील जनता वीज परिस्थितीबद्दल हतबल झालेली दिसते.

**दूरध्वनी -** खेडेगावातून अपवादात्मक परिस्थितीत दूरध्वनी उपलब्ध आहेत. ज्या गावातून सार्वजनिक दूरध्वनी उपलब्ध होते तेथे ते वर्षानुवर्षे बंद अवस्थेतच असल्याचे आढळले.

**पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता -** पन्ना जिल्ह्यामध्ये पिण्याचे पाणी ही ग्रामीण भागातील मुख्य समस्या आहे. या भागामध्ये टेकड्या बऱ्याच आहेत तसेच थोडे जरी खोदले तरी खडक लागतो. त्यामुळेच अनेक गावातून विंधन विहिरी खणण्याचे राज्य सरकारचे प्रयत्न अयशस्वी ठरल्याचे दिसून येते. अशा भौगोलिक परिस्थितीमुळे येथील लोक पिण्याच्या पाण्यासाठी झरे, ओहोळ, तलाव अथवा विहिरींवरच अवलंबून आहेत.

पन्ना जिल्ह्यातील अनेक गावे छोट्या छोट्या टेकड्यांच्या पायथ्याशी वसलेली आहेत. पावसाळ्यामध्ये टेकड्यांवरून येणारे पाणी गावातील रस्त्यावर साचून सार्वजनिक स्वच्छतेचा मोठा प्रश्न निर्माण होतो. गावातील अंतर्गत रस्त्याच्या कडेने पावसाच्या पाण्याच्या निचऱ्यासाठी कोणतीही व्यवस्था नाही. बहुतांश गावातून संडास नाहीत त्यामुळे पावसाळ्यामध्ये महिलांची फार मोठी गैरसोय होते.

❑❑❑

## ❖ क्षेत्रकार्य करत असताना लोकांनी व्यक्त केलेल्या काही निवडक प्रतिक्रिया ❖

### रस्ते

♦ *"हमारे गाव में ठेकेदारने २ किलोमीटर की लंबाईवाले रास्ते के बजाय १.८ किमी का रास्ता ही बनाया।"* - ग्रामस्थ, सिंधी बरोदा, जि. इंदोर

♦ *"यहाँ के रस्ते बेकार है, कोई देखभाल नही करता।"* - ग्रामस्थ, बोदली, जि. धार

♦ *"अगर गाव मे अच्छे रास्ते बन गये तो - सिधी सडक, बेधडक। हम कही भी जल्दी से आ - जा सकेंगे।"* - ग्रामस्थ गलोंडा, जि. इंदोर

♦ *"जैसे मरे हुए जानवर के उपर गिध झपटता है वैसेही जब सरकारी योजना के लिए पैसा आता है तो सभी लोग - अधिकारी और नेतागण टूट पडते है। कुछ काम नही बन पाता।"* - ग्रामस्थ, सेजवानी, जि. इंदोर

♦ *"गाव के लिए बिलकुल रास्ता नही है। गाडी भी पहुँच नही सकती। बरसात में तो पैदल चलना भी मुश्किल हो जाता है।"* - ग्रामस्थ, चितहरी, जि. छत्रपूर

### दूरध्वनी

♦ *"टैलिफोन विभाग के कर्मचारी तो सब सरकारी जमाई है। इस विभाग में ९०% भ्रष्टाचार है।"* - ग्रामस्थ, गढी, जि. इंदोर

♦ *"गाँव में ५० लोगोने फोन के लिए पैसे एक साल पहले ही भर दिये है। लेकिन आज तक कुछ भी हुआ नही है।"* - ग्रामस्थ, बावलिया खुर्द, जि. इंदोर

♦ *"हमारे गॉव में ३ साल पहले ग्रामपंचायत में टेलिफोन लगाया गया। १०-१५ दिन चला, उसके बाद से आज तक बंद है। इसमें हमारी भी कुछ गलती है मानना चाहिए। कुछ लोग तार काटते है।"* - ग्रामस्थ, सोन गुराडिया, जि. इंदोर

♦ *"यहाँ गाव में रात के समय झाबुआ जिले के लोक आकर लूटमार करते है। इसलिए गाव में टेलिफोन होना बहोत जरूरी है। हम पुलिस को बुला सकते है।"*

- ग्रामस्थ, नयापुरा, जि. धार

### वीज

♦ *"बिजली बोर्ड का लाइनमन गॉव में आता ही नही है। हम लोग ही फाल्ट निकालते है।"* - ग्रामस्थ, मालीखेडा, उमरिया खुर्द, जि. इंदोर

◆ *"दिन में जब हम लोग खेत पर काम करने के लिए जाते है तो बिजली रहती है। उस समय हमें जरूरत नही पडती। जब शाम को वापस लौटकर खाना खाने बैठ जाते है तो बिजली गायब हो जाती है। रात को ११-१२ बजने के बाद वापस आती है।"*
- ग्रामस्थ, राजपुरा, जि. इंदोर

◆ *"गाव में ४-५ साल से बिजली नही है। उस समय ट्रान्सफॉर्मर जल गया था, किसीने ध्यान नही दिया। बाद में बिजली के तार भी चोरी हो गये। शिकायते तो बहोत की लेकिन कोई सुनता ही नही है।"* - ग्रामस्थ, हरदुआ, जि. पन्ना

◆ *"हमारे गाव के बीच में से ही बिजली की लाईन गयी है। लेकिन फिर भी १८ साल से आज तक हमारे गाव मे बिजली नही है। यह इक तरह की सामंतशाही ही है। इस सामंतशाही पे कंट्रोल होना चाहिए तब तक गाव की तरक्की नही हो सकती।"*
- अंध ग्रामस्थ, बजरंगपुरा, जि. छत्रपूर

◆ *"बिजली का व्होल्टेज इतना कम रहता है के थ्री फेज वाले कनेक्शन को अगर आप हाथ भी लगा लो तो भी कुछ नही होता।"* - ग्रामस्थ, धन्नाड, जि. इंदोर

## पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता

◆ *"अल्याना - नोलाना गाव, मुख्यमंत्री के रिश्तेदार का गाव है इसलिए वहाँ पैसा लगाया गया। युनिसेफ की स्कीम द्वारा वहाँ पानी की टंकी बनवायी गयी, नलजल योजना बन सकी। हमारे गाव में ऐसी योजना थोडेही बन सकती है?"*
- ग्रामस्थ, रोलाय, जि. इंदोर

◆ *"मेरे तीन लडकों को सुबह उल्टी-दस्त शुरु हो गयी। बारह साल का लडका गाव में ही मर गया। बाकी के दो लडकों को लेकर मै बैलगाडी में डालकर यहा सरकारी अस्पताल में ले आया। वो दोनो बच गये। हमारा गाव तहसिल के गाव से ६ किलोमीटर दूर है। हमारे गाव में सभी लोग हँडपंप का ही पानी पिते है।"* - ग्रामस्थ, ता. गौरीहार, जि. छत्रपूर

◆ *"पन्ना जिला तो मध्यप्रदेश में सबसे पिछडा हुआ जिला है। इसे लोक 'खाऊ' लोगों का जिला बोलते है। चाहे जो भी सरकारी योजना आजाए, कलेक्टर से ले के ग्रामपंचायत तक सब लोग अपना अपना हिस्सा बांट लेते है। पचास प्रतिशत से कम राशी काम में लग जाती है, तो जिले का कैसे विकास हो पाएगा ।"* - ग्रामस्थ पगरा, जि. पन्ना

❑❑❑

# ❖ मध्यप्रदेश : पाहणीचे निष्कर्ष ❖

मध्यप्रदेशाच्या नैऋत्य भागातील धार आणि इंदोर या जिल्ह्यातून तर उत्तर प्रदेशच्या सीमेला लागून असलेल्या छत्रपूर आणि पन्ना या जिल्ह्यांमधून पायाभूत सोयीसुविधांच्या संदर्भात सर्वेक्षण करण्यात आले. पाहणीमधून ठळकपणे पुढे आलेले निष्कर्ष तक्त्यांच्या स्वरूपात मांडून त्यावर चर्चा केली आहे. त्यावरून मध्यप्रदेशच्या ग्रामीण भागातील परिस्थितीची कल्पना येईल.

**तक्ता क्र. १ : जिल्हावार सर्वेक्षण केलेली लोकसंख्या**

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| एकूण सर्वेक्षण केलेली लोकसंख्या | ६८,५३६ | ५०,४१७ | ५८,१७९ | ५३,०१० | २,३०,१४२ |
| पुरूष | ३५,९०६ | २५,३०५ | २९,९६० | २७,८८४ | १,१९,०५५ |
| % | ५२.४% | ५०.२% | ५१.५% | ५२.६% | ५१.७% |
| स्त्रिया | ३२,६३० | २५,११२ | २८,२१९ | २५,१२६ | १,११,०८७ |
| % | ४७.६% | ४९.८% | ४८.५% | ४७.४% | ४८.३% |

वरील तक्त्यामध्ये मध्यप्रदेशमधील सर्वेक्षित गावांमधून किती लोकसंख्या होती व पुरूष आणि स्त्रियांचे प्रमाण टक्केवारीसह दाखवण्यात आले आहे. प्रत्येक जिल्ह्यामधून सर्वेक्षण करण्यात आलेली गावे पुढील प्रमाणे - छत्रपूर (४४), धार (४७), इंदोर (४९), पन्ना (४५). अशा प्रकारे मध्यप्रदेशातून एकूण १८५ गावांमधून पायाभूत सोयीसुविधांविषयक माहिती घेण्यात आली.

सर्वेक्षित गावांपैकी छत्रपूर जिल्ह्यामध्ये सर्वात जास्त (६८,५३६) तर धार जिल्ह्यामध्ये सर्वात कमी (५०,४१७) लोकसंख्या असल्याचे दिसते. या सर्वेक्षणादरम्यान मध्यप्रदेशातील २,३०,१४२ लोकसंख्या सर्वेक्षित केली गेली.

## तक्ता क्र. २ : गावाची सरासरी लोकसंख्या

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| गावाची सरासरी लोकसंख्या | १,५५८ | १,०७३ | १,१८७ | १,१७८ | १,२४४ |
| पुरूष | ८१६ | ५३९ | ६११ | ६२० | ६४४ |
| % | ५२.४% | ५०.२% | ५१.५% | ५२.६% | ५१.७% |
| स्त्रिया | ७४२ | ५३४ | ५७६ | ५५८ | ६०० |
| % | ४७.६% | ४९.८% | ४८.५% | ४७.४% | ४८.३% |

वरील तक्त्यामध्ये जिल्हावार गावाची सरासरी लोकसंख्या व सरासरी पुरूष व स्त्रियांची संख्या दर्शवली आहे. छत्रपूर जिल्ह्यामध्ये गावातून (१,५५८) दाट लोकवस्ती असल्याचे दिसते. तर धार या आदिवासी बहुल जिल्ह्यात गावामागे केवळ सरासरी १,०७३ लोकसंख्या असल्याचे दिसते. इंदोर (१,१८७) व पन्ना (१,१७८) या दोन्ही जिल्ह्यातील गावांमधून जवळजवळ सारख्याच प्रमाणात गावची लोकसंख्या असल्याचे पहायला मिळते.

गावातील पुरूष व स्त्रियांच्या सरासरी लोकसंख्येच्या बाबत देखील हाच क्रम असल्याचे दिसून येते.

मध्यप्रदेशातील गावामध्ये सरासरी १,२४४ लोक रहात असल्याचे, त्यापैकी ६४४ (५१.७%) पुरूष आणि सुमारे ६०० (४८.३%) महिला असल्याचे तक्त्यावरून स्पष्ट होते.

सर्वेक्षित गावांमधून रहात असलेल्या अनुसूचित जातींची जिल्हावार लोकसंख्या, गावातील सरासरी आणि टक्केवारी तक्ता क्र. ३ मध्ये दाखवली आहे.

छत्रपूर जिल्ह्यामध्ये अनुसूचित जातीची लोकसंख्या सर्वात जास्त म्हणजे गावामागे ५८८ तर धार जिल्ह्यामध्ये सर्वात कमी म्हणजे केवळ ६६ असल्याचे दिसते.

एकूण लेकसंख्येशी अनुसूचित जातीच्या लोकांची टक्केवारी काढली असता पुढीलप्रमाणे क्रम लावता येईल - छत्रपूर (३७.७%), पन्ना (२२.९%), इंदोर (१६.२%), धार (६.१%) यावरून असे म्हणता येईल की मध्यप्रदेशच्या उत्तर भागातील जिल्ह्यामध्ये अनुसूचित जातींचे प्रमाण तुलनेने जास्त आहे.

मध्यप्रदेशमध्ये एका गावामध्ये सरासरी अनुसूचित जमातीचे २७३ लोक रहात असल्याचे व त्यांची टक्केवारी सुमारे २२% असल्याचे दिसते.

**तक्ता क्र. ३ : अनुसूचित जातीची सर्वेक्षित गावातील लोकसंख्या**

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| एकूण लोकसंख्या | ६८,५३६ | ५०,४१७ | ५८,१७९ | ५३,०१० | २,३०,१४२ |
| अनुसूचित जातीची लोकसंख्या | २५,८५७ | ३,०८१ | ९,४५२ | १२,१२० | ५०,५१० |
| गावातील अनुसूचित जातीची सरासरी लोकसंख्या | ५८८ | ६६ | १९३ | २६९ | २७३ |
| एकूण लोकसंख्येशी टक्केवारी | ३७.७% | ६.१% | १६.२% | २२.९% | २१.९% |

**तक्ता क्र. ४ : अनुसूचित जमातींची सर्वेक्षित गावातील लोकसंख्या**

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| एकूण लोकसंख्या | ६८,५३६ | ५०,४१७ | ५८,१७९ | ५३,०१० | २,३०,१४२ |
| अनुसूचित जमातीची लोकसंख्या | ० | २५,३०४ | ३,८६३ | ८,३४२ | ३७,५०९ |
| गावातील अनुसूचित जमातीची सरासरी लोकसंख्या | ० | ५३८ | ७९ | १८५ | २०३ |
| एकूण लोकसंख्येशी टक्केवारी | ०% | ५०.२% | ६.६% | १५.७% | १६.३% |

अनुसूचित जमातीच्या बाबत मात्र मध्यप्रदेशात वेगळे चित्र पहायला मिळते. छत्रपूर जिल्ह्यातील एकाही गावातून अनुसूचित जमातींची कुटुंबे आढळली नाहीत. तर त्या शेजारच्या पन्ना जिल्ह्यातील गावात सरासरी १८५ लोक होते. इंदोर जिल्ह्यामध्ये अत्यंत थोड्या प्रमाणात (७९) तर धार जिल्ह्यामध्ये (५३८) बहुसंख्येने अनुसूचित जमाती असल्याने पहायला मिळाले. धार जिल्ह्यामध्ये भिल, भिलाला आणि पटेलिया या मुख्य आदिवासी जमाती रहातात.

अनूसूचित जमातींची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी काढली असता पुढील चित्र पहायला मिळते. छत्रपूर (०%), इंदोर (६.६%), पन्ना (१५.७%) आणि धार जिल्हा (५०.२%).

मध्यप्रदेशाचा विचार केला असता असे दिसते की येथे एका गावातून अनुसूचित जमातीचे सरासरी २०३ लोक रहातात व त्यांचे एकूण लोकसंख्येशी १६.३% एवढे प्रमाण आहे.

**तक्ता क्र. ५ : गावातील सरासरी घरसंख्या आणि स्थलांतर**

| **जिल्हा** | **छत्रपूर** | **धार** | **इंदोर** | **पन्ना** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|
| **एकूण सर्वेक्षित गावे** | **४४** | **४७** | **४९** | **४५** | **१८५** |
| एका गावातील सरासरी घरे | २२६ | १७९ | १६५ | २०८ | १९४ |
| **गावातून स्थलांतर केलेल्या व्यक्तींची सरासरी** | **७** | **३** | **१** | **७** | **४** |

मध्यप्रदेशातील सर्वेक्षित जिल्ह्यातील गावांचा आकार व स्थलांतराची कल्पना वरील तक्त्यावरून येईल.

दाट लोकवस्ती असलेल्या छत्रपूर जिल्ह्यामध्ये एका गावातून सरासरी २२६ घरे आहेत. तर इतर जिल्ह्यात हीच संख्या अशी देता येईल - पन्ना (२०८), धार (१७९), इंदोर (१६५). धार जिल्ह्यातील गावे सर्वात कमी लोकसंख्येची असली तरी तेथे घरे मात्र इंदोर जिल्ह्याच्या तुलनेत जास्त आढळतात. याचाच अर्थ इंदोर जिल्ह्यात गावातील घरांमधून, धार जिल्ह्यापेक्षा तुलनेने जास्त लोक रहातात किंवा कुटुंबाचा आकार जास्त आहे.

मध्यप्रदेशातील गावांमधून आपला कुटुंब कबिला मागे ठेवून नोकरी धंद्यासाठी स्थलांतर करणाऱ्या व्यक्तींची संख्या त्यामानाने फारच कमी आहे.

छत्रपूर आणि पन्ना जिल्ह्यातून प्रत्येक गावातून सरासरी ७ व्यक्ती नोकरी धंद्यासाठी स्थलांतर करताना दिसतात. बहुतांश लोक दिल्ली, पंजाब, हरियाना या राज्यतून काम करत असल्याची माहिती मिळाली. धार (३), इंदोर (१) या जिल्ह्यातून स्थलांतराचे प्रमाण नगण्यच म्हणावे लागेल.

मध्यप्रदेशमध्ये एका गावातून सरासरी १९४ घरे आढळली तर गावातून सरासरी ४ व्यक्ती आपले कुटुंब गावाकडे ठेवून अर्थार्जनासाठी स्थलांतर करत असल्याचे दिसते.

## रस्ते व वाहतूक क्षेत्र

दळणवळण यंत्रणेमध्ये रस्ते अत्यंत महत्वाची भूमिका बजावतात. भौगोलिक क्षेत्रफळाच्या क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकाचे राज्य असलेल्या मध्यप्रदेशमध्ये रस्ते व वाहतूक क्षेत्राचा किती विकास झाला आहे, ग्रामपातळीवर रस्त्यांची काय स्थिती आहे, रस्त्यांच्या बाबत लोकांची काय मते आहेत हे आपण आता जाणून घेऊ.

### तक्ता क्र. ६ : राज्य व राष्ट्रीय महामार्गापासून गावाचे सरासरी अंतर

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| राज्य महामार्गापासूनचे अंतर किमी | १७.८ | ४.३ | ३.५ | १२.५ | ९.३ |
| राष्ट्रीय महामार्गापासूनचे अंतर किमी | २९.१ | ४२.८ | १२.५ | ६७.३ | ३७.५ |

तक्ता क्र. ६ मध्ये जिल्हावार राज्य व राष्ट्रीय महामार्गापासूनचे गावाचे असलेले सरासरी अंतर दर्शवण्यात आले आहे.

इंदोर आणि धार जिल्ह्यामध्ये राज्यमहामार्ग गावांपासून अत्यंत जवळ असल्याचे दिसते. या जिल्ह्यातील गावांपासून अनुक्रमे ३.५ किमी व ४.३ किमी अंतरावर राज्य महामार्ग असल्याचे दिसते. पन्ना (१२.५ किमी) आणि छत्रपूर (१७.८ किमी) या जिल्ह्यात तुलनेने राज्य महामार्ग दूर असल्याचे दिसते.

राष्ट्रीय महामार्गाचे गावापासून असलेले सरासरी अंतर याबाबतीत आपल्याला पुढीलप्रमाणे क्रम लावता येईल - इंदोर (१२.५ किमी), छत्रपूर (२९.१ किमी), धार (४२.८ किमी) आणि पन्ना (६७.३ किमी). इंदोर हे मध्यप्रदेशातील महत्त्वाचे शहर, औद्योगिक केंद्र असल्याने केवळ या जिल्ह्यातच राज्य व राष्ट्रीय महामार्गांचा जास्त विकास झाल्याचे दिसते.

मध्यप्रदेशासाठी सरासरी बघितली असता गावापासून राज्यमहामार्ग ९.३ किमी वर तर राष्ट्रीय महामार्ग ३७.५ किमी अंतरावर असल्याचे दिसून येते.

तक्ता क्र. ७ : गावातून ये - जा करणारे दैनंदिन प्रवासी

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| दैनंदिन प्रवासी नसलेली गावे | २ | १ | ० | ३ | ६ |
| १-५ व्यक्ती | ९ | १८ | ३ | ११ | ४१ |
| ६-१० व्यक्ती | ७ | १४ | ११ | ९ | ४१ |
| ११-२० व्यक्ती | ९ | ९ | ७ | १० | ३५ |
| २१-३० व्यक्ती | ६ | ३ | ७ | १ | १७ |
| ३१-५० व्यक्ती | ६ | १ | ११ | ७ | २५ |
| ५१ पेक्षा जास्त व्यक्ती | ५ | १ | १० | ४ | २० |
| **सरासरी दैनंदिन प्रवासी** | **३२** | **११** | **३८** | **२१** | **२६** |

प्रश्नावलीमध्ये गावामधून दररोज ये - जा करणारी शिक्षक, सरकारी सेवक, कामगार वगैरे मिळून किती माणसे आहेत असा प्रश्न लोकांना विचारण्यात आला होता. लोकांच्या उत्तरातून मिळालेली आकडेवारी वरील तक्त्यात दाखवली आहे. या आकडेवारीवरून गावातील लोकांचा बाह्यजगताशी किती संपर्क आहे ते समजते.

इंदोर या औद्योगिकदृष्ट्या विकसित झालेल्या जिल्ह्यातून त्याचप्रमाणे छत्रपूर जिल्ह्यातील गावांमधून दैनंदिन प्रवास करणारे बरेच लोक असल्याचे दिसते, तर पन्ना आणि धार या जिल्ह्यातून दैनंदिन प्रवाशांची संख्या क्रमी असल्याचे आढळते.

गावामधून दैनंदिन प्रवास करणाऱ्यांच्या सरासरीनुसार जिल्हावार पुढीलप्रमाणे क्रम लावता येईल - इंदोर (३८), छत्रपूर (३२), पन्ना (२१), धार (११).

मध्यप्रदेशमध्ये खेडेगावातून दररोज सरासरी २६ लोक उदरनिर्वाहासाठी ये - जा करतात.

**तक्ता क्र. ८ : सरासरी किमान व कमाल प्रवास खर्च (रूपये / किमी)**

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| किमान प्रवास खर्च रू. | ०.५७ | ०.५९ | ०.५४ | ०.६० | ०.५८ |
| कमाल प्रवास खर्च रू. | ०.६१ | ०.५९ | ०.५५ | ०.६१ | ०.५९ |

प्रवास करण्यासाठी लोकांना किलोमीटर मागे किती पैसे मोजावे लागतात याची जिल्ह्यावार आकडेवारी तक्ता क्र. ८ मध्ये दिली आहे.

मध्ये प्रदेशमध्ये सर्व जिल्ह्यातून प्रवासासाठी प्रति किलोमीटर येणारा किमान व कमाल प्रवास खर्च सर्वसाधारणपणे सारखाच आहे. जिल्हावार त्यामध्ये किरकोळ फरक असल्याचे दिसते. इंदोर जिल्ह्यामध्ये सरासरी एक किलोमीटर प्रवासासाठी ५५ पैसे तर पन्ना व छत्रपूर जिल्ह्यामध्ये जास्तीत जास्त ६० पैसे मोजावे लागतात.

हा सरासरी किमान व कमाल प्रवास खर्च वाहतुकीच्या निरनिराळ्या साधनांचे (खाजगी बस, टेंपो, जीप वगैरे) प्रवासाचे दर लक्षात घेऊन काढला आहे.

मध्यप्रदेशात लोकांना प्रवासासाठी प्रति किलोमीटर मागे सरासरी ५८ पैसे एवढाच खर्च येतो.

आता आपण मालवाहतुकीसाठी ग्रामीण भागातील लोकांना किती खर्च करावा लागतो ते पाहू.

**तक्ता क्र. ९ : सरासरी किमान व कमाल मालवाहतूक खर्च (रूपये / किमी / क्विंटल)**

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| किमान मालवाहतूक खर्च रू. | १.१७ | २.१६ | ०.९६ | १.०३ | १.३३ |
| कमाल मालवाहतूक खर्च रू. | १.८७ | २.६८ | १.३४ | १.१३ | १.७६ |

वरील तक्त्यामध्ये ग्रामस्थांना माल वाहतुकीसाठी येणारा किमान व कमाल खर्च जिल्हावार दाखवण्यात आला आहे.

इंदोर जिल्हा औद्योगिकदृष्ट्या पुढारलेला असल्याने तेथे मालवाहतुकीसाठी विविध साधने उपलब्ध आहेत व वाहतुकदारातील स्पर्धेमुळे मालवाहतुकीचे दर पण सर्वात कमी असल्याचे दिसते. या जिल्ह्यामुळे मालवाहतुकीसाठी ( / किमी / क्विंटल) किमान खर्च ०.९६ रूपये तर कमाल खर्च १.३४ रूपये इतका येतो.

इतर जिल्ह्यांसाठी मालवाहतुकीच्या किमान व कमाल खर्चाची क्रमवारी याप्रमाणे देता येईल - पन्ना (१.०३ रू. - १.१३ रू.) छत्रपूर (१.१७ रू. - १.८७ रू.) आणि धार (२.१६ रू. -२.६८ रू.) धार हा मागास जिल्हा असल्याने तेथे मालवाहतुकीची साधने फारशी विकसित झालेली नाहीत म्हणूनच तेथे मालवाहतुकीचा खर्च सर्वात अधिक आहे.

मध्यप्रदेशमध्ये मालवाहतुकीसाठी प्रतिक्विंटल प्रति किमी येणारा किमान खर्च १.३३ रूपये तर कमाल खर्च १.७६ रूपये असा आहे.

प्रवासी व मालवाहतूक खर्चानंतर आता आपण मध्यप्रदेशातील ग्रामीण भागातील लोकांना प्रवासासाठी कोणकोणत्या वाहतुकीच्या साधनांचे पर्याय उपलब्ध आहेत व ते कशाने प्रवास करतात ते जरा बघू.

**तक्ता क्र. १० : प्रवास वाहतुकीची साधने**

| जिल्हा<br>एकूण सर्वेक्षित गावे | छत्रपूर<br>४४ | धार<br>४७ | इंदोर<br>४९ | पन्ना<br>४५ | एकूण<br>१८५ |
|---|---|---|---|---|---|
| सायकली / पायी | ४४ | ४७ | ४७ | ४५ | १८३ |
| % | १००% | १००% | ९५.९% | १००% | ९८.९% |
| खाजगी बस सेवा | ३६ | २६ | २० | ३३ | ११५ |
| % | ८१.८% | ५५.३% | ४०.८% | ७३.३% | ६२.२% |
| बैलगाडी | ० | १४ | ४ | ० | १८ |
| % | ०% | २९.८% | ८.१% | ०% | ९.७% |
| जीप / टेंपो | १ | २ | ७ | ० | १० |
| % | २.३% | ४.३% | १४.३% | ०% | ५.१% |
| मोटारसायकल | ० | ६ | १३ | ० | १९ |
| % | ०% | १२.८% | २६.५% | ०% | १०.३% |

सर्वेक्षित जिल्ह्यातील गावांमधून राज्य परिवहन मंडळाची कोणत्याही प्रकारची बस सेवा सुरू असल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे लोकांपुढे पायी चालणे, सायकल, बैलगाडी, मोटारसायकल, जीप, टेंपो आणि खाजगी बस सेवा हे पर्याय वाहतुकीसाठी उपलब्ध होते. आता आपण कोणकोणती वाहतुकीची साधने किती प्रमाणात वापरली जातात याचे अवलोकन करू.

चारही जिल्ह्यातील गावातून आजुबाजूच्या खेड्यांमध्ये जाण्यासाठी लोक अजूनही पायी चालत जातात अथवा सायकलने जाणे पसंत करतात. या दोन पर्यायांचा जवळजवळ १००% गावातून लोक वापर करतात.

खाजगी बससेवेचा वापर देखील अधिक प्रमाणात होताना दिसतो - छत्रपूर (८२%), पन्ना (७३%), धार (५५%) व इंदोर (४१%). बैलगाडीचा वापर मुख्यत्वेकरून धार जिल्ह्यातून (३०%) होताना दिसतो, अन्य जिल्ह्यामध्ये फारसा वापर होत नाही. खाजगी बस सेवेशी स्पर्धा करावी लागत असल्याने जीप व टेंपो या वाहनांचा वापर देखिल फार कमी प्रमाणात होतो. इंदोर (१४%), धार (४%), पन्ना जिल्ह्यात तर ही वाहने फारशी नाहीतच. जीप व टेंपो ही वाहने तालुका अथवा बाजाराच्या गावातून केवळ १० किमी. परिघाच्या आत असलेल्या गावांना सेवा पुरवताना दिसतात.

मोटारसायकलचा वापर केवळ इंदोर (२७%) आणि धार (१३%) या दोन जिल्ह्यातच होताना दिसतो.

मध्यप्रदेशमध्ये सर्व गावातील लोक पायी अथवा सायकलने प्रवास करतात. याशिवाय खाजगी बस (६२%) मोटारसायकल (१०%) आणि जीप/टेंपो (५%) असा इतर वाहतुकीच्या साधनांचा वापर केला जातो.

गावामध्ये असलेल्या अंतर्गत रस्त्यांच्या दर्जाबाबत लोकांनी मांडलेली मते तक्ता क्र. ११ मध्ये दर्शवण्यात आली आहेत.

पन्ना जिल्हा (२४%) वगळता बाकी सर्व जिल्ह्यातील गावांनी गावातील अंतर्गत रस्ते कच्चे व खराब दर्जाचे असल्याचे सांगितले आहे - धार (७९%), छत्रपूर (६४%), इंदोर (६३%). पन्ना (२२%) व धार (१६%) जिल्ह्यातील गावांनी अंतर्गत रस्ते अतिशय खराब दर्जाचे असल्याची टीका केली आहे. या रस्त्यावरून पावसाळ्यात चालणे देखील अवघड होत असल्याचे लोकांनी सांगितले.

असे असले तरी काही गावांनी अतर्गत रस्त्यांची स्थिती समाधानकारक असल्याची पावती दिली आहे. त्यामध्ये पन्ना जिल्हा (७६%) सर्वात अग्रभागी आहे त्या पाठोपाठ छत्रपूर (३४%), इंदोर (३१%) आणि धार (१५%) हे जिल्हे आहेत.

पन्ना व छत्रपूर जिल्ह्यातील काही भागातून मोठमोठ्या फरश्या काढण्याचा उद्योग चालतो या फरश्यांचा वापर गावातील अंतर्गत रस्ते तयार करण्यासाठी ग्रामपंचायतींनी केला असल्याने तेथे गावातील रस्त्यांची स्थिती चांगली दिसते.

कच्चा पण चांगला रस्ता असलेली गावे फार कमी - धार (२), इंदोर (१). पक्का पण चांगला अंतर्गत रस्ता असणारी गावे पण बोटावर मोजता येण्याएवढीच आहेत - धार (२), इंदोर (२) व पन्ना (१).

मध्यप्रदेशमधील गावातील अंतर्गत रस्त्यांच्या स्थितीची वर्गवारी पुढीलप्रमाणे करता येईल - कच्चा व खराब दर्जा (५८%), अतिशय खराब दर्जा (१०%) समाधानकारक दर्जा (३८%), चांगल्या दर्जाचा कच्चा रस्ता (२%), चांगल्या दर्जाचा पक्का रस्ता (३%).

**तक्ता क्र. ११ : गावातील अंतर्गत रस्त्यांचा दर्जा**

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| कच्चा व खराब दर्जाचा | २८ | ३७ | ३१ | ११ | १०७ |
| % | ६३.६% | ७८.७% | ६३.३% | २४.४% | ५७.८% |
| अतिशय खराब दर्जाचा | ७ | १ | १ | १० | १९ |
| % | १५.९% | २.१% | २% | २२.२% | १०.३% |
| समाधानकारक दर्जा | १५ | ७ | १५ | ३४ | ७१ |
| % | ३४% | १४.९% | ३०.६% | ७५.६% | ३८.४% |
| कच्चा परंतु चांगला दर्जा | ० | २ | १ | ० | ३ |
| % | ०% | ४.३% | २% | ०% | १.६% |
| पक्का व चांगला दर्जा | ० | २ | २ | १ | ५ |
| % | ०% | ४.३% | ४.१% | २.२% | २.७% |

गावातील अंतर्गत रस्त्यांची अवस्था पाहिल्यानंतर आता आपण या रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती कोण करतं ते पाहू.

तक्ता क्र. १२ : अंतर्गत रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती

| जिल्हा<br>एकूण सर्वेक्षित गावे | छत्रपूर<br>४४ | धार<br>४७ | इंदोर<br>४९ | पन्ना<br>४५ | एकूण<br>१८५ |
|---|---|---|---|---|---|
| ग्रामपंचायत | ४१ | ४४ | ४६ | ४५ | १७६ |
| % | ९३.२% | ९३.६% | ९३.९% | १००% | ९५.१% |
| गावकरी | ० | ४ | ३ | ० | ७ |
| % | ०% | ८.५% | ६.१% | ०% | ३.८% |
| कोणीही नाही | १ | १ | १ | ० | ३ |
| % | २.३% | २.१% | २% | ०% | १.६% |
| सांगितले नाही | २ | ० | ० | ० | २ |
| % | ४.६% | ०% | ०% | ०% | १.१% |

वरील तक्त्यांवरून हे स्पष्ट दिसते की सर्व जिल्ह्यातील गावातून अंतर्गत रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती ग्रामपंचायतच करते. मात्र बरेचवेळा निधीअभावी, भ्रष्टाचारामुळे ग्रामपंचायतीकडून ही कामे होऊ शकत नसल्याचे व त्यामुळे अंतर्गत रस्त्यांची दुर्दशा झाल्याचे बहुतांश गावातून लोकांनी सांगितले.

धार जिल्ह्यातील ४ गावांनी (९%) आणि इंदोरमधील ३ गावांनी (६%) गावकरी स्वतःच गावातल्या रस्त्यांची पावसाळ्याआधी दुरूस्ती करत असल्याचे सांगितले. याचबरोबर छत्रपूर, धार व इंदोर जिल्ह्यातील प्रत्येकी एका गावातून अंतर्गत रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती कोणीही करत नसल्याचे स्पष्टपणे सांगण्यात आले.

मध्यप्रदेशमधील सर्वेक्षित जिल्ह्यातील बाह्य रस्त्यांचा दर्जा अतिशय खराब असल्याचे पुढे दिलेल्या तक्ता क्र. १३ मधील आकडेवारीवरून दिसून येते.

बाह्यरस्त्यांचे वर्णन कच्च्या व खराब दर्जाचा असे करणाऱ्या गावांची संख्या सर्वच जिल्ह्यामध्ये जास्त असल्याचे दिसते - इंदोर (८६%), पन्ना (८०%), छत्रपूर (७३%), धार (६६%) तर अति खराब दर्जाचे बाह्य रस्ते असलेली गावे पण बरीच आहेत छत्रपूर (१८%), धार व पन्ना (११%), इंदोर (२%).

पक्का व चांगल्या दर्जाचा बाह्यरस्ता गावाला लाभलेला आहे असे सांगणारे फक्त एक गाव धार जिल्ह्यातच मिळावे ही गोष्ट मध्यप्रदेशमधल्या रस्त्यांच्या स्थितीबद्दल चांगलाच प्रकाश टाकते.

मध्यप्रदेशमधील गावाला जोडणाऱ्या बाह्य रस्त्यांच्या दर्जाची स्थिती पुढीलप्रमाणे सांगता येईल - कच्चा व खराब दर्जा (७६%), अति खराब दर्जा (१०%), समाधानकारक दर्जा (६%), कच्चा व चांगला दर्जा (४%) आणि पक्का व चांगला दर्जा (०.५%).

**तक्ता क्र. १३ : गावाला जोडणाऱ्या बाह्य रस्त्यांचा दर्जा**

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| कच्चा व खराब दर्जा | ३२ | ३१ | ४२ | ३६ | १४१ |
| % | ७२.७% | ६६% | ८५.७% | ८०% | ७६.२% |
| पक्का व खराब दर्जा | ३ | ९ | १ | ० | १३ |
| % | ६.८% | १९.२% | २% | ०% | ७% |
| अति खराब दर्जा | ८ | ५ | १ | ५ | १९ |
| % | १८.२% | १०.६% | २% | ११.१% | १०.३% |
| समाधानकारक दर्जा | २ | १ | ३ | ५ | ११ |
| % | ४.५% | २.१% | ६.१% | ११.१% | ६% |
| कच्चा पण चांगला दर्जा | १ | ५ | २ | ० | ८ |
| % | २.३% | १०.६% | ४.१% | ०% | ४.३% |
| पक्का व चांगला दर्जा | ० | १ | ० | ० | १ |
| % | ०% | २.१% | ०% | ०% | ०.५% |

*"चालीस साल पहले सरदारपूर - बदनावर रास्ता बना। उसके बाद ना कोई यहाँ आया और ना किसीने देखभाल की। रास्ते में इतने गढ्ढे है लेकिन उसमें से एक गढ्ढे में भी डामर नही भरा गया।"*

- ग्रामस्थ, नेपावली, जि. धार

### तक्ता क्र. १४ : गावाला जोडणाऱ्या रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| पी. डब्ल्यु. डी. | ४१ | ४७ | ४१ | ४४ | १७३ |
| % | ९३.२% | १००% | ८३.७% | ९७.८% | ९३.५% |
| ग्रामपंचायत | ० | ० | ६ | ० | ६ |
| % | ०% | ०% | १२.२% | ०% | ३.२% |
| गावकरी | ० | ० | २ | ० | २ |
| % | ०% | ०% | ४.१% | ०% | १.१% |
| कोणीही नाही | १ | ० | ० | ० | १ |
| % | २.३% | ०% | ०% | ०% | ०.५% |
| सांगितले नाही | २ | ० | ० | १ | ६ |
| % | ४.५% | ०% | ०% | २.२% | ३.२% |

गावाला जोडणाऱ्या रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती बहुतांश गावातून पी.डब्ल्यु.डी. (सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत) होत असल्याचे लोकांनी सांगितले. पण रस्ता तयार झाल्यापासून कधी दुरूस्ती झाल्याचे आम्ही पाहलेले नाही अशी अनेक गावातून प्रतिक्रिया व्यक्त झाली.

इंदोर जिल्ह्यात ६ गावातून (१२%) बाहेरच्या रस्त्यांची देखभाल ग्रामपंचायत तर २ गावातून (४%) गावकरी करत असल्याचे सांगण्यात आले.

मध्यप्रदेशमधील बहुतांश गावातून खराब स्थितीत असलेल्या रस्त्यांच्या दुरावस्थेची कारणे कोणकोणती आहेत, अत्यल्प गावांमधून चांगले रस्ते का तयार होऊ शकले या प्रश्नांचे उत्तर आपल्याला लोकांनी दिलेल्या माहितीवरून मिळते. ही आकडेवारी तक्ता क्र. १५ मधून मांडण्यात आली आहे.

> *"बीस साल पहले हमारे खुडैल गाव से छोटी खुडैल तक रास्ता हो गया था। उसके बाद आज तक उस रास्ते पर एक किलो डामर भी नही डलवाया। रास्तों की हालत देखने के लिए कोई आता ही नही है।"*
>
> \- ग्रामस्थ, छोटी खुडैल, जि. इंदोर

## तक्ता क्र. १५ : रस्त्यांच्या अवस्थेची कारणे

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| **(अ) खराब रस्ते** | | | | | |
| राज्यसरकारचे दुर्लक्ष | १९ | ३३ | ३२ | ६ | ९० |
| % | ४३.२% | ७०.२% | ६५.३% | १३.३% | ४८.६% |
| निधीचा भाव | २७ | २२ | १६ | २२ | ८७ |
| % | ६१.४% | ४६.८% | ३२.६% | ४८.९% | ४७.०% |
| भ्रष्टाचार | १८ | ८ | ३२ | २० | ७८ |
| % | ४०.९% | १७% | ६५.३% | ४४.४% | ४२.२% |
| लोकांना सहभागी केले जात नाही | ३ | ४ | ७ | १ | १५ |
| % | ६.८% | ८.५% | १४.३% | २.२% | ८.१% |
| निधी दुसरीकडे वळवला जातो | ३ | ६ | २ | ४ | १५ |
| % | ६.८% | १२.८% | ४.१% | ८.९% | ८.१% |
| रस्त्याची देखभाल नाही | ० | ४ | १ | १ | ६ |
| % | ०% | ८.५% | २.०% | २.२% | ३.२% |
| अतिक्रमण | १ | ० | १ | ३ | ५ |
| % | २.३% | ०% | २.०% | ६.७% | २.७% |
| दर्जेदार काम केले जात नाही | ० | ० | २ | १ | ३ |
| % | ०% | ०% | ४.१% | २.२% | १.६% |
| **(ब) चांगले रस्ते** | | | | | |
| भक्कम राजकीय पाठिंबा | २ | ३ | १ | ४ | १० |
| % | ४.५% | ६.४% | २.०% | ८.९% | ५.४% |
| योग्य निधीचा पुरवठा | १ | ० | ० | ५ | ६ |
| % | २.३% | ०% | ०% | ११.१% | ३.२% |
| भ्रष्टाचार नाही | १ | ० | २ | १ | ४ |
| % | २.३% | ०% | ४.१% | २.२% | २.२% |
| प्रशासकीय यंत्रणेतर्फे जबाबदारीने काम | ० | ० | १ | ० | १ |
| % | ०% | ०% | २.०% | ०% | ०.६% |

खराब असलेल्या रस्त्यांसाठीची कारणे व त्याचे विश्लेषण पुढीलप्रमाणे -

बहुतांश गावातून लोकांनी खेडेगावातील रस्ते बांधणीकडे राज्य सरकारचे होत असलेले दुर्लक्ष हे महत्त्वाचे कारण दिले आहे - धार (७०%), इंदोर (६५%), छत्रपूर (४३%). अंतर्गत व बाह्य रस्त्यांच्या निधीचा अभाव हे आणखी एक मुख्य कारण असल्याचे सर्व जिल्ह्यातील गावकऱ्यांनी सांगितले आहे - छत्रपूर (६१%), पन्ना (४९%), धार (४७%), इंदोर (३३%). याच बरोबर रस्तेबांधणीच्या कामामध्ये सरकारी अधिकारी, कंत्राटदार, निर्वाचित सदस्य यांच्याकडून खूप मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार केला जातो असे गाऱ्हाणे सर्व जिल्ह्यातील ग्रामस्थांनी थोड्याफार फरकाने मांडले आहे. इंदोर जिल्ह्यामध्ये भ्रष्टाचार हे कारण देणारी सर्वात जास्त म्हणजे ३२ गावे (६५%) आहेत त्याखालोखाल पन्ना (४४%), छत्रपूर (४१%) व धार (१७%) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो.

वरील कारणांव्यतिरिक्त इतर कारणे पुढीलप्रमाणे - निर्णय व देखभाल प्रक्रियेत लोकांना सहभागी केले जात नाही - इंदोर (१४%), रस्त्यासाठी आलेला निधी अन्य विकास कामांसाठी वळवला जातो - धार (१३%), रस्त्यांची देखभाल नीटपणे केली जात नाही - धार (९%), शेतजमिनींसाठी रस्त्यावर अतिक्रमण केले जाते पन्ना (७%), रस्ते बांधताना दर्जेदार काम केले जात नाही - इंदोर (४%).

काही गावांमधून अंतर्गत व बाह्य रस्ते चांगले तयार करण्यात आले आहेत. या गावांची संख्या अत्यंत थोडीच आहे. परंतु ही गावे स्वतःपुरते रस्ते तयार करून घेऊ शकली त्याचे विश्लेषण थोडक्यात पुढीलप्रमाणे -

भक्कम राजकीय पाठिंबा म्हणजे आमदार, खासदारांचे पाठबळ - पन्ना (९%), धार (६%), छत्रपूर (५%); योग्य निधीचा पुरवठा - पन्ना (११%), भ्रष्टाचार नाही म्हणून चांगले रस्ते झाले - इंदोर (४%).

मध्यप्रदेशासाठी रस्त्यांच्या दुरावस्थेची कारणे पुढीलप्रमाणे देता येतील -

राज्यसरकारचे दुर्लक्ष (४९%), रस्तेबांधणीसाठी निधीचा अभाव (४७%), रस्ते बांधताना निरनिराळ्या पातळीवर होणारा भ्रष्टाचार (४२%), निर्णय व देखरेख प्रक्रियेत लोकांना सहभागी करून घेतले जात नाही (८%), निधी अन्य कामांसाठी वळवला जातो (८%) रस्त्यांची नीट देखभाल केली जात नाही (३%), रस्ते बांधणीचा सुमार दर्जा (२%).

परिस्थितीवर मात करून गावातील रस्ता सुधारणेसाठी ग्रामस्थांनी अनेक उपाय योजना सुचवल्या आहेत. पुढील तक्त्यात या सूचनांची जिल्हावार आकडेवारी दिली आहे.

तक्ता क्र. १६ : गावातील रस्ता सुधारणेसाठी उपाययोजना (ग्रामस्थांच्या सूचना)

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| निधी उपलब्ध केला पाहिजे | ३३ | २१ | १५ | ३० | ९९ |
| % | ७५% | ४४.७% | ३०.६% | ६६.७% | ५३.५% |
| निर्णय व देखरेख प्रक्रियेत लोकसहभाग | १८ | ६ | ३१ | १३ | ६८ |
| % | ४०.९% | १२.८% | ६३.३% | २८.९% | ३६.८% |
| भ्रष्टाचार दूर केला पाहिजे | ९ | ९ | १९ | ९ | ४६ |
| % | २०.५% | १९.२% | ३८.८% | २०% | २४.९% |
| सरकारने योग्य देखरेख केली पाहिजे | ८ | ७ | ८ | ४ | २७ |
| % | १८.२% | १४.९% | १६.३% | ८.९% | १४.६% |
| रस्त्यांची चांगली देखभाल | १ | १५ | ६ | ० | २२ |
| % | २.३% | ३१.९% | १४.२% | ०% | ११.९% |
| ग्रामपंचायतीकडे काम सोपवले पाहिजे | १ | ८ | १ | ० | १० |
| % | २.३% | १६% | २% | ०% | ५.४% |
| पी.डब्ल्यू.डी. नेच काम केले पाहिजे | १ | ५ | ० | १ | ७ |
| % | २.३% | १०.६% | ०% | २.२% | ३.८% |
| खाजगीकरण | १ | २ | २ | २ | ७ |
| % | २.३% | ४.३% | ४.१% | ४.४% | ३.८% |
| निधीचा योग्य वापर झाला पाहिजे | ० | १ | ४ | ० | ५ |
| % | ०% | २.१% | ८.२% | ०% | २.७% |
| अतिक्रमण हटवून रस्त्यासाठी जागा | १ | ० | ० | ४ | ५ |
| मिळवली पाहिजे % | २.३% | ०% | ०% | ८.८% | २.७% |

*"सरकार की मदद और जनसहयोग से गाव के बाहर का 1.5 किलोमीटर का रास्ता बनाया गया। सरकार ने 80,000 रूपये दिये, हम लोगों ने मिलकर 150 ट्रॅक्टर मिट्टी डलवायी।"*

- ग्रामस्थ, दौलताबाद, जि. इंदोर

मध्यप्रदेशातील सर्व जिल्ह्यातील अंतर्गत व बाह्य रस्ते कच्चेच आहेत. या रस्त्यांना सुधारण्यासाठी सर्व जिल्ह्यातून लोकांनी रस्तेबांधणीसाठी ग्रामपंचायत व पी.डब्ल्यू.डी. या संस्थांना आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याविषयी सुचवले आहे - छत्रपूर (७५%), पन्ना (६७%), धार (४५%) आणि इंदोर (३१%).

दुसरी आणि अत्यंत महत्वाची अशी लोकांनी केलेली सूचना म्हणजे रस्ता बांधणी प्रक्रियेत लोकसहभाग. त्यामुळे पूर्णपणे पारदर्शकता येऊन भ्रष्टाचार न होता चांगल्या दर्जाचे रस्ते तयार होऊ शकतील. लोकांनी याबाबतची योजना स्पष्ट केली आहे -

सर्वप्रथम लोकांना रस्तेबांधणी संबंधीची सर्व माहिती दिली पाहिजे. बांधावयाच्या रस्त्याची लांबी, सर्व मोजमापे, वापरण्यात येणारे साहित्य, त्याचा दर्जा, येणारा खर्च, अर्थ तरतूद व इतर तांत्रिक माहिती. रस्ते बांधणीच्या कामावर देखरेख करण्याकरिता गावकऱ्यांनी ग्रामस्थांची ग्रामसमिती स्थापना करण्याची सूचना केली आहे. ही ग्रामसमिती भ्रष्टाचाराला प्रतिबंध करून, निर्धारित दर्जाप्रमाणे काम करून घेण्याकडे लक्ष पुरवेल. ही सूचना इंदोर जिल्ह्यातील (६३%) गावांनी तर छत्रपूर (४१%), पन्ना (२९%) व धार (१३%) गावांनी केली.

भ्रष्टाचार मुक्त व दर्जेदार रस्ते बांधणीसाठी लोकांची ही सूचना प्रत्यक्षात उतरविणे गरजेचे आहे. सर्व जिल्ह्यातून रस्तेबांधणीतला भ्रष्टाचार दूर करण्याची पण सूचना पुढे आली आहे. इंदोर (३९%), छत्रपूर (२०%), पन्ना (२०%), धार (१९%).

इतर सूचनांमध्ये सरकारने कामावर योग्य देखरेख केली पाहिजे, इंदोर (१६%), धार (१५%) रस्त्यांची चांगली देखभाल झाली पाहिजे धार (३१%), ग्रामपंचायत व पी.डब्ल्यू.डी. कडे काम सोपवले पाहिजे, खाजगीकरण केले पाहिजे वगैरेंचा समावेश होता.

मध्यप्रदेशसाठी रस्ते सुधारणेसाठी ग्रामस्थांनी केलेल्या सूचनांचा गोषवारा पुढीलप्रमाणे देता येईल. निधी उपलब्ध करून दिला पाहिजे (५२%) रस्तेबांधणी निर्णय व देखरेख प्रक्रियेत लोकसहभाग (३७%), भ्रष्टाचाराला आळा (२५%), कामावर योग्य देखरेख (१५%), रस्त्यांची चांगली देखभाल (१२%).

*"हमारे गाव में प्रवेश करते समय ही घुटने इतना किचड, बरसात के मौसम मे हो जाता है। बच्चे - बुढे, जानवर सभी को आने जाने में काफी दिक्कत होती है। हमारी ये शिकायत कौन सुनेगा?"*

- ग्रामस्थ, हिनौती, जि. छत्रपूर

## दूरसंचार क्षेत्र

सध्याच्या काळात दूरसंचार सेवांचा देशभरात झपाट्याने प्रसार होत आहे. या क्षेत्रात खाजगीकरणाला परवानगी दिल्याने स्पर्धा वाढली असून लोकांना आता दूरध्वनीच्या क्षेत्रामध्ये अनेक पर्याय उपलब्ध झाले आहेत. मात्र दूरध्वनीच्या सेवा केवळ शहरी भागापुरत्याच मर्यादित आहेत का? त्याचा ग्रामीण भागात किती प्रसार झाला आहे, खेडेगावातील लोक दूरध्वनीचा वापर किती प्रमाणात करतात त्यासाठी त्यांना किती खर्च येतो, मोबाईल फोन, इंटरनेट या क्रांतीकारक तंत्रज्ञानाबाबत लोकांना किती माहिती आहे? या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न वर्ष २००१ मध्ये झालेल्या या सर्वेक्षणात करण्यात आला.

मध्यप्रदेशातील चार जिल्ह्यातील ग्रामीण भागातून माहिती गोळा करण्यात आली त्यातून तेथील दूरसंचार क्षेत्रामध्ये आत्तापर्यंत झालेल्या प्रगतीवर प्रकाश पडतो. पुढील तक्त्यांमधून या माहितीचे विश्लेषण केले आहे.

**तक्ता क्र. १७ : गावातील सार्वजनिक दूरध्वनी उपलब्धता**

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| गावात आहे | २१ | १९ | ३४ | २२ | ९२ |
| % | ४७.७% | ४०.४% | ६९.४% | ४८.९% | ४९.७% |
| गावात नाही | २३ | २८ | १५ | २७ | ९३ |
| % | ५२.३% | ५९.६% | ३०.६% | ५१.१% | ५०.३% |
| १ दूरध्वनी जोड | २१ | १९ | ३२ | १८ | ९० |
| २-४ दूरध्वनी जोड | ० | ० | २ | ० | २ |
| **सरासरी सार्वजनिक दूरध्वनी उपलब्धता** | **०.४८** | **०.४०** | **०.७३** | **०.४०** | **०.५१** |

गावामध्ये उपलब्ध असलेल्या सार्वजनिक दूरध्वनी सेवेबद्दल - ग्रामपंचायतीचा दूरध्वनी अथवा एस.टी.डी. बूथ, प्रश्नावलीमधून लोकांना प्रश्न विचारण्यात आला होता. त्याविषयक जिल्हावार आकडेवारी वरील तक्त्यात दिली आहे.

मध्यप्रदेशातील सर्वेक्षित जिल्ह्यात जवळजवळ निम्म्यापेक्षा अधिक गावातून सार्वजनिक दूरध्वनी उपलब्ध नाहीत. सार्वजनिक दूरध्वनींची जिल्हावार उपलब्धता पुढीलप्रमाणे- इंदोर सर्वात अधिक गावातून सार्वजनिक दूरध्वनी (६९%), पन्ना (४९%), छत्रपूर (४८%), धार (४०%).

ज्या गावांमध्ये सार्वजनिक दूरध्वनी उपलब्ध आहेत तेथे केवळ एकच सार्वजनिक दूरध्वनी उपलब्ध आहे. फक्त इंदोर जिल्ह्यात २ गावांमधून दोन किंवा त्यापेक्षा अधिक सार्वजनिक दूरध्वनी आढळले.

चारही सर्वेक्षित जिल्ह्यांमधील गावातील सार्वजनिक दूरध्वनींची सरासरी उपलब्धता एक पेक्षा कमीच आहे. जिल्हावार सरासरी उपलब्धता अशी - इंदोर (०.७३), छत्रपूर (०.४८), धार (०.४०) आणि पन्ना (०.४०). म्हणजेच साधारणपणे २ गावातून एक सार्वजनिक दूरध्वनी उपलब्ध आहे असा अर्थ निघतो.

मध्यप्रदेशमधील ग्रामीण भागात ५०% खेडेगावातून सार्वजनिक दूरध्वनी उपलब्ध आहेत व तेवढीच गावे या सेवेपासून वंचित आहेत.

आता आपण खाजगी दूरध्वनींची उपलब्धता पाहू.

**तक्ता क्र. १८ : खाजगी दूरध्वनींची उपलब्धता**

| **जिल्हा** | **छत्रपूर** | **धार** | **इंदोर** | **पन्ना** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|
| **एकूण सर्वेक्षित गावे** | **४४** | **४७** | **४९** | **४५** | **१८५** |
| **खाजगी दूरध्वनी** | | | | | |
| गावात आहेत | १ | १८ | ३२ | ५ | ५६ |
| % | २.३% | ३८.३% | ६५.३% | ११.१% | ३०.३% |
| गावात नाहीत | ४३ | २९ | १७ | ४० | १२९ |
| % | ९७.७% | ६१.७% | ३४.७% | ८८.९% | ६९.७% |
| १ दूरध्वनी जोड | १ | ६ | १ | ५ | १३ |
| २-४ दूरध्वनी जोड | ० | २ | ४ | ० | ६ |
| ५ व त्यापेक्षा अधिक | ० | १० | २७ | ० | ३७ |
| **सरासरी खाजगी दूरध्वनी उपलब्धता** | **०.०२** | **३.६** | **७.४** | **०.१** | **२.९** |

वरील तक्त्यामध्ये सर्वेक्षित जिल्ह्यातील खाजगी दूरध्वनींची उपलब्धता व गावातून उपलब्ध दूरध्वनींची वर्गवारी देण्यात आली आहे.

खाजगी दूरध्वनी उपलब्धतेच्या बाबतीत सार्वजनिक दूरध्वनींपेक्षा अत्यंत वेगळे चित्र पहायला मिळते. छत्रपूर जिल्ह्यामध्ये केवळ एका गावातून (२%) खाजगी दूरध्वनी तर पन्ना जिल्ह्यात ५ गावात (११%) उपलब्धता असल्याचे दिसते. खाजगी दूरध्वनींच्या बाबतीत हे जिल्हे अत्यंत मागासलेले आहेत हे स्पष्ट दिसते. धार जिल्ह्यामध्ये ३८% गावातून तर इंदोरमध्ये सर्वात जास्त म्हणजे ६५% गावातून खाजगी दूरध्वनी जोड आढळून आले. या जिल्ह्यात ५ व त्यापेक्षा अधिक खाजगी जोड असलेली २७ गावे होती.

जिल्हावार खाजगी दूरध्वनींची गावातील सरासरी उपलब्धता बघितली असता आपल्याला पुढील चित्र पहायला मिळते. छत्रपूर (०.०२), पन्ना (०.१), धार (३.६) आणि इंदोर जिल्हा (७.४).

मध्यप्रदेशमध्ये केवळ ३०% गावातून खाजगी दूरध्वनी जोड आहेत. तर एका गावामध्ये सरासरी केवळ ३ जोड असल्याचे दिसून आले.

सार्वजनिक व खाजगी दूरध्वनींची उपलब्धता बघितल्यानंतर आता ग्रामीण भागातील किती लोक आठवड्यातून दूरध्वनी सेवेचा वापर करतात हे बघू या.

**तक्ता क्र. १९ : दूरध्वनी सेवेचा वापर (दर आठवड्याला)**

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| कोणीच उपयोग करत नाही | ३० | ८ | ५ | २५ | ६८ |
| १-१० व्यक्ती | २ | १४ | ९ | ० | २५ |
| ११-२० व्यक्ती | ० | ११ | ८ | ० | १९ |
| २० पेक्षा अधिक व्यक्ती | १२ | १४ | २७ | २० | ७३ |
| **आठवड्यातून दूरध्वनी वापर करणाऱ्या व्यक्तींची सरासरी** | **२७** | **२०** | **३९** | **४४** | **३३** |

प्रश्नावलीमध्ये गावातील किती लोक आठवड्यातून सरासरी किती वेळा गावातून अथवा दूरध्वनी उपलब्ध असलेल्या ठिकाणाहून बाहेर दूरध्वनी करतात असा प्रश्न विचारला होता. या प्रश्नातून मिळालेली माहिती तक्ता क्र. १९ मधून मांडण्यात आली आहे.

छत्रपूर व पन्ना या जिल्ह्यात सार्वजनिक वा खाजगी दूरध्वनी जोड अत्यल्प प्रमाणात उपलब्ध आहेत हे आपण यापूर्वीच बघितले. या जिल्ह्यामध्ये दूरध्वनी सेवेचा वापर न करणारी पण बरीच गावे असल्याचे दिसते. छत्रपूर मध्ये ४४ पैकी ३० गावातून तर पन्ना जिल्ह्यात ४५ पैकी २५ गावातून कोणीच दूरध्वनी वापरत नाही. त्याचबरोबर या जिल्ह्यातील काही गावातून २० पेक्षा जास्त व्यक्ती आठवड्यातून किमान एकदा तरी दूरध्वनी करताना दिसतात.

जर आपण आठवड्यातून दूरध्वनी सेवेचा वापर करणाऱ्या व्यक्तींची जिल्हावार सरासरी बघितली तर पुढील चित्र दिसते. धार (२०), छत्रपूर (२७), इंदोर (३९), पन्ना (४४).

मध्यप्रदेशमध्ये सुमारे ३२% गावातून दूरध्वनी सेवेचा वापर कोणीच करत नाही. तर आठवड्यातून सरासरी ३३ व्यक्ती दूरध्वनी सेवेचा ग्रामीण भागातून वापर करताना आढळतात.

**तक्ता क्र. २० : संभाषणासाठी लागणारे सरासरी मूल्य**

| जिल्हा<br>एकूण सर्वेक्षित गावे | छत्रपूर<br>४४ | धार<br>४७ | इंदोर<br>४९ | पन्ना<br>४५ | एकूण<br>१८५ |
|---|---|---|---|---|---|
| द्यावे लागणारे सरासरी मूल्य रूपये | ३.० | २.३० | ३.२० | १.९० | २.६० |

वरील तक्त्यामध्ये तीन मिनिटांच्या एका स्थानिक संभाषणासाठी ग्रामीण भागातील लोकांना द्यावे लागणारे मूल्य दर्शविण्यात आले आहे.

पन्ना जिल्ह्यामध्ये संभाषणासाठी द्यावे लागणारे सरासरी मूल्य सर्वात कमी म्हणजे १.९० रूपये एवढे होते. तर धार (२.३० रूपये), छत्रपूर (३ रूपये) असे मूल्य होते. इंदोर जिल्ह्यामध्ये सार्वजनिक व खाजगी दूरध्वनींचा विस्तार सर्वात जास्त असला तरी तेथील लोकांना सर्वात महाग दराने म्हणजे ३.२० रूपये या दराने मूल्य मोजावे लागते.

मध्यप्रदेशात ग्रामीण भागात तीन मिनिटांच्या संभाषणासाठी सरासरी मूल्य २ रूपये ६० पैसे एवढे आहे.

## तक्ता क्र. २१ : मोबाईल दूरध्वनीबद्दलची माहिती

| जिल्हा<br>एकूण सर्वेक्षित गावे | छत्रपूर<br>४४ | धार<br>४७ | इंदोर<br>४९ | पन्ना<br>४५ | एकूण<br>१८५ |
|---|---|---|---|---|---|
| माहिती नाही | ३२ | २७ | २७ | ४२ | १२८ |
| % | ७२.७% | ५७.५% | ५५.१% | ९३.३% | ६९.२% |
| काही लोकांना माहिती आहे | ८ | १८ | २२ | २ | ५० |
| % | १८.२% | ३८.३% | ४४.९% | ४.४% | २७% |
| फक्त नाव ऐकले आहे | ४ | २ | ० | १ | ७ |
| % | ९.१% | ४.३% | ०% | २.३% | ३.८% |

ग्रामीण भागातील लोकांना मोबाईल दूरध्वनी बद्दल काय माहिती आहे असा प्रश्न विचारण्यात आला होता त्याचा गोषवारा तक्ता क्र. २१ मध्ये देण्यात आला आहे.

बऱ्याच लोकांना मोबाईल दूरध्वनी बद्दल अजिबातच काही माहिती नसल्याचे सर्वेक्षित गावातून दिसून आले. पन्ना जिल्ह्यात मोबाईल दूरध्वनी बद्दल माहिती नसलेली (९३%) गावे आढळली तर छत्रपूर (७३%), धार (५८%) आणि इंदोर (५५%) इतक्या प्रमाणात गावे आढळली.

काही गावातून, गावातील १५-२० जणांना जे शहरामध्ये ये-जा करत असतात अशा लोकांना मोबाईल दूरध्वनीबद्दल माहिती असल्याचे लोकांनी सांगितले, त्याची क्रमवारी पुढीलप्रमाणे देता येईल - इंदोर (४५%), धार (३८%), छत्रपूर (१८%) व पन्ना केवळ (४%). अगदी मोजक्या गावातून मोबाईल दूरध्वनीचे फक्त नाव ऐकले असल्याची माहिती लोकांनी दिली.

मध्यप्रदेशासाठी ग्रामीण भागातील लोकांना मोबाईल दूरध्वनीबद्दल असलेल्या माहितीची वर्गवारी पुढीलप्रमाणे करता येईल. - माहिती नाही (६९%), गावातील काही लोकांना माहिती आहे (२७%), फक्त नाव ऐकले आहे (४%).

शहरी भागामध्ये मोबाईल दूरध्वनीचा वापर मोठ्या प्रमाणात होत असला तरी ग्रामीण भागामध्ये अजून त्याबद्दलची माहिती देखील पोहोचलेली नाही. ग्रामीण भागात मोबाईल दूरध्वनीच्या क्षेत्रामध्ये अजून खूपच लांबचा पल्ला गाठायचा आहे हेच ही आकडेवारी सांगते.

## तक्ता क्र. २२ : इंटरनेटबद्दलची माहिती

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| माहिती नाही | ४३ | ३४ | ४२ | ४४ | १६३ |
| % | ९७.७% | ७२.३% | ८५.७% | ९७.८% | ८८.१% |
| काही लोकांना माहित आहे | १ | १३ | ७ | १ | २२ |
| % | २.३% | २७.७% | १४.३% | २.२% | ११.९% |

सध्याच्या काळामध्ये इंटरनेटमुळे जग फारच जवळ आले आहे, इंटरनेटद्वारे कुठल्याही विषयावरची माहिती घर बसल्या मिळवता येते. हे झाले शहरातील चित्र. मात्र ग्रामीण भागातील लोकांना इंटरनेटबद्दल कितपत माहिती आहे ?

मध्यप्रदेशमधील सर्वेक्षित जिल्ह्यातील इंटरनेट माहितीबद्दलचे चित्र आपल्याला वरील तक्त्यामधून बघायला मिळते. छत्रपूर आणि पन्ना या जिल्ह्यामध्ये इंटरनेट हा शब्ददेखील लोकांच्या ऐकण्या-पहाण्यात आलेला नाही. ९८% गावातील लोक इंटरनेटविषयी अनभिज्ञ आहेत तर केवळ प्रत्येकी एका गावातून, गावातील काही लोकांना इंटरनेट म्हणजे काय याबद्दल माहिती असल्याचे लोकांनी सांगितले.

तुलनेने इंदोर व त्यातल्या त्यात धार जिल्ह्यामध्ये ग्रामपातळीवर लोकांना इंटरनेटची माहिती असल्याचे दिसते. इंदोर जिल्ह्यातील ८६% गावातील लोकांना काहीच माहिती नाही तर १४% गावातून काही लोकांना इंटरनेटबद्दल माहिती आहे. धार जिल्ह्यामध्ये ७२% गावातून लोक अनभिज्ञ आहेत तर २८% गावातून इंटरनेटबद्दल काही लोकांना तरी माहिती आहे.

इंदोर जिल्ह्यामध्ये ग्रामीण भागातील काही लोकांचा इंदोर शहराशी संबंध असल्याचे त्यांना ही माहिती असल्याचे आढळले. धार जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषद व स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून 'ज्ञानदूत' हा प्रकल्प राबवला जात आहे. या प्रकल्पांतर्गत काही ग्रामपंचायती व बाजाराची ठिकाणे येथे इंटरनेट सेवा केंद्र उघडली असून त्याद्वारे लोकांना आपल्या गावातून निरनिराळ्या शासकीय कामांसाठी थेट जिल्हा परिषदेशी संपर्क साधणे शक्य झाले आहे. वेगवेगळ्या बाजारातील शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना गावातून पहाता येऊ शकतात. या प्रकल्पामुळेच धार जिल्ह्यातील ग्रामीण लोकांना इंटरनेटची ओळख झाली आहे.

मध्यप्रदेशामध्ये ८८% गावातील लोक इंटरनेटबद्दल अनभिज्ञ आहेत तर १२% गावातून काही लोकांना त्याबद्दल माहिती आहे. 'ज्ञानदूत' सारखे प्रकल्प ग्रामीण जनतेला उपलब्ध करून दिल्यास इंटरनेट तंत्रज्ञानाद्वारे ग्रामविकास करणे शक्य होईल.

**तक्ता क्र. २३ : दूरध्वनी सेवेच्या सद्यस्थितीची कारणे**

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| माहिती नाही | ३३ | १४ | ३ | २९ | ७९ |
| % | ७५% | २९.८% | ६.१% | ६९.४% | ४२.७% |
| दूरसंचार खात्याचे दुर्लक्ष | १० | २६ | २२ | १६ | ७४ |
| % | २२.७% | ५५.३% | ४४.९% | ३५.६% | ४०% |
| तक्रारींची दखल घेत नाहीत | ० | ५ | १७ | २ | २४ |
| % | ०% | १०.६% | ३४.७% | ४.४% | १३% |
| भ्रष्टाचार | ३ | ५ | १० | ० | १८ |
| % | ६.८% | १०.६% | २०.४% | ०% | ९.७% |
| देखभाल नाही | ० | ७ | ६ | २ | १५ |
| % | ०% | १४.९% | १४.३% | ४.४% | ८.१% |
| दोषपूर्ण दूरध्वनी देयक | ० | १ | १ | ० | २ |
| % | ०% | २.१% | २% | ०% | १.१% |
| नविन जोड दिले जात नाहीत | ० | ० | २ | ० | २ |
| % | ०% | ०% | ४.१% | ०% | १.१% |
| दूरसंचार खात्याचा कारभार योग्य आहे | ० | १ | १० | ० | ११ |
| % | ०% | २.१% | २०.४% | ०% | ६% |

दूरध्वनीच्या सेवेच्या चांगल्या अथवा वाईट परिस्थितीला मुख्यतः कुठल्या गोष्टी कारणीभूत आहेत या विषयी लोकांनी दिलेल्या माहितीचा गोषवारा वरील तक्यातून मांडला आहे.

वरील आकडेवारीवरून तसेच आधीच्या तक्त्यांवरून हे स्पष्ट होते की मध्यप्रदेशाच्या उत्तर भागातील छत्रपूर व पन्ना हे जिल्हे दूरध्वनी सेवेबाबत अत्यंत मागासलेले आहेत. त्याचेच प्रतिबिंब आपल्याला लोकांच्या प्रतिक्रियांबाबत देखील दिसते. छत्रपूर (७५%) आणि पन्ना (६९%) एवढ्या गावांनी दूरध्वनी सेवा अशी का आहे याबद्दल आपल्याला काहीही माहित नसल्याचे सांगितले. धार व इंदोर जिल्ह्यात असे उत्तर देणारी अनुक्रमे ३०% व ६% गावे आढळली.

धार जिल्ह्यामध्ये सर्वात जास्त (५५%) गावांनी दूरसंचार खात्याचे दुर्लक्ष होत असल्याने समाधानकारक सेवा मिळत नसल्याचे सांगितले. इतर जिल्ह्यांमध्ये अशा प्रकारचे उत्तर देणाऱ्या गावांची टक्केवारी पुढीलप्रमाणे-इंदोर (४५%), पन्ना (३६%), छत्रपूर (२३%).

इंदोर (३५%) व धार (११%) या जिल्ह्यातून दूरसंचार खात्याचे कर्मचारी तक्रार केली तरी त्याची दखल घेत नाहीत असे लोकांनी सांगितले.

दूरसंचार खात्यातील कर्मचारी नविन जोड देताना भ्रष्टाचार करतात. जो अधिक लाच देईल त्याला लवकर दूरध्वनी दिला जातो असे ग्रामीण भागातल्या लोकांनी सांगितले. भ्रष्टाचाराबद्दल इंदोर (२०%), धार (११%) आणि छत्रपूर (७%) एवढ्या गावातून तक्रारी ऐकायला मिळाल्या.

दूरसंचार खात्यातर्फे कोणत्याही प्रकारची देखभाल केली जात नाही त्यामुळे बरेच वेळा सेवा खंडित रहाते अशी तक्रार पण काही गावातून ऐकायला मिळाली - धार (१५%), इंदोर (१४%), पन्ना (४%).

याशिवाय दूरध्वनी देयक दोषपूर्ण असते, गावातून नविन दूरध्वनी जोड घेण्यासाठी केवळ ४-५ जणच इच्छुक आहेत म्हणून नविन जोड दिला जात नाही अशाही तक्रारी थोड्या गावातून ऐकायला मिळाल्या.

दूरसंचार खात्याचा कारभार योग्य प्रकारे चालला आहे त्याबद्दल कोणतीही तक्रार नाही असा चांगला अभिप्राय इंदोर जिल्ह्यातील २०% गावातून तर धार मधून एका गावातून ऐकायला मिळाला.

मध्यप्रदेश राज्याचा विचार केला तर दूरध्वनी सेवेच्या सद्यस्थितीची कारणे पुढीलप्रमाणे देता येतील - कारणे माहित नाहीत (४३%), दूरसंचार खात्याचे ग्रामीण भागाकडे दुर्लक्ष (४०%), कर्मचारी तक्रारींची दखल घेत नाहीत (१३%), भ्रष्टाचार (१०%) योग्य देखभाल केली जात नाही (८%). याशिवाय ६% गावांनी दूरध्वनी सेवेच्या कारभाराविषयी समाधान व्यक्त केले आहे.

तक्ता क्र. २४ : दूरध्वनी सेवा सुधारण्यासाठी उपाययोजना, (ग्रामस्थांच्या सूचना)

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| ग्रामपंचायतीमध्ये सार्वजनिक दूरध्वनी | ३७ | १७ | १५ | ४० | १०९ |
| बसवला पाहिजे % | ८४.१% | ३६.२% | ३०.६% | ८८.९% | ५८.९% |
| सेवेमध्ये योग्य सुधारणा | १ | ११ | ११ | ० | २३ |
| % | २.३% | २३.४% | २२.५% | ०% | १२.४% |
| भूमिगत दूरध्वनी वाहिन्या | १ | ९ | १३ | ० | २३ |
| % | २.३% | १९.५% | २६.५% | ०% | १२.४% |
| अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांवर देखरेख करावी | ३ | ६ | ९ | २ | २० |
| % | ६.८% | १२.८% | १८.४% | ४.४% | १०.८% |
| भ्रष्टाचाराला आळा | २ | ५ | ६ | ० | १३ |
| % | ४.६% | १०.६% | १२.२% | ०% | ७% |
| योग्य देखभाल | ० | ५ | १ | ० | ६ |
| % | ०% | १०.६% | २% | ०% | ३.२% |
| नविन इलेक्ट्रॉनिक दूरध्वनी केंद्र सुरू करावे | ० | १ | २ | १ | ४ |
| % | ०% | २.१% | ४.१% | २.२% | २.२% |
| उपाय न सुचविलेली गावे | ४ | ५ | ११ | ५ | २५ |
| % | ९.१% | १०.६% | २२.५% | ११.१% | १३.५% |

प्रश्नावलीमध्ये दूरध्वनी सेवा सुधारण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना करायला पाहिजेत असा प्रश्न ग्रामस्थांना विचारण्यात आला होता. ग्रामीण भागातील लोकांनी त्यासाठी अनेक उपाययोजना सुचविल्या आहेत.

सर्वात महत्त्वाची सूचना म्हणजे गावातील ग्रामपंचायतीमध्ये सार्वजनिक दूरध्वनी बसवला पाहिजे. मध्यप्रदेशातील गावांमधून अठरा पगड जाती आढळतात. जेथे जेथे सध्या सार्वजनिक दूरध्वनी आहेत तेथे उच्च जातीच्या / समाजाच्या प्रभावशाली व्यक्तींच्या घरात अथवा वस्तीत हे

दूरध्वनी लावले गेले आहेत. त्यामुळे गावातील मागासवर्गीय व अन्य जातीच्या लोकांना त्याचा खुलेपणाने, गरज पडेल तेव्हा वापर करता येत नाही. म्हणूनच गावातील लोकांची मागणी म्हणजे गावात सार्वजनिक दूरध्वनी बसवणे आणि तोही मध्यवर्ती ठिकाणी जेणेकरून गावातील सर्व जातीच्या लोकांना त्याचा आवश्यकतेप्रमाणे वापर करता येऊ शकेल.

सार्वजनिक दूरध्वनींची सर्वात जास्त मागणी अर्थातच पन्ना (८९%) व छत्रपूर (८४%). धार व इंदोर या जिल्ह्यातील अनुक्रमे ३६% व ३१% गावातून ही मागणी करण्यात आली आहे. अशा दूरध्वनीवरून बाहेर बोलण्यासाठी लागणारे शुल्क भरायची तयारी असल्याचे लोकांनी सांगितले.

दूरसंचार खात्याच्या सेवेमध्ये योग्य सुधारणा झाली पाहिजे असे अनेक गावांनी - धार (२३%), इंदोर (२३%) सांगितले. दूरध्वनी बिघडल्यामुळे महिनाभर तरी सेवा खंडित होते व त्यामध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे अशी माहिती लोकांनी दिली.

अस्तित्वात असलेल्या खांबावरून वाहिन्या नेण्याऐवजी भूमिगत वाहिन्या नेल्यास सेवेत व्यत्यय येणार नाही अशी सूचना इंदोर (२७%), धार (२०%) गावांनी केली.

ग्रामपातळीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर अधिकाऱ्यांनी देखरेख करावी अशी अपेक्षा काही गावातून व्यक्त करण्यात आली. इंदोर (१८%), धार (१३%), छत्रपूर (१३%), पन्ना (४%).

भ्रष्टाचाराला आळा घातल्यास दूरसंचार खाते अधिक कार्यक्षमतेने काम करू शकेल असा दावा इंदोर (१२%), धार (११%), छत्रपूर (५%) या गावांनी केला आहे. त्याचबरोबर दूरध्वनी केंद्राची देखभाल योग्यपणे झाली पाहिजे असे मत धार जिल्ह्यातील ५ गावांनी (११%) व्यक्त केले आहे. नेहमीच्या दूरध्वनी केंद्राऐवजी नविन इलेक्ट्रॉनिक दूरध्वनी केंद्र सुरू करावे अशी उपाययोजना पण काही गावातून सुचवण्यात आली आहे.

मध्यप्रदेशातील दूरध्वनी सेवेमध्ये सुधारणा करण्यासाठी लोकांनी सुचवलेल्या उपाययोजना पुढीलप्रमाणे सांगता येतील. - ग्रामपंचायतीमध्ये सार्वजनिक दूरध्वनी बसवणे (५९%), दूरसंचार खात्याच्या सेवेमध्ये योग्य सुधारणा (१२%), अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांवर चांगली देखरेख करणे (११%), भ्रष्टाचाराला आळा (७%), योग्य देखभाल (३%).

*"फोन शुरू करने के समय ३०० रुपये रिश्वत दे दी है। इसलिए सेवा अच्छी मिल रही है।"*

- ग्रामस्थ, बरोदा पंथ, जि. इंदोर

## विद्युत क्षेत्र

राज्याच्या औद्योगिक व शेतीविकासासाठी वीज हा सर्वात महत्वाचा असा आवश्यक घटक मानला गेला आहे. मध्यप्रदेश हे राज्य औद्योगिक दृष्ट्या पुढारलेले राज्य नसले तरी शेती उत्पादनामध्ये अग्रेसर असलेले राज्य आहे. येथील सिहोर गहू, सोयाबीन ही पिके प्रसिद्धच आहेत. मध्यप्रदेशमध्ये बऱ्याच भागात पाण्याची मुबलकता असल्याने तेथील शेतकरी कूपनलिका काढून त्या पाण्यावर वर्षातून दोन-दोन, तीन-तीन पिकेदेखील घेताना आढळतो. मात्र कूपनलिकेतील पाणी खेचण्यासाठी पंपांची तसेच नियमित वीजपुरवठ्याची आवश्यकता असते. पूर्वीच्या मध्यप्रदेशमध्ये विजेची फारशी टंचाई भासत नव्हती.

मध्यप्रदेशमधून छत्तीसगड राज्य विभक्त झाल्यानंतर तेथील वीज उपलब्धतेवर विपरित परिणाम झाला. परिणामी ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर भारनियमन केले जात आहे. याचा ग्रामीण भागातील जनजीवनावर फार मोठा परिणाम झाला आहे.

मध्यप्रदेशातील ग्रामीण भागामध्ये विद्युत क्षेत्राममध्ये वर्ष २००१ मध्ये काय परिस्थिती होती ते आता आपण बघू.

**तक्ता क्र. २५ : घरगुती वीजजोड टक्केवारी**

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| (अ) मीटर सहित वीजजोड | २५% | ७८.६% | ४९.७% | १७.७% | ४१.३% |
| (ब) मीटर विना वीजजोड | ३१.७% | ७.७% | ४०.६% | २२.३% | २५.६% |
| वीज जोड असलेली घरे | ५६.७% | ८६.३% | ९०.२% | ४०% | ६६.९% |
| **वीजजोड नसलेली घरे** | **४३.३%** | **१३.७%** | **९.८%** | **६०%** | **३३.१%** |

मध्यप्रेदशमधील चार सर्वेक्षित जिल्ह्यातील घरगुती वीजजोड संदर्भातील आकडेवारी तक्ता क्र. २५ मध्ये दर्शवली आहे.

धार जिल्ह्यामध्ये सर्वात जास्त प्रमाणात (७९%) मीटर सहित वीजजोड असलेली घरे

बघायला मिळतात. त्याखालोखाल इंदोर (५०%) व छत्रपूर (२५%) या जिल्ह्यांचा क्रम लागतो. पन्ना जिल्ह्यामध्ये केवळ (१८%) घरातून मीटर सहित वीजजोड असल्याचे दिसते.

मीटरविना म्हणजे शेजारच्या घरातून अथवा वीजवाहक तारांवर आकडा टाकून वीजचोरी करणाऱ्या घरांची जिल्हावार टक्केवारी पुढीलप्रमाणे देता येईल. इंदोर (४१%), छत्रपूर (३२%), पन्ना (२२%) व धार केवळ (८%).

पन्ना (४०%) व छत्रपूर (५७%) या जिल्ह्यांमध्ये वीजजोड असलेली घरे (मीटरसहित व मिटरविना) त्यामानाने कमी आहेत. तर धार (८६%) व इंदोर (९०%) येथे सर्वात जास्त घरांचे विद्युतीकरण झाल्याचे पहायला मिळते.

केवळ चिमणी, कंदिल अथवा रॉकेलच्या बत्तीवर रात्र काढणाऱ्या घरांची टक्केवारी पुढीलप्रमाणे देता येईल - पन्ना (६०%), छत्रपूर (४३%), धार (१४%) आणि इंदोर (१०%).

मध्यप्रदेशमध्ये ४१% घरातून मीटरसहित तर २६% घरातून मीटरविना वीजजोड आहेत. अशा प्रकारे ६७% घरातून वीज पोहोचली असून ३३% घरे अजूनही, चिमणी कंदिलचा वापर करताना दिसतात.

**तक्ता क्र. २६ : गावातील किरकोळ धंद्यासाठी वीज वापर**

| जिल्हा<br>एकूण सर्वेक्षित गावे | छत्रपूर<br>४४ | धार<br>४७ | इंदोर<br>४९ | पन्ना<br>४५ | एकूण<br>१८५ |
|---|---|---|---|---|---|
| गैरलागू | ७ | १ | ० | ४ | १२ |
| % | १५.९% | २.१% | ०% | ८.९% | ६.५% |
| किरकोळ उद्योग नसलेली गावे | ६ | ९ | १० | ७ | ३२ |
| % | १३.६% | १९.१% | २०.४% | १५.५% | १७.३% |
| १ किरकोळ उद्योग | १० | १३ | १७ | १२ | ५२ |
| % | २२.७% | २७.७% | ३४.७% | २६.७% | २८.१% |
| २-४ किरकोळ उद्योग | १९ | २२ | १८ | २० | ७९ |
| % | ४३.१% | ४६.८% | ३६.७% | ४४.४% | ४२.७% |
| ४ पेक्षा अधिक उद्योग | २ | २ | ४ | २ | १० |
| % | ४.५% | ४.२% | ८.१% | ४.४% | ५.४% |
| **सरासरी किरकोळ धंद्यासाठी वीजजोड / गाव** | **१.६** | **१.६** | **१.८** | **१.९** | **१.७** |

खेडेगावामधून वीजेवर चालणारे - पिठाची गिरणी, इस्त्री दुकान, वेल्डिंग व इतर उद्योग असे कोणकोणते उद्योगधंदे आहेत त्याची माहिती प्रश्नावलीमधून घेण्यात आली, ती वरील तक्त्यामधून मांडली आहे.

काही गावातून वीजच उपलब्ध नसल्याने हा प्रश्न गैरलागू ठरतो. इंदोर (२०%), धार (१९%), पन्ना (१६%), छत्रपूर (१४%) एवढ्या गावांमधून कोणत्याही प्रकारचा वीजेवर चालणारा किरकोळ उद्योगधंदा गावामध्ये नसल्याचे दिसते. दोन ते चार किरकोळ उद्योग असलेल्या गावांची टक्केवारी पुढीलप्रमाणे - धार (४७%), पन्ना (४४%), छत्रपूर (४३%), इंदोर (३७%).

वीजेवर चालणाऱ्या किरकोळ उद्योगधंद्याची गावातील सरासरी संख्या पुढीलप्रमाणे - छत्रपूर (१.६), धार (१.६), इंदोर (१.८), पन्ना (१.९).

मध्यप्रदेशमध्ये एका गावामधून सरासरी सुमारे २ किरकोळ उद्योग विजेचा वापर करताना आढळले.

आता आपण गावाच्या हद्दीत असलेल्या मोठ्या उद्योगांविषयी माहिती घेऊ.

**तक्ता क्र. २७ : उद्योगासाठी विजेचा वापर**

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| गैरलागू | ७ | १ | ० | ४ | १२ |
| % | १५.९% | २.१% | ०% | ८.९% | ६.५% |
| होय | ० | ० | २ | ० | २ |
| % | ०% | ०% | ४.१% | ०% | १% |
| नाही | ३७ | ४६ | ४७ | ४१ | १७१ |
| % | ८४.१% | ९७.९% | ९५.९% | ९१.१% | ९२.४% |

मध्यप्रदेशमधील सर्वेक्षित गावांच्या हद्दीमध्ये एखादा विजेवर चालणारा उद्योग आहे का याबद्दलची मिळालेली माहिती वरील तक्त्यामधून मांडण्यात आली आहे.

छत्रपूर जिल्ह्यातील (७), पन्ना (४) आणि धार (१) या गावातून वीज नसल्याने हे प्रश्न गैरलागू ठरतो. उरलेल्या सर्व गावातून केवळ इंदोर जिल्ह्यातील २ गावांच्या हद्दीमध्येच विजेवर चालणारे कारखाने असल्याचे सर्वेक्षणात आढळून आले.

तक्ता क्र. २८ मध्ये गावांमधून विजेवर चालणाऱ्या घरगुती उपकरणांच्या वापराची माहिती दिली आहे. ही आकडेवारी खेडेगावांमधून किती लोक कोणकोणती उपकरणे वापरतात हे दर्शवत नसून या उपकरणांचा वापर एकूण सर्वेक्षित गावांपैकी किती गावात होत आहे हे सांगते.

**तक्ता क्र. २८ : विजेवर चालणाऱ्या घरगुती उपकरणांचा वापर**

| जिल्हा<br>एकूण सर्वेक्षित गावे | छत्रपूर<br>४४ | धार<br>४७ | इंदोर<br>४९ | पन्ना<br>४५ | एकूण<br>१८५ |
|---|---|---|---|---|---|
| पंखा | ३७ | ३८ | ४७ | ३८ | १६० |
| % | ८४.१% | ८०.९% | ९५.९% | ८४.४% | ८६.५% |
| दूरदर्शन संच | ३४ | ३५ | ४८ | २३ | १४० |
| % | ७७.३% | ७४.५% | ९८% | ५१.१% | ७५.७% |
| टेपरेकॉर्डर | १८ | १९ | २६ | १४ | ७७ |
| % | ४०.९% | ४०.४% | ५३% | ३१.१% | ४१.६% |
| कूलर | ८ | ७ | ७ | ० | २२ |
| % | १८.२% | १४.९% | १४.३% | ०% | ११.९% |
| मिक्सर | ० | ६ | ५ | ० | ११ |
| % | ०% | १२.८% | १०.२% | ०% | ६% |
| फ्रिज | ० | २ | ३ | ० | ५ |
| % | ०% | ४.३% | ६.१% | ०% | २.७% |

घरगुती उपकरणांचा प्रसार इंदोर जिल्ह्यामध्ये सर्वात जास्त गावातून तर पन्ना जिल्ह्यातून सर्वात कमी गावातून झाला असल्याचे आकडेवारीतून स्पष्ट दिसते.

सर्वात जास्त गावातून वापरले जाणारे घरगुती उपकरण म्हणजे पंखा. इंदोर जिल्ह्यातील ९६% गावातून, तर कमीत कमी धार जिल्ह्यात (८१%) गावातील काही लोक पंखा वापरत असल्याचे पहायला मिळाले. त्याखालोखाल दूरदर्शन व टेपरेकॉर्डर या करमणुकीच्या साधनांचा प्रसार झालेला दिसतो. इंदोर जिल्ह्यातील ९८% गावातून एक किंवा त्यापेक्षा अधिक दूरदर्शन संच असल्याचे दिसते. टेपरेकॉर्डर मात्र दूरदर्शन संचाच्या निम्म्यानेच असल्याचे आकडेवारी सांगते. कूलर, मिक्सर व फ्रीज यासारखी साधने मात्र फारच थोड्या गावातून तेही इंदोर व धार जिल्ह्यामध्ये बघायला मिळतात. छत्रपूर व पन्ना जिल्ह्यामध्ये ही साधने गावातील कोणाकडेही नसल्याचे लोकांनी सांगितले.

मध्यप्रदेशमध्ये विजेवर चालणाऱ्या घरगुती उपकरणांचा करणाऱ्या गावांची (घरांची नव्हे) टक्केवारी पुढीलप्रमाणे सांगता येईल. पंखा (८७%), दूरदर्शन (७६%), टेपरेकॉर्डर (४२%), कूलर (१२%), मिक्सर (६%), फ्रिज (३%).

**तक्ता क्र. २९ : विजेच्या मागणीची पूर्तता**

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| गैरलागू | ४४ | ४७ | ४७ | ४५ | १८३ |
| % | १००% | १००% | ९६% | १००% | ९८.८% |
| काहीही करत नाहीत | ० | ० | १ | ० | १ |
| % | ०% | ०% | २% | ०% | ०.६% |
| जनरेटरचा वापर | ० | ० | १ | ० | १ |
| % | ०% | ०% | २% | ०% | ०.६% |

मध्यप्रदेशमध्ये फक्त इंदोर जिल्ह्यातच गावाच्या हद्दीमध्ये २ माठे उद्योग असल्याचे आपण पाहिले. राज्यातील ग्रामीण भागातून वीजेचा तुटवडा मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. या पार्श्वभूमीवर हे कारखाने लागणाऱ्या विजेची पूर्तता कशा प्रकारे करतात याची माहिती घेण्यात आली.

इंदोर जिल्ह्यात असलेल्या २ कारखान्यांपैकी एका कारखान्यात जनरेटरची सोय उपलब्ध असल्याचे दिसले. तर दुसऱ्या कारखान्याला वीज मंडळाच्या भरवशावर रहावे लागते असे दिसले.

दिवसाच्या चोवीस तासांपैकी सरासरी किती तास गावामध्ये वीज उपलब्ध असते असा प्रश्न लोकांना विचारण्यात आला होता. त्यांनी दिलेली माहिती तक्ता क्र. ३० मध्ये दिली आहे.

सर्वेक्षित जिल्ह्यातील एकूण १२ गावातून वीज अजिबातच उपलब्ध नाही. सर्व जिल्ह्यातील बहुतांश गावांना दिवसभरामध्ये १ ते १० तास वीज पुरवठा होतो. हा वीज पुरवठा अत्यंत अनियमित व बेभरवशाचा असल्याचे सर्व जिल्ह्यातील लोकांनी सांगितले.

पन्ना जिल्ह्यामध्ये विजेची परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. तेथे २४ तासापैकी सरासरी केवळ ५.४ तासच वीज उपलब्ध असते. त्याखालोखाल छत्रपूर (८.५) तास व इंदोर (९.४) तास या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. धार जिल्ह्यामध्ये परिस्थिती सर्वात चांगली आहे. म्हणजे या जिल्ह्यातील गावांना दिवसातून सरासरी ११ तास वीजपुरवठा होतो. मध्यप्रदेशातील खेडेगावांमधून २४ तासापैकी सरासरी ८.६ तासच वीज उपलब्ध असते.

### तक्ता क्र. ३० : दर दिवसाची विजेची उपलब्धता

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| **एकूण सर्वेक्षित गावे** | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| गैरलागू | ७ | १ | ० | ४ | १२ |
| १ - १० तास | २५ | १८ | ३२ | ३५ | ११० |
| ११ - १५ तास | ६ | २१ | १० | ५ | ४२ |
| १५ तासापेक्षा अधिक | ६ | ७ | ७ | १ | २१ |
| **सरासरी उपलब्ध वीज** | **८.५** | **११.०** | **९.४** | **५.४** | **८.६** |

आता आपण आठवड्यामध्ये सरासरी किती दिवस गावांमधून वीज उपलब्ध असते ते पाहू.

### तक्ता क्र. ३१ : आठवड्यातील विजेची उपलब्धता

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| **एकूण सर्वेक्षित गावे** | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| गैरलागू | ७ | १ | ० | ४ | १२ |
| १ दिवस | ० | १ | ० | १६ | १७ |
| २ - ४ दिवस | २६ | १८ | ३७ | २४ | १०५ |
| ५ किंवा त्यापेक्षा अधिक दिवस | ११ | २७ | १२ | १ | ५१ |
| **सरासरी उपलब्धता** | **३.५** | **४.७** | **३.९** | **१.९** | **३.५** |

आठवड्यातून सरासरी उपलब्ध विजेची आकडेवारी बघितली असता फारसे आशादायक चित्र दिसत नाही. पन्ना व छत्रपूर जिल्ह्यामध्ये वीज उपलब्धता अत्यंत कमी आहे. या जिल्ह्यातील बहुतांश गावातून केवळ २ ते ४ दिवसच वीज उपलब्ध असल्याचे दिसते. सर्वात चांगली परिस्थिती धार जिल्ह्यात आढळते.

आठवड्यामध्ये सरासरी उपलब्ध असलेल्या विजेच्या बाबतीत जिल्हावार पुढीलप्रमाणे क्रम लावता येईल - पन्ना १.९ दिवस, छत्रपूर ३.५ दिवस, इंदोर ३.९ दिवस, धार ४.७ दिवस. या सर्व

जिल्ह्यातून वीज एकदा गायब झाली की ४-५ दिवस येतच नाही अशी तक्रार ऐकायला मिळाली.

मध्यप्रदेशामधील खेडेगावाला आठवड्यातून सरासरी फक्त ३.५ दिवस म्हणजेच केवळ निम्मे दिवस वीज मिळते. बाकीचे दिवस गावे अंधारातच बुडालेली असतात.

**तक्ता क्र. ३२ : पावसाळ्यात विजेची उपलब्धता**

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| **एकूण सर्वेक्षित गावे** | **४४** | **४७** | **४९** | **४५** | **१८५** |
| गैरलागू | ७ | १ | ० | ४ | १२ |
| ० दिवस | ० | ३ | ० | ० | ३ |
| १ - १० दिवस | ० | १ | ० | ५ | ६ |
| ११ - २० दिवस | १ | ३ | २ | १७ | २३ |
| २१ - ३० दिवस | ११ | ७ | १२ | ८ | ३८ |
| ३१ - ४० दिवस | २ | १ | ३ | ५ | ११ |
| ४१ - ५० दिवस | १४ | १० | १९ | ५ | ४४ |
| ५१ दिवसांपेक्षा अधिक | ९ | २१ | १७ | १ | ४८ |
| **पावसाळ्यामध्ये सरासरी उपलब्ध वीज (दिवसांमध्ये)** | **३७.७** | **४५.४** | **४७** | **२३.३** | **३८.६** |

वरील तक्त्यामध्ये सर्वेक्षित जिल्ह्यांसाठी पावसाळ्यात ३ महिन्यांपैकी (९० दिवस) उपलब्ध असलेल्या विजेची आकडेवारी दाखवली आहे.

आधीच्या आकडेवारीप्रमाणेच पन्ना जिल्ह्यात पावसाळ्याच्या दिवसांमध्येदेखील वीज अत्यंत कमी प्रमाणात उपलब्ध असते. ९० दिवसांपैकी फक्त २३ दिवस वीज उपलब्ध असते असे आकडेवारी सांगते. छत्रपूर जिल्ह्यामध्ये त्यापेक्षा परिस्थिती जरा बरी असून तेथे सुमारे ३८ दिवस वीज उपलब्ध असते. धार व इंदोर जिल्ह्यामध्ये परिस्थिती सर्वात चांगली आहे. तेथे पावसाळ्यात अनुक्रमे ४५ व ४७ दिवस वीज उपलब्ध असते. म्हणजेच या जिल्ह्यात पण पावसाळ्यातील निम्मे दिवस वीज उपलब्ध असते व उरलेले दिवस गायब असते असा त्याचा अर्थ होतो.

मध्यप्रदेश ग्रामीण भागाचा विचार केला तर तेथे पावसाळ्यातील एकूण ९० दिवसांपैकी सरासरी फक्त ३९ दिवस वीज उपलब्ध असते.

वरील तक्त्यांमधून वीज उपलब्धतेची मध्यप्रदेशातील खेडेगावांसाठीची आकडेवारी बघितली तर तेथे परिस्थिती केवढी गंभीर आहे हे कळते. सर्वात जास्त पन्ना व त्याखालोखाल छत्रपूर जिल्ह्यातील ग्रामीण जनतेला विद्युत टंचाईला तोंड द्यावे लागत असल्याचे प्रकर्षाने दिसून येते.

आता आपण लोकांना वीज देयकापोटी किती रक्कम भरावी लागते त्याची आकडेवारी पाहू.

**तक्ता क्र. ३३ : वीज देयकाची रक्कम**

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| **एकूण सर्वेक्षित गावे** | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| रू. ५० पर्यंत | ० | ३ | ० | १ | ४ |
| ५१ - ७५ रूपये | ० | १ | ० | ० | १ |
| ७६ - १०० रूपये | २१ | ७ | ५ | २१ | ५४ |
| १०१ - १५० रूपये | १६ | ९ | २६ | १६ | ६७ |
| १५१ - २०० रूपये | ० | १५ | १२ | २ | २९ |
| रू. २०१ पेक्षा अधिक | ० | ९ | ६ | ० | १५ |
| **सरासरी वीज देयकाची रक्कम रूपये** | **१०२** | **१७६** | **१६८** | **११८** | **१४४** |

गावामधील अधिकृत वीज जोड असलेल्या ग्राहकाला सरासरी किती पैसे वीज देयकापोटी महिन्याला भरावे लागतात त्याचा गोषवारा वरील तक्त्यातून मांडला आहे.

महिना सरासरी ७५ रूपयांपेक्षा कमी वीज देयक येत असल्याचे फारच थोड्या गावातून सांगण्यात आले. छत्रपूर व पन्ना जिल्ह्यातील जवळजवळ सर्व गावांमधून आपण सरासरी ७५ -१५० रूपयांपर्यंत वीज देयक भरत असल्याचे लोकांनी सांगितले. धार व इंदोर जिल्ह्यातून महिना २०० रू. पेक्षा वीजदेयक येणारी गावे पण आहेत.

जिल्हावार सरासरी वीजदेयकाच्या रक्कमेनुसार क्रम लावला असता पुढील चित्र दिसते. छत्रपूर १०२ रूपये, पन्ना ११८ रूपये, इंदोर १६८ रूपये, धार १७६ रूपये.

अन्य दोन जिल्ह्यांपेक्षा छत्रपूर व पन्ना जिल्ह्यात वीजदेयकाची सरासरी रक्कम बरीच कमी आहे. बहुधा या जिल्ह्यामध्ये विजेची उपलब्धता कमी असल्याने घरगुती विजेचा खप पण कमी होत असावा व त्यामुळेच वीज देयक देखील कमी येत असावे.

वीजदेयकासंबंधी तक्रारी सर्व गावातून ऐकायला मिळाल्या. वीज वापरापेक्षा जास्त प्रमाणात वीज देयक येणे, मीटर रिडिंग न बघताच वीजदेयक देणे, देयकासंबंधी तक्रारी ऐकून न घेणे वगैरे. भरमसाठ वीजदेयक आल्याने अनेकांनी स्वतःहून वीज तोडायला सांगितली, त्यापैकी काहींनी अनधिकृतपणे वीजजोड घेण्यास सुरूवात केली. सरकारने निर्धारित वेळेनुसार नियमितपणे वीजपुरवठा घर व शेतीपंपासाठी केला तर आम्ही आहे त्या पेक्षा जास्त दराने वीज घेऊ. अट मात्र एकच नियमित व खात्रीशीर पुरवठा. अशी प्रतिक्रिया सर्व जिल्ह्यातून ऐकायला मिळाली.

मध्यप्रदेशमधील ग्रामीण भागातील वीज ग्राहकांस महिन्याला सरासरी १४४ रूपये वीजदेयकापोटी भरावे लागतात.

**तक्ता क्र. ३४ : नविन वीजजोड घेण्यासाठी लाच**

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| होय | ११ | २३ | ३० | १० | ७४ |
| % | २५% | ४९% | ६१.२% | २२.२% | ४०% |
| नाही | ३३ | २४ | १९ | ३५ | १११ |
| % | ७५% | ५१% | ३८.८% | ७७.८% | ६०% |

मध्यप्रदेश राज्य विद्युत मंडळात भ्रष्टाचाराचे प्रमाण किती आहे हे पाहण्यासाठी नविन वीजजोड घेण्यासाठी कर्मचाऱ्यांना लाच द्यावी लागते का असा प्रश्न गावकऱ्यांना विचारला होता. त्याची आलेली उत्तरे तक्ता क्र. ३४ मध्ये दिली आहेत.

राज्य विद्युत मंडळामध्ये भ्रष्टाचार सर्वच जिल्ह्यामधून होत असल्याचे दिसते फक्त त्याची टक्केवारी कमी जास्त असल्याचे आढळते.

इंदोर जिल्ह्यामध्ये सर्वाधिक म्हणजे ३० गावातून (६१%) कर्मचारी लाच घेत असल्याचे लोकांनी सांगितले. त्याखालोखाल आदिवासींचे प्राबल्य असलेल्या धार जिल्ह्याचा (४९%) क्रमांक लागतो. छत्रपूर (२५%) व पन्ना (२२%) या जिल्ह्यांमध्ये त्यामानाने कमी गावातील लोकांना लाच द्यावे लागत असल्याचे दिसते.

छत्रपूर व पन्ना जिल्ह्यातील ७५% पेक्षा अधिक गावातील लोकांनी राज्य विद्युत मंडळाचे कर्मचारी अत्यंत प्रामाणिक व इनामदार असून लाच अजिबात घेत नाहीत असे आवर्जून सांगितले.

मध्यप्रदेशातील ४०% गावातून नविन वीजजोड घेण्यासाठी वीज मंडळाच्या कर्मचाऱ्यांना 'चहा-पाण्यासाठी' लाच द्यावी लागते.

**तक्ता क्र. ३५ : वीज जोड : लाचेची रक्कम**

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| रू. ५० पर्यंत | २ | ७ | ५ | १० | २४ |
| ५१ - ७५ रूपये | ० | १ | ३ | ० | ४ |
| ७६ - १०० रूपये | ३ | ८ | १४ | ० | २५ |
| १०१ - १५० रूपये | १ | ० | २ | ० | ३ |
| १५१ - २०० रूपये | २ | ३ | २ | ० | ७ |
| रू. २०१ पेक्षा अधिक | ३ | ४ | ४ | ० | ११ |
| **सरासरी दिलेली लाचेची रक्कम रूपये** | **२४०** | **१६०** | **३३१** | **४३** | **२२६** |

नविन वीजजोड देण्यासाठी राज्य विद्युत मंडळाचे कर्मचारी सरासरी किती लाच घेतात याची जिल्हावार आकडेवारी वरील तक्त्यात दाखवली आहे.

विश्लेषण केले असता असे दिसते जास्त करून १०० रूपयांपर्यंत कर्मचाऱ्यांना लाच द्यावी लागते. मात्र २०० रूपयांपेक्षा जास्त लाच द्यावी लागणारी गावे देखील छत्रपूर, धार, इंदोर जिल्ह्यात आहेत.

नविन वीजजोड घेण्यासाठी सरासरी सर्वात जास्त लाच इंदोर जिल्ह्यात - ३३१ रूपये एवढी द्यावी लागते. त्याखालोखाल छत्रपूर जिल्ह्यात २४० रूपये व धार जिल्ह्यात १६० रूपये या जिल्ह्यांचा क्रम लागतो. पन्ना जिल्ह्यामधील सर्वात कमी - ४३ रूपये लाच द्यावी लागते. अति मागास अशा पन्ना जिल्ह्यामधील अत्यल्प प्रमाणात लाच घेणाऱ्या वीज मंडळाच्या कर्मचाऱ्यांचे खरोखरच कौतुक केले पाहिजे.

मध्यप्रदेशामध्ये नविन वीजजोड घेण्यासाठी सरासरी २२६ रूपये लाच वीज मंडळाच्या कर्मचाऱ्यांना द्यावी लागते.

*"पेपर उडते है तो वजन तो रखना ही पडता है। बिजली विभाग के कर्मचारियों को घूस तो देनी ही पडती है।"* - ग्रामस्थ, गलोंडा, जि. इंदोर

### तक्ता क्र. ३६ : वीज पुरवठा अनियमिततेची कारणे

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| कमी वीज उत्पादन | १५ | २५ | २८ | २६ | ९४ |
| % | ३४.१% | ५३.२% | ५७.१% | ५७.८% | ५०.८% |
| विद्युत मंडळाचे दुर्लक्ष | १९ | १३ | १७ | १५ | ६४ |
| % | ४३.२% | २७.७% | ३४.७% | ३३.३% | ३४.६% |
| भ्रष्टाचार | १३ | ८ | १५ | १२ | ४८ |
| % | २९.६% | १७% | ३०.६% | २६.७% | २६% |
| अयोग्य वीज वितरण | ९ | ८ | १२ | ३ | ३२ |
| % | २०.४% | १७% | २४.५% | ६.७% | १७.३% |
| विजेची चोरी | ९ | २ | ८ | ९ | २८ |
| % | २०.४% | ४.३% | १६.३% | २०% | १५.१% |
| देखभाल केली जात नाही | २ | ५ | २ | १० | १९ |
| % | ४.५% | १०.६% | ४% | २२.२% | १०.३% |
| लोक वेळेवर देयक भरत नाहीत | ३ | २ | १ | २ | ८ |
| % | ६.८% | ४.३% | २% | ४.४% | ४.३% |
| क्षमतेपेक्षा जास्त वीजजोड | ३ | २ | १ | ० | ६ |
| % | ६.८% | ४.३% | २% | ०% | ३.२% |
| तक्रारींची दखल घेत नाहीत | १ | ० | ० | १ | २ |
| % | २.३% | ०% | ०% | २.२% | १.१% |
| निधीचा अभाव | ० | १ | ० | ० | १ |
| % | ०% | २.१% | ०% | ०% | ०.५% |
| कारणे माहित नाहीत | ३ | ० | १ | २ | ६ |
| % | ६.८% | ०% | २% | ४.४% | ३.२% |

मध्यप्रदेशामध्ये सर्वेक्षित जिल्ह्यातील ग्रामीण भागामधून विजेची स्थिती किती गंभीर आहे हे आपण याआधीच पाहिले आहे. या परिस्थितीला जबाबदार कोण आहे, वीजपुरवठा अनियमिततेची कारणे कोणकोणती आहेत, यावर ग्रामस्थांनी काय सांगितले आहे त्याचे आपण आता विश्लेषण करू.

तक्ता क्रं. ३६ मध्ये वीजपुरवठ्याच्या अनियमिततेची कारणे व त्याची जिल्हावार आकडेवारी दिली आहेत.

वीजपुरवठ्यातील अनियमिततेचे सर्वात महत्त्वाचे कारण कमी वीज उत्पादन हे असल्याचे सर्व जिल्ह्यातील गावांनी सांगितले. पन्ना (५८%), इंदोर (५७%), धार (५३%), छत्रपूर (३४%). पूर्वी अखंड मध्यप्रदेश असताना विजेची स्थिती चांगली होती. छत्तीसगड राज्य मध्यप्रदेश पासून वेगळे झाल्यानंतर तेथे असलेली वीज निर्मिती केंद्रे त्या राज्याच्या अधिपत्याखाली गेली. मध्यप्रदेशमध्ये फार कमी वीजनिर्मिती केंद्रे राहिली. छत्तीसगड राज्याकडून वीज पाहिजे असेल तर ती आता खरेदी करावी लागते. याचा परिणाम मध्यप्रदेशच्या वीज उत्पादनावर होऊन वीज टंचाई जाणवू लागली. त्यामुळे ग्रामीण भागातील भारनियमनाचे प्रमाण वाढले आहे.

राज्य विद्युत मंडळाचे ग्रामीण भागाकडे होत असलेले दुर्लक्ष व गलथान कारभार हे देखील महत्त्वाचे कारण असल्याचे लोकांनी सांगितले - छत्रपूर (४३%), इंदोर (३५%), पन्ना (३३%), धार (२८%). विद्युत मंडळाच्या कर्मचाऱ्यांकडून होत असलेला भ्रष्टाचार - जो लाच देईल त्याला वीज पुरवणे या कारणांमुळे देखील वीजपुरवठ्यावर परिणाम झाला असल्याचे अनेक गावांनी सांगितले इंदोर (३१%), छत्रपूर (३०%), पन्ना (२७%) आणि धार जिल्हा (१७%).

अयोग्य वितरणामुळे ग्रामीण भागामध्ये वीजपुरवठ्याची दुर्दशा झाली आहे. शहर व कारखान्यांना अखंड वीजपुरवठा तर ग्रामीण भाग व शेती पंपासाठी सतत भारनियमन वीज मंडळाकडून होत असल्याची व त्यामुळेच ग्रामीण भागात कमी वीज मिळत असल्याची तक्रार लोकांनी केली. त्याची जिल्हावार टक्केवारी पुढीलप्रमाणे - इंदोर (२४%), छत्रपूर (२०%), धार (१७%), पन्ना (७%).

ग्रामीण भागामध्ये वीजवाहक तारांवर आकडे टाकून वीज चोरी होण्याचे प्रमाण देखील जास्त आहे. या अनधिकृत वीजजोडांकडे मंडळाचे कर्मचारी दुर्लक्ष करतात, अशा लोकांकडून लाच घेतात, त्यामुळे नियमित वीजजोड घेतलेल्यांना त्रास होतो व भार वाढल्याने वीजपुरवठ्यात देखील व्यत्यय येतो अशी तक्रार ऐकायला मिळाली - छत्रपूर व पन्ना (२०%), इंदोर (१६%). फक्त धार जिल्ह्यामध्ये हे प्रमाण कमी असल्याचे (४%) दिसते.

वीजमंडळाचे कर्मचारी नियमितपणे देखभाल करत नाहीत असा सूर काही गावातून ऐकायला मिळाला. - पन्ना (२२%), धार (११%), छत्रपूर व इंदोर (४%).

याशिवाय लोक वीजदेयक भरतच नाहीत किंवा वेळेवर भरत नाहीत त्यामुळे वीज मंडळाकडे कमी पैसा जमा होऊन, नविन किंवा देखभालीची कामे होऊ शकत नाहीत, गावातील रोहित्राच्या

क्षमतेपेक्षा अधिक वीजजोड दिले गेल्याने जास्त वीज खेचली जाऊन विजपुरवठ्यात वारंवार व्यत्यय येतो, तक्रारींची दखल घेतली जात नाही, निधीचा अभाव अशी कारणे देखील देण्यात आली.

संपूर्ण मध्यप्रदेशासाठी ग्रामीण भागातील अनियमित विजपुरवठ्यासाठी लोकांनी दिलेली कारणे पुढील प्रकारे मांडता येतील. राज्यामध्ये विजेचे कमी उत्पादन (५१%), विद्युत मंडळाचे ग्रामीण भागाकडे दुर्लक्ष (३५%), कर्मचाऱ्यांचा भ्रष्टाचार (२६%), शहर व ग्रामीण भागामध्ये असमतोल वीज वितरण (१७%), विजेची चोरी (१५%), योग्य देखभालीचा अभाव (१०%), वीज देयकांची थकबाकी (४%), गावामध्ये क्षमतेपेक्षा अधिक वीजजोड (३%).

वर्ष २००१ मध्ये मध्यप्रदेशातील ग्रामीण भागामध्ये विजेची काय परिस्थिती होती, अशी परिस्थिती निर्माण होण्यास कोणकोणती कारणे आहेत हे आपण बघितले. आता ही परिस्थिती बदलण्यासाठी, ग्रामीण भागातील वीज पुरवठा सुधारण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना लोकांनी सुचवल्या आहेत त्याचा आपण आढावा घेऊ.

तक्ता क्र. ३७ मध्ये सुरळीत वीजपुरवठा होण्यासाठी लोकांनी सुचवलेल्या उपाययोजनांची जिल्हावार आकडेवारी दिली आहे. या आकडेवारीचे विश्लेषण निश्चितच उद्‌बोधक ठरेल. छत्तीसगड राज्य मध्यप्रदेशातून वेगळे झाल्याने मध्यप्रदेशचे वीज उत्पादन एकदम कमी झाले आहे. त्यामुळे संपूर्ण राज्य वीज टंचाईच्या गर्तेत पडले आहे. परिस्थितीवर मात करण्यासाठी अनेक गावांनी वीज उत्पादनात वाढ करण्यास सुचविले आहे - पन्ना (६७%), धार (६०%), इंदोर (५९%), छत्रपूर (५५%) गावे. मात्र वीज उत्पादन कशा प्रकारे वाढवता येईल ते मात्र लोकांना सांगता आलेले नाही.

उल्लेखनीय बाब म्हणजे धार जिल्ह्यातील २ गावांनी (४%) आणि इंदोर जिल्ह्यातल्या एका गावाने (२%) सौर उर्जेचा वापर करून वीज निर्मिती करण्याचे सुचवले आहे. अपारंपारिक उर्जा स्त्रोत वापरण्याची मागणी केवळ तीन गावातील काही लोकांकडून आली असली तरीदेखील ग्रामीण भागातील लोक देखील असा विचार करत आहेत ही बाब निश्चितच स्तुत्य आहे.

विद्युत मंडळातील कर्मचाऱ्यांच्या भ्रष्टाचारास आळा घालणे हा उपाय देखील सर्व जिल्ह्यातील गावांनी सुचवला आहे. यामुळे अनधिकृत वीजजोड घेणे थांबेल, लोकांचा मंडळावर विश्वास बसून मंडळाला अधिक उत्पन्न मिळेल अशी भावना लोकांनी व्यक्त केली - इंदोर (३७%), छत्रपूर (३०%), पन्ना (२७%) आणि धार (२६%). या जोडीलाच अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांवर योग्य देखरेख करून त्यांच्याकडून चांगले काम करून घेणे व कार्यक्षमता अधिक वाढवणे असा पर्याय देखील ग्रामस्थांनी सुचवला आहे. त्याची जिल्हावार टक्केवारी पुढील प्रमाणे - छत्रपूर (३६%), पन्ना (२९%), इंदोर (२५%) आणि धार जिल्हा (६%).

## तक्ता क्र. ३७ : सुरळीत विजपुरठ्यासाठी उपाय योजना

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| वीज उत्पादनात वाढ | २४ | २८ | २९ | ३० | १११ |
| % | ५४.६% | ५९.६% | ५९.२% | ६६.७% | ६०% |
| भ्रष्टाचाराला आळा | १३ | १२ | १८ | १२ | ५५ |
| % | २९.६% | २५.५% | ३६.७% | २६.७% | २९.७% |
| योग्य देखरेख आणि काम | १६ | ३ | १२ | १३ | ४३ |
| % | ३६.४% | ६.४% | २४.५% | २८.९% | २३.८% |
| वीज चोरीस आळा | ९ | ८ | १२ | १२ | ४१ |
| % | २०.५% | १७% | २४.५% | २६.७% | २२.२% |
| वितरण व्यवस्थेत सुधारणा | ९ | ६ | ७ | ७ | २९ |
| % | २०.५% | १२.८% | १४.३% | १५.६% | १५.७% |
| नियमित पुरवठा व देखभाल | १ | ३ | २ | ४ | १० |
| % | २.३% | ६.४% | ४.१% | ८.९% | ५.४% |
| थकित देयकांची वसुली | ५ | ० | १ | १ | ७ |
| % | ११.४% | ०% | २% | २.२% | ३.८% |
| सौर उर्जेचा वापर | ० | २ | १ | ० | ३ |
| % | ०% | ४.३% | २% | ०% | १.६% |
| चांगल्या दर्जाच्या साहित्याचा वापर | २ | ० | ० | ० | २ |
| % | ४.६% | ०% | ०% | ०% | १.१% |
| विंशेष सूचना न करणारी गावे | ८ | १ | ६ | ४ | १९ |
| % | १८.२% | २.१% | १२.२% | ९% | ८.१% |

सर्वच जिल्ह्यातून वीज चोरीचे प्रमाण बरेच असल्याचे आपण याआधीच बघितले आहे. वीज चोरीला आळा घातला, अशा लोकांना दंड केला तर वीज मंडळाचे उत्पन्न वाढून वीज उत्पादन व वितरणासाठी पैसा उपलब्ध होऊ शकेल असे लोकांनी सांगितले. या पर्यायाचा वापर करण्याची सूचना करणाऱ्या गावांची टक्केवारी पुढीलप्रमाणे - पन्ना (२७%), इंदोर (२५%), छत्रपूर (२१%) आणि धार (१७%).

सध्या शहरी व औद्योगिक भाग व ग्रामीण भाग या दोहोंमध्ये असमतोल, अयोग्य असे वितरण होत आहे, त्याचबरोबर क्षमतेपेक्षा अधिक वीजजोड, कमी क्षमतेचे रोहित यासारख्या समस्या गावपातळीवर आहेत. म्हणूनच लोकांनी वितरण व्यवस्थेत सुधारणा करण्याची मागणी केली आहे. - छत्रपूर (२१%), पन्ना (१६%), इंदोर (१४%), धार (१३%).

याशिवाय वीज पुरवठा यंत्रणेची नियमित देखभाल व दुरुस्ती, थकित देयकांची ग्राहकांकडून वसुली, चांगल्या दर्जाच्या साहित्याचा वापर ज्यामुळे वारंवार बिघाड होणार नाही, असे उपाय देखील लोकांनी सुचवले आहेत.

मध्यप्रदेशासाठी लोकांनी सुचवलेल्या सुरळीत विजपुरवठ्यासाठीच्या उपाययोजनांची गोळाबेरीज पुढीलप्रमाणे करता येईल - वीज उत्पादनात वाढ करणे (६०%), वीज मंडळातील भ्रष्टाचाराला आळा घालणे (३०%), अधिकारी वर्गाकडून योग्य देखरेख (२४%), वीज चोरी थांबवणे (२२%), वीज वितरण व्यवस्थेत सुधारणा (१६%), नियमित देखभाल व वीज पुरवठा (५%), थकित देयकांची वसुली (४%), सौर उर्जेसारख्या अपारंपारिक उर्जा स्त्रोतांचा वीज निर्मितीसाठी वापर (२%).

*"बिना मीटरवालों का अच्छा है। वो लोग तो २०० वॅट का भी बल्ब लगाते है। और हमें बिजली का बील ज्यादा न आए इसलिए झिरो वॅट का बल्ब लगाना पडता है। बिजली बोर्ड में रिश्वत के बगैर कोई काम ही नही चलता।"*

- ग्रामस्थ, छोडी खुडैल, जि. इंदोर

*"मंत्री के जिले में कोई कटौती नही होती। वहाँ चोबीस घंटे बिजली रहती है, और हमारे यहाँ तो आठ घंटे मिलना भी मुश्किल।"*

- ग्रामस्थ, सिंधी बरोदा, जि. इंदोर

## पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता क्षेत्र

पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता यांचा लोकांच्या आरोग्याशी अत्यंत जवळचा संबंध आहे. या दोन गोष्टींबद्दल काळजी घेतली तर साथीचे आजार सहजपणे टाळता येतात. मात्र त्यासाठी शासन व जनता यांचे सहकार्य आवश्यक आहे. लोकांना स्वच्छ शुद्ध पिण्याचे पाण्याच्या स्त्रोत उपलब्ध करून देणे ही सरकारची जबाबदारी आहे तर या स्त्रोतांचा योग्य वापर, देखभाल व किरकोळ दुरूस्ती करणे हे लोकांचे कर्तव्य आहे.

मध्यप्रदेशमध्ये पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छतेच्या क्षेत्रामध्ये किती प्रमाणात ग्रामीण भागातील जनतेला सोयी उपलब्ध झाल्या आहेत, किती प्रमाणात त्यांचा वापर लोकांकडून होतो, अजून कोणकोणत्या सोयी होणे गरजेचे आहे या प्रश्नांची उत्तरे मिळवण्याचा प्रयत्न आपण यापुढील माहितीच्या आधारे करू.

**तक्ता क्र. ३८ : पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत**

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| हातपंप | ४४ | ४६ | ४९ | ४५ | १८४ |
| % | १००% | ९७.९% | १००% | १००% | ९९.५% |
| विहिर | ४० | ३६ | ४ | ४१ | १२१ |
| % | ९०.९% | ७६.६% | ८.२% | ९१.१% | ६५.४% |
| नदी | ० | ४ | ० | २ | ६ |
| % | ०% | ८.५% | ०% | ४.४% | ३.२% |
| तलाव | ० | ३ | २ | १ | ६ |
| % | ०% | ६.४% | ४.१% | २.२% | ३.२% |
| सार्वजनिक नळ | ३ | २३ | १४ | ० | ३९ |
| % | ६.९% | ४९% | २८.६% | ०% | २१.१% |
| घरगुती नळजोड | ० | २० | ७ | ० | २७ |
| % | ०% | ४२.६% | १४.३% | ०% | १४.६% |

मध्यप्रदेशमधील जवळजवळ सर्व सर्वेक्षित गावांमधून कूपनलिकांवर बसवलेले हातपंप पिण्याच्या पाण्यासाठी उपलब्ध होते. छत्रपूर आणि पन्ना जिल्ह्यामध्ये ९१% गावांमधून विहिरींचा वापर केला जात होता. तर धार जिल्ह्यामध्ये ७७% गावात विहिरी आढळल्या. इंदोर जिल्ह्यात मात्र केवळ ४ गावातूनच (८%) विहिरी असल्याचे दिसले. या जिल्ह्यात पिण्याच्या पाण्यासाठी मुख्यत्वे हातपंपाचाच वापर केला जातो.

धार जिल्ह्यातील ४ गावांमधून (९%) तर पन्ना जिल्ह्यात २ गावातून (४%) नदीचे पाणी पिण्यासाठी देखील वापरले जात होते. धार (६%), इंदोर (४%) व पन्ना (२%) एवढ्या गावातून पिण्याचे पाणी तलावातून आणले जात असल्याचे सांगितले.

धार जिल्ह्यामध्ये सार्वजनिक नळाद्वारे २३ गावातून (४९%) पिण्याचे पाणी पुरवले जात होते तर ४३% गावातून घरगुती नळजोड होते. इंदोर जिल्ह्यामध्ये २९% गावातून सार्वजनिक नळ तर १४% गावातून घरगुती नळ जोडाद्वारे पिण्याचे पाणी पुरवले जात असल्याची माहिती मिळाली. छत्रपूर जिल्ह्यात केवळ ३ गावांमध्येच सार्वजनिक नळ असल्याचे आढळून आले. अन्य गावांमध्ये काठेही सार्वजनिक अथवा घरगुती नळजोड नव्हते. पन्ना जिल्ह्यात एकही नळजोड आढळला नाही.

मध्यप्रदेशामधील खेडेगावातील पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची आकडेवारी पुढीलप्रमाणे देता येईल. हातपंप (९९%), विहिरी (६५%), नदी व तलाव (३%), याचबरोबर २१% गावात सार्वजनिक नळ तर १५% गावात घरगुती नळजोड आहेत.

**तक्ता क्र. ३९ : एकूण व चालू हातपंप**

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| **एकूण सर्वेक्षित गावे** | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| एकूण हातपंप | २२५ | २०४ | २५४ | २५७ | ९४० |
| **प्रत्येक गावात सरासरी हातपंप** | **५.१** | **४.४** | **५.२** | **५.५** | **५.१** |
| चालू हातपंप | २१० | १०९ | १८३ | २१५ | ७१७ |
| **चालू हातपंपाची टक्केवारी** | **९३.३%** | **५३.४%** | **७२%** | **८३.७%** | **७६.३%** |

वरील तक्त्यामध्ये सर्वेक्षित जिल्ह्यातील गावांमधून असलेले एकूण हातपंप व चालू हातपंप यांची आकडेवारी दर्शवली आहे.

धार (४.४%) जिल्हा वगळता बाकी सर्व जिल्ह्यातून प्रत्येक गावातून सरासरी ५ पेक्षा थोडेसे जास्त हातपंप पिण्याच्या पाण्यासाठी उपलब्ध होते.

छत्रपूर जिल्ह्यामध्ये चालू असलेल्या हातपंपाची टक्केवारी सर्वात जास्त होती (९३%). तेथे एकूण २२५ हातपंपापैकी २१० हातपंप चालू स्थितीत आढळले. धार जिल्ह्यामध्ये सर्वात कमी हातपंप चालू असल्याचे दिसले (५३%) तेथे २०४ पैकी फक्त १०९ हातपंपच चालू होते. इतर जिल्ह्यांसाठी चालू हातपंपाची टक्केवारी पुढीलप्रमाणे पन्ना (८४%), इंदोर (७२%).

मध्यप्रदेशमध्ये एका गावामध्ये सरासरी ५ हातपंप होते तर एकूण हातपंपापैकी चालू असलेल्या हातपंपांची सरासरी टक्केवारी ७६% एवढी असल्याचे दिसून आली.

**तक्ता क्र. ४० : नळ पाणीपुरवठा योजना**

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| **नळपाणीपुरवठा योजना** | | | | | |
| असलेली गावे | ३ | २७ | २१ | ० | ५१ |
| % | ६.८% | ५७.५% | ४२.९% | ०% | २७.६% |
| नसलेली गावे | ४१ | २० | २८ | ४५ | १३४ |
| % | ९३.२% | ४२.५% | ५७.१% | १००% | २.४% |
| **योजना उभारणीस मदत** | | | | | |
| ग्रामपंचायत | १ | १६ | १४ | ० | ३१ |
| % | २.३% | ३४% | २८.६% | ०% | १६.८% |
| केंद्रसरकार | ० | २ | ४ | ० | ६ |
| % | ०% | ४.३% | ८.२% | ०% | ३.२% |
| राज्य सरकार | २ | ० | २ | ० | ४ |
| % | ४.६% | ०% | ४.१% | ०% | २.१% |
| लोकवर्गणी | ० | ५ | ० | ० | ५ |
| % | ०% | १०.६% | ०% | ०% | २.७% |
| खाजगी पाईप वापरून | ० | १ | ० | ० | १ |
| % | ०% | २.१% | ०% | ०% | ०.५% |
| माहित नाही | ० | ३ | १ | ० | ४ |
| % | ०% | ६.४% | २% | ०% | २.१% |

वरील तक्त्यामध्ये नळ पाणीपुरवठा योजनेची गावामध्ये उपलब्धता व योजना उभारणीस मदत केलेल्या संस्थांसंबंधीची आकडेवारी देण्यात आली आहे.

पन्ना जिल्ह्यातील एकाही गावातून नळपाणीपुरवठा योजना असल्याचे दिसले नाही तर छत्रपूर जिल्ह्यामध्ये केवळ ३ गावातून पाणीपुरवठा योजना असल्याचे पहायला मिळाले. मध्यप्रदेशाच्या उत्तर भागात असलेल्या या जिल्ह्यामध्ये मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध आहे. पाण्याची भूगर्भातील पातळीदेखील फारशी खोल नाही. छत्रपूर जिल्ह्यात तर अगदी १५-२० फुटावर पाणी लागते असे लोकांनी सांगितले. त्यामुळे या जिल्ह्यांमध्ये काही गावातून लोकांनी घराच्या आवारातच स्वतःच्या मालकीच्या विहिरी खोदल्या असल्याचे दिसते. याशिवाय ग्रामपंचायतीने कूपनलिका खोदून हातपंप बसवले आहेतच. पाणी भरपूर प्रमाणात उपलब्ध असल्याने या जिल्ह्यांमध्ये नळपाणीपुरवठा योजना अभावानेच आढळतात.

याउलट धार व इंदोर जिल्ह्यातून नळ पाणीपुरवठा योजनेचे काम बऱ्याच गावातून झाले आहे. धार जिल्ह्यात २७ गावांमध्ये (५८%) तर इंदोर जिल्ह्यात ४३% गावांमधून नळ पाणीपुरवठा योजना कार्यन्वित असल्याचे दिसून आले.

धार जिल्ह्यामध्ये ३४% पाणीपुरवठा योजनांना ग्रामपंचायतीकडून तर ४% केंद्र सरकारकडून आर्थिक मदत देण्यात आली. ५ गावातून (११%) हे काम लोकवर्गणीतून तर एका गावात खाजगी पाईप वापरून योजनेचे काम पूर्ण करण्यात आले हे विशेष.

इंदोर जिल्ह्यात नळ पाणीपुरवठा योजनेस मदत करणाऱ्या विविध स्त्रोतांची वर्गवारी पुढीलप्रमाणे - ग्रामपंचायत (२९%), केंद्र सरकार (८%), राज्य सरकार (४%).

छत्रपूर जिल्ह्यात २ गावातील (५%) काम राज्य सरकारमार्फत तर एका गावात ग्रामपंचायतीमार्फत करण्यात आले.

ग्रामीण मध्यप्रदेशात २८% केवळ गावातून नळ पाणीपुरवठा योजना कार्यान्वित झाल्या आहेत तर ७२% गावे अजून त्यापासून वंचितच आहेत.

पिण्याचे पाणी किती दूरवरून आणावे लागते असा प्रश्न लोकांना विचारला होता त्याची दिलेली माहिती पुढे तक्ता क्र. ४१ दाखवली आहे.

छत्रपूर व धार जिल्ह्यामध्ये बहुतांश गावातील स्त्रोतांमध्ये वर्षभर पाणी उपलब्ध असते तर इंदोर व पन्ना जिल्ह्यातील काही गावातील लोकांना १ ते १.५ किमी दूर जावे लागते. फक्त इंदोर जिल्ह्यातील एका गावातील लोकांनाच २ किमी लांबून पाणी आणावे लागते.

पाण्याच्या स्त्रोताचे गावापासूनचे सरासरी अंतराची क्रमवारी पुढीलप्रमाणे देता येईल - पन्ना १ किमी, छत्रपूर व धार १.२ किमी, इंदोर १.५ किमी.

मध्यप्रदेशमधील खेडेगावातील लोकांना सरासरी १.३ किमी अंतारवरून पाणी आणावे लागते.

**तक्ता क्र. ४१ : पाण्याच्या स्त्रोताचे गावापासूनचे अंतर (किमी)**

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| गावामध्ये स्त्रोत | ३७ | ४० | १४ | ३१ | १२२ |
| ०.१ - १ किमी | १ | १ | २ | ४ | ८ |
| १ - १.५ किमी | ४ | ४ | १९ | ९ | ३६ |
| १.५ -२ किमी | २ | २ | १३ | १ | १८ |
| २ किमी पेक्षा अधिक | ० | ० | १ | ० | १ |
| **स्त्रोताचे सरासरी अंतर किमी** | **१.२** | **१.२** | **१.५** | **१.०** | **१.३** |

आता आपण उन्हाळ्यात पाण्याचे दुर्भिक्ष असताना पाणी खरेदी करावे लागते का ते पाहू.

**तक्ता क्र. ४२ : उन्हाळयात पाणी खरेदी**

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| पाणी खरेदी होय | ० | ६ | २ | १ | ९ |
| % | ०% | १२.८% | ४.१% | २.२% | ४.९% |
| पाणी खरेदी नाही | ४४ | ४१ | ४७ | ४४ | १७६ |
| % | १००% | ८७.२% | ९५.९% | ९७.८% | ९५.१% |
| **खरेदीमूल्य रू. प्रति १०० लिटर** | **०** | **६.५०** | **६.२५** | **३०** | **९.०** |

वरील तक्त्यामध्ये उन्हाळ्यात पाण्याचे दुर्भिक्ष असताना पाणी खरेदी विषयी आकडेवारी दिली आहे.

त्यावरून असे दिसते की छत्रपूर जिल्ह्यामध्ये कोणत्याही गावच्या लोकांना पाणी खरेदी करावे लागत नाही. पन्ना जिल्ह्यातील १ गावातून (२%), इंदोर २ गावे (४%) तर धार ६ गावे (१३%) असे पाणी खरेदी करावे लागते.

पाणी खरेदीचे १०० लिटरचे सरासरी खरेदीमूल्य इंदोरमध्ये ६.२५ रूपये, धार जिल्ह्यात ६.५० रूपये तर पन्ना जिल्ह्यात ३० रूपये एवढे असल्याचे कळाले.

मध्यप्रदेशमध्ये ग्रामीण भागात ५% गावातून उन्हाळ्यामध्ये दुर्भिक्ष असताना पाणी विकत घ्यावे लागल्याचे लोकांनी सांगितले. १०० लिटर पिण्याच्या पाण्यासाठी लोकांना सरासरी ९ रूपये मोजावे लागले.

**तक्ता क्र. ४३ : ग्रामपंचायतीला द्यावी लागणारी पाणीपट्टी**

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| पाणीपट्टी वसुली होय | ० | २१ | ९ | ० | ३० |
| % | ०% | ४५% | १८% | ०% | १६% |
| पाणीपट्टी वसुली नाही | ४४ | २६ | ४० | ४५ | १५५ |
| % | १००% | ५५% | ८२% | १००% | ८४% |
| **पाणीपट्टीची वार्षिक रक्कम रूपये** | | | | | |
| रू. - २५ पर्यंत | ० | ९ | ८ | ० | १७ |
| २५-५० रू. | ० | ११ | १ | ० | १२ |
| ५१ - ७५ रू. | ० | १ | ० | ० | १ |
| **सरासरी वार्षिक पाणीपट्टी रूपये** | **०** | **२९.५०** | **१५.६०** | **०** | **२५.३०** |

छत्रपूर व पन्ना जिल्ह्यातील गावातून ग्रामपंचायतीतर्फे पाणीपट्टी लोकांकडून अजिबातच वसूल केली जात नसल्याचे दिसले. इंदोर जिल्ह्यातील केवळ ९ गावातून (१८%) तर धार

जिल्ह्यातील ४५% गावातून पाणीपट्टी वसूल केली जात असल्याचे लोकांनी सांगितले. पाणीपट्टी वसुलीचे हे प्रमाण फारच कमी आहे. काही गावातून नळ पाणीपुरवठा योजना असूनही पाणीपट्टी वसूल केली जात नाही. त्यामुळे ग्रामपंचायती चांगल्या उत्पन्नाला मुकत आहेत असे वाटते. धार व इंदोर जिल्ह्यातील ज्या गावातून पाणीपट्टी वसूल केली जाते तेथे सर्व साधारणपणे वर्षाला घरामागे २५ ते ५० रूपये गोळा केले जातात. घरगुती नळजोड असले तरी ७५ रूपयाच्या वर वार्षिक पाणीपट्टी कोठेच नाही.

धार जिल्ह्यामध्ये घरामागे वर्षाला सरासरी २९.५० रूपये एवढी पाणीपट्टी तर इंदोर जिल्ह्यामध्ये १५.६० रूपये इतकी गोळा केली जाते.

मध्यप्रदेशमध्ये केवळ १६% गावातूनच ग्रामपंचायत पाणीपट्टी वसूल करताना दिसते. घरामागे सरासरी २५.३० रूपये वर्षाला पाणीपट्टी गोळा केली जाते.

**तक्ता क्र. ४४ : पिण्याच्या पाण्याच्या सोयीबद्दल समाधान**

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| समाधानी आहे | २२ | १५ | ९ | १२ | ५८ |
| % | ५०% | ३२% | १८.४% | २७% | ३१.४% |
| समाधानी नाही | २२ | ३२ | ४० | ३३ | १२७ |
| % | ५०% | ६८% | ८१.६% | ७३% | ६८.६% |

वरील तक्त्यामध्ये सर्वेक्षित गावांपैकी किती गावे पिण्याच्या पाण्याच्या सोयीबद्दल समाधानी आहेत ते दर्शविले आहे.

मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध असलेल्या छत्रपूर जिल्ह्यात ५०% गावे समाधानी आहेत. तर अन्य जिल्ह्यांमध्ये समाधानतेचे प्रमाण - धार (३२%), पन्ना (२७%) आणि इंदोर (१८%) असे आहे.

जी गावे समाधानी नाहीत त्यांना पिण्याच्या पाण्याचे नविन स्त्रोत अथवा अधिक स्त्रोत पाहिजेत किंवा आहे त्या स्त्रोतांमध्ये सुधारणा करून पाहिजे.

ग्रामीण मध्यप्रदेशाचा विचार केला तर तेथील ३१% गावे पिण्याच्या पाण्याच्या सोयीबद्दल समाधानी तर ६९% गावे असमाधानी आहेत.

## तक्ता क्र. ४५ : गावातील अंतर्गत रस्त्याच्या बाजूची गटारे

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| गटारे अजिबात नाहीत | ३९ | २९ | ३९ | ४० | १४७ |
| % | ८८.६% | ६१.७% | ७९.६% | ८८.९% | ७९.५% |
| थोड्या प्रमाणात आहेत | ५ | ९ | ५ | ५ | २४ |
| % | ११.४% | १९.२% | १०.२% | ११.१% | १३% |
| संपूर्ण गावात आहेत | ० | ९ | ५ | ० | १४ |
| % | ०% | १९.२% | १०.२% | ०% | ७.६% |

गावातील पावसाचे पाणी व सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी गावात अंतर्गत रस्त्याच्या बाजूला गटारे आहेत का असा प्रश्न प्रश्नावलीत विचारला होता.

अंतर्गत रस्त्याच्या बाजून गटारे नसणाऱ्या गावांची संख्या फार मोठी आहे. छत्रपूर (८९%), पन्ना (८९%), इंदोर (८०%), धार (६२%).

काही गावांमध्ये गटारे थोड्या प्रमाणात म्हणजे एक-दोन रस्त्यांच्या बाजूने उपलब्ध होती. अशा गावांची जिल्हावार टक्केवारी पुढीलप्रमाणे - धार (१९%), छत्रपूर व पन्ना (११%), इंदोर (१०%).

तर धार जिल्ह्यातील ९ गावातून (१९%) आणि इंदोर मधील ५ गावातून (१०%) संपूर्ण गावात रस्त्याच्या कडेने गटारे उपलब्ध होती. छत्रपूर व पन्ना जिल्ह्यामध्ये मात्र असे एकही गाव आढळले नाही.

मध्यप्रदेशमधील गावांचे अंतर्गत बाजूने गटार उपलब्धीनुसार पुढीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल- गटारे अजिबात नाहीत (८०%), थोड्या प्रमाणात आहेत (१३%), संपूर्ण गावात आहेत (८%).

> *"पानी की समस्या सुलझाने के लिए हमनें मुख्यमंत्रीजी तक शिकायत की लेकिन कुछ फायदा नही हुआ। अब आप ही बताइये के हम क्या करे?"*
>
> - ग्रामस्थ, भंवरगढ, जि. इंदोर

तक्ता क्र. ४६ : घरातील सांडपाण्याच्या निचऱ्याची व्यवस्था

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| निचऱ्याची व्यवस्था नाही | ३५ | ३५ | ४२ | ३६ | १४८ |
| % | ७९.६% | ७४.५% | ८५.७% | ८०% | ८०% |
| शोष खड्डे/साठवण खड्डे | ७ | ० | ४ | ९ | २० |
| % | १५.९% | ०% | ८.२% | २०% | १०.८% |
| गटारे | २ | १२ | २ | ० | १६ |
| % | ४.६% | २५.५% | ४.१% | ०% | ८.७% |
| परसबागेत निचरा | ० | ० | १ | ० | १ |
| % | ०% | ०% | २% | ०% | ०.५% |

सर्वेक्षित गावातील घरामधून बाहेर पडणाऱ्या सांडपण्याच्या निचऱ्याची व्यवस्था कशा प्रकारे केली जाते याची कल्पना वरील तक्त्यावरून येते.

सांडपाण्याच्या निचऱ्याची व्यवस्था नसलेली गावे बहुसंख्येने आहेत - इंदोर (८६%), पन्ना (८०%), छत्रपूर (८०%), धार (७९%).

काही गावातून सांडपाण्याचा निचरा शोषखड्ड्यात अथवा साठवण खड्ड्यात केला जातो. इंदोर जिल्ह्यात ४ गावामधून (८%) शोषखड्डे बघायला मिळाले. या गावातील युवक पांडुरंगशास्त्री आठवल्यांच्या 'स्वाध्याय' परिवाराच्या प्रभावाखाली आले व त्यांनी शोषखड्डे घराघराबाहेर बांधले.

छत्रपूर (१६%) व पन्ना (२०%)गावातून साठवण खड्डे पहायला मिळतात. घरातले सांडपाणी बाहेरच्या खड्ड्यात साठवले जाते व नंतर या खड्ड्यातले पाणी उपसून गावाबाहेर टाकले जाते.

धार जिल्ह्यातील २६% गावातून गटारे पहायला मिळाली तर छत्रपूर (५%), इंदोर (४%) एवढ्या गावात गटारे होती.

मध्यप्रदेशामध्ये घरातील सांडपाण्याच्या निचऱ्याची गावांमध्ये केली जाणारी व्यवस्था अशी निचऱ्याची व्यवस्था नाही (८०%), शोषखड्डे/साठवण खड्डे (११%), गटारे (९%).

*"गॉव में सडक ही नही है तो नालियॉ कहाँ से आएगी।"*

- ग्रामस्थ, गलोंडा, जि. इंदोर

तक्ता क्र. ४७ : एकूण संडास व त्यांचा वापर

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| गावामध्ये संडास आहेत | ३२ | १९ | ४४ | २७ | ११२ |
| % | ७२.७% | ४०.४% | ८९.८% | ६०% | ६०.५% |
| गावामध्ये संडास नाहीत | १२ | २८ | ५ | २८ | ७३ |
| % | २७.३% | ५९.६% | १०.२% | ४०% | ३९.५% |
| एकूण संडास | ५४८ | ५४९ | ९७७ | १२७ | २२०१ |
| वापरात असलेले संडास | २५८ | ५०८ | ८७७ | ९८ | १७४१ |
| **वापरल्या जाणाऱ्या संडासांची टक्केवारी** | **४७.१%** | **९२.५%** | **८९.८%** | **७७.२%** | **७९.१%** |
| प्रत्येक गावामागे सरासरी संडास | १२ | १२ | २० | ३ | १२ |
| **लोकसंख्या व संडास यांचे गुणोत्तर** | **२२६** | **४८** | **६३** | **२२९** | **९२** |

वरील तक्त्यामध्ये सर्वेक्षित गावांमधून असलेले संडास व त्यांचा वापर यासंबंधीची आकडेवारी दिली आहे.

एका पेक्षा जास्त सार्वजनिक अथवा खाजगी संडास असलेली बहुतांश गावे सर्वेक्षित जिल्ह्यात आढळून आली. इंदोर (९०%), छत्रपूर (७३%), पन्ना (६०%), धार जिल्ह्यात सर्वात कमी म्हणजे ४०% गावातून संडास आढळून आले.

इंदोर जिल्ह्यामध्ये प्रत्येक गावात सरासरी २० संडास होते तर धार व छत्रपूर जिल्ह्यात सरासरी १२ संडास दिसले. पन्ना जिल्ह्यात मात्र प्रत्येक गावामागे सरासरी ३ संडासच असल्याचे बघायला मिळाले.

> *"गाव के कुछ लडके पांडुरंगशास्त्री आठवलेजी के स्वाध्याय परिवार में कुछ महिनों के लिए शामिल हुए थे। वहाँ से प्रशिक्षण पाकर उन्होंने गाव में शोष गढ्ढे बनवाए।"*
>
> \- ग्रामस्थ, गलोंडा, जि. इंदोर

गावामध्ये केवळ संडास असून उपयोग नाही तर सार्वजनिक स्वच्छतेच्या हितासाठी त्याचा वापर होणे देखील अत्यावश्यक आहे.

वापरल्या जाणाऱ्या संडासांची टक्केवारी बघितली असता असे दिसते की संडासांचा वापर धार जिल्ह्यात सर्वाधिक म्हणजे ९३% इतका होतो तर त्या खालोखाल इंदोर (९०%) जिल्हयात होतो. पन्ना (७९%) व छत्रपूर (४७%) असा वापर आहे.

सर्वेक्षित गावातील लोकसंख्या व संडास यांचे गुणोत्तर काढले असता असे दिसते की - धार जिल्ह्यात १ संडासाचा वापर ४८ लोक तर इंदोरमध्ये ६३ लोक करताना दिसतात. छत्रपूर व पन्ना जिल्ह्यामध्ये हेच प्रमाण अनुक्रमे २२६ व २२९ एवढे आहे.

संडासांच्या बाबतीत असे दिसते की छत्रपूर व पन्ना जिल्ह्यामध्ये अधिक संडास बांधण्याचे व त्यांचा वापर वाढविणे गरजेचे आहे. धार व इंदोर जिल्ह्याची त्यामानाने समाधानकारक स्थिती म्हणता येईल.

मध्यप्रदेशामध्ये सुमारे ६१% गावामधून एका पेक्षा जास्त संडास असून प्रत्येक गावामध्ये सरासरी १२ संडास आहेत. एकूण संडासांपैकी ७९% संडासांचा वापर केला जातो. एका संडासाचा सरासरी ९२ लोक वापर करतात.

**तक्ता क्र. ४८ : संडास बांधकामास अर्थसहाय्य**

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| गैरलागू | ११ | २६ | ५ | २७ | ६९ |
| % | २५% | ५५.३% | १०.२% | ६०% | ३७.३% |
| पंचायत समिती | ४ | ४ | ३ | २ | १३ |
| % | ९.१% | ८.५% | ६.१% | ४.४% | ७% |
| ग्रामपंचायत व व्यक्ती | ७ | ० | ० | २ | ९ |
| % | १५.९% | ०% | ०% | ४.४% | ४.९% |
| वैयक्तिक | २२ | १७ | ४१ | १४ | ९४ |
| % | ५०% | ३६.२% | ८३.७% | ३१.१% | ५०.८% |

मध्यप्रदेशमधील ज्या ज्या गावांमधून संडास उपलब्ध आहेत त्या बहुतांश ठिकाणी लोकांनी वैयक्तिक पैशातूनच संडास बांधले आहेत- इंदोर (८४%) गावे, छत्रपूर (५०%), धार (३६%) आणि पन्ना (३१%).

पंचायत समितीने फार थोड्या गावातील संडासांना अर्थसहाय्य केले आहे - छत्रपूर व धार (९%), इंदोर (६%), पन्ना (४%). छत्रपूर जिल्ह्यातील ७ गावातून (१६%) आणि पन्ना (४%) गावातून काही संडास ग्रामपंचायत वैयक्तिक अशा दोघांच्या संयुक्त प्रयत्नातून बांधण्यात आले आहेत.

अशा प्रकारे मध्यप्रदेशामध्ये ५१% गावातील संडास बांधण्यास लोकांनी स्वतः पैसे खर्च केले तर ७ऽ गावातून पंचायत समितीने आर्थिक मदत केली. ५% गावातून ग्रामपंचायत व व्यक्तींनी संयुक्त प्रयत्नातून संडास बांधले आहेत.

**तक्ता क्र. ४९ : मलनिःसारणाची सोय**

| **जिल्हा** | **छत्रपूर** | **धार** | **इंदोर** | **पन्ना** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|
| **एकूण सर्वेक्षित गावे** | **४४** | **४७** | **४९** | **४५** | **१८५** |
| गैरलागू | १२ | ३२ | ५ | २७ | ७६ |
| % | २७.३% | ६८.१% | १०.२% | ६०% | ४१.१% |
| सेप्टिक टँक | ३१ | १५ | ४४ | १७ | १०७ |
| % | ७०.५% | ३१.९% | ८९.८% | ३७.८% | ५७.८% |
| खड्डा | १ | ० | ० | १ | २ |
| % | २.२% | ०% | ०% | २.२% | १.१% |

वरील तक्त्यामध्ये मलनिःसारणाच्या सोयीचे विवरण दिले आहे. ज्या गावात संडास नाहीत अथवा उत्तर मिळाले नाही अशी गावे गैरलागू या वर्गात घातली आहेत. बहुतांश म्हणजे सुमारे ५८% गावांमधील संडास सेप्टिक टँकला जोडलेले आहेत. तर केवळ १% गावातील मैला खड्ड्यामध्ये साठवला जातो.

## तक्ता क्र. ५० : पावसाळ्यातील मुख्य समस्या

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| चिखलाने भरलेले रस्ते | ३१ | ३७ | ४३ | ३० | १४१ |
| % | ७०.५% | ७८.७% | ८७.८% | ६६.७% | ७६.२% |
| डासांचा प्रादुर्भाव | ३६ | २ | २८ | ४४ | ११० |
| % | ८१.८% | ४.३% | ५७.१% | ९७.८% | ५९.५% |
| संडास नसल्याने गैरसोय | २५ | २ | ३० | २४ | ८१ |
| % | ५६.८% | ४.३% | ६१.२% | ५३.३% | ४३.८% |
| अशुद्ध पिण्याचे पाणी | १२ | ७ | १० | १० | ३९ |
| % | २७.३% | १४.९% | २०.४% | २२.२% | २१.१% |
| सार्वजनिक स्वच्छतेचा अभाव | ४ | ४ | १ | ० | ९ |
| % | ९.१% | ८.५% | २% | ०% | ४.९% |
| कोणतीही समस्या नाही | १ | ६ | २ | ० | ९ |
| % | २.३% | १२.८% | ४.१% | ०% | ४.९% |

पावसाळ्यामध्ये उद्‌भवणाऱ्या मुख्य समस्यांविषयी लोकांनी दिलेली माहिती वरील तक्त्यामध्ये देण्यात आली आहे.

मध्यप्रदेशामध्ये गावातील अंतर्गत व बाह्य रस्ते बहुतांशपणे कच्चेच असून त्यांची अवस्था अत्यंत खराब आहे हे आपण पाहिले आहे. पावसाळ्यामध्ये पाणी साचून व चिकणमातीमुळे रस्त्यावर दलदल निर्माण होते, त्यात गावातून ट्रक्टर ये - जा करत असल्याने खड्डे देखील निर्माण होतात. रस्त्यावरून चालणे अवघड होऊन बसते. म्हणूनच सर्व जिल्ह्यातील बहुसंख्य गावांनी चिखलाने भरलेले रस्ते ही पावसाळ्यातील मुख्य समस्या आहे. जिल्हावार गावांची आकडेवारी पुढीलप्रमाणे -इंदोर (८८%), धार (७९%), छत्रपूर (७१%), पन्ना (६७%).

गावांमध्ये चिखल होत असल्याने व पाणी साठून रहात असल्याने डासांचा प्रादुर्भाव देखील होणे सहाजिकच आहे. पन्ना (९८%), छत्रपूर (८२%) या जिल्ह्यातील गावांमध्ये ही समस्या असल्याने प्रकर्षाने जाणवले. तसेच इंदोर मधील ५७% गावातून पावसाळ्यात डास फार होतात असे सांगण्यात आले.

शौचासाठी लोक गावाबाहेर जातात. पावसाळ्यात शेतात पिके असल्याने चिखल असलेल्या

रस्त्यावरच लोकांना शौचासाठी बसावे लागते. त्यामुळे लोकांची खास करून महिलांची अत्यंत गैरसोय होते असे इंदोर (६१%), छत्रपूर (५७%), पन्ना (५३%) या जिल्ह्यातील गावांमधून लोकांनी सांगितले.

पावसाळ्यामध्ये अशुद्ध पिण्याचे पाणी मिळत असल्याची तक्रार काही गावातून करण्यात आली- छत्रपूर (२७%), पन्ना (२२%), इंदोर (२०%), धार (१५%).

याशिवाय पावसाळ्यामध्ये गावात सार्वजनिक स्वच्छतेचा अभाव असतो त्यामुळे साथीचे आजार पसरतात असे छत्रपूर (९%) व धार (९%) गावातून लोकांनी सांगितले.

मध्यप्रदेशमधील गावातून पावसाळ्यामध्ये असणाऱ्या मुख्य समस्या पुढीलप्रमाणे देता येतील - चिखलाने भरलेले रस्ते (७६%), डासांचा प्रादुर्भाव (६०%), संडास नसल्याने लोकांची विशेषतः महिलांची गैरसोय (४४%), अशुद्ध पिण्याचे पाणी (२१%), सार्वजनिक स्वच्छतेचा अभाव (५%).

**तक्ता क्र. ५१ : पाण्याची समस्या सोडवण्यासाठी उपाययोजना**

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| नळ पाणीपुरवठा योजना | १३ | १७ | २९ | १४ | ७४ |
| % | २९.६% | ३६.२% | ६१.२% | ३१.१% | ४०% |
| साठवण टाकी बांधणे | ९ | ९ | २५ | २ | ४५ |
| % | २०.५% | १९.२% | ५१% | ४.४% | २४.३% |
| नविन विहिरी/हातपंप | ५ | १४ | ११ | १४ | ४० |
| % | ११.४% | २९.८% | २२.५% | ३१.१% | २३.८% |
| कूपनलिकेवर हातपंप | ९ | २ | ६ | ८ | २५ |
| % | २०.५% | ४.३% | १२.२% | १७.८% | १३.५% |
| विहिरीवर पंप बसवणे | १ | ५ | ४ | ० | १० |
| % | २.३% | १०.६% | ८.२% | ०% | ५.४% |
| विहिरीची खोली वाढवणे | १ | ४ | ३ | २ | १० |
| % | २.३% | ८.५% | ६.१% | ४.४% | ५.४% |
| पंपासाठी नियमित वीजपुरवठा | ० | १ | १ | ० | २ |
| % | ०% | २.१% | २% | ०% | १.१% |
| सूचना न केलेली गावे | १८ | १३ | ५ | १२ | ४७ |
| % | ४०.९% | २७.७% | १२.२% | २६.७% | २६.५% |

पिण्याच्या पाण्याचा आपल्या गावातील प्रश्न कशाप्रकारे सोडवता येऊ शकेल यासाठी लोकांनी काही उपाय योजना सुचवल्या आहेत. ग्रामस्थांच्या या सूचना वरील तक्त्यामध्ये बघायला मिळतात.

मध्यप्रदेशमध्ये नळ पाणीपुरवठा नसलेली ७२% गावे आहेत. या सर्व गावांना हातपंप व विहिरीद्वारे पिण्याचे पाणी उपलब्ध होते. पावसाळ्यात अशुद्ध, पिण्याचे पाणी मिळते या सर्व गोष्टी आकडेवरीसहित आपण यापूर्वीच्या तक्त्यातून पाहिल्या आहेत. याला उत्तर म्हणूनच की काय बऱ्याच गावातून नळपाणीपुरवठा योजना गावामध्ये उभारण्याची मागणी करण्यात आली आहे. अशा गावांची जिल्हावार टक्केवारी पुढीलप्रमाणे - इंदोर (६१%), धार (३६%), पन्ना (३१%), छत्रपूर (३०%).

मध्यप्रदेशमध्ये ज्या ठिकाणी नळपाणीपुरवठा योजना आहेत त्या गावातून कूपनलिकेतून पाणी पंपाद्वारे खेचून सार्वजनिक नळाद्वारे पाणी पुरवले जाते. वीज खात्याचा कारभार बेभरवशाचा झाला आहे. त्यामुळे वीज येईल तेव्हा वेळी अवेळी बऱ्याच वेळा रात्री ९-१० वाजता लोकांना पाणी भरावे लागते तर कधी कधी २-३ दिवस वीजच आली नाहीतर पाणी पुरवठाच करता येत नाही म्हणून बऱ्याच गावातील लोकांनी पाण्याची साठवण टाकी बांधण्याची सूचना केली आहे. जेणेकरून थोडाफार नियमित पाणीपुरवठा करता येईल. अशी गावे पुढीलप्रमाणे - इंदोर (५१%), छत्रपूर (२१%), धार (१९%), पन्ना (४%).

नविन विहिर खोदून द्यावी अथवा आणखी एखादा हातपंप बसवावा ज्यामुळे लोकांची पाण्याची समस्या सुटू शकेल असा उपाय काही गावांनी सुचवला पन्ना (३१%), धार (३०%), इंदोर (२२%), छत्रपूर (११%).

कूपनलिकेवर हातपंप बसवून पाण्याची सोय करावी अशी मागणी छत्रपूर (२१%), पन्ना (१८%), इंदोर (१२%) व धार (४%) गावातून करण्यात आली.

याशिवाय सध्या असलेल्या विहिरीची खोली वाढवणे, विहिरीवर पंप बसवून पाणीपुरवठा करणे, नळ पाणीपुरवठा योजनेतील पंपासाठी नियमितपणे वीजपुरवठा करणे असे उपाय देखील लोकांनी सुचवले.

पाणी पुरवठा सुधारण्यासाठी मध्यप्रदेशातील गावांच्या मागण्या पुढीलप्रमाणे देता येतील- नळ पाणीपुरवठा योजना (४०%), पाण्यासाठी साठवण टाकी बांधणे (२४%), नविन विहिरी खोदणे व नविन हातपंप बसवणे (२४%), कूपनलिकेवर हातपंप (१४%), विहिरीवर पंप बसवणे (५%), सध्याच्या विहिरींची खोली वाढवणे (५%), पाणीपुरवठा योजनेसाठी अखंडित वीज पुरवठा (१%).

## क्षेत्र सुधारणा प्राधान्यता

आत्तापर्यंत आपण रस्ते व वाहतूक, दूरसंचार, विद्युत, पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता या चार मूलभूत क्षेत्रांमध्ये मध्यप्रदेशातील गावातून काय परिस्थिती आहे, लोकांना काय काय अडचणी आहेत, व त्याचबरोबर या क्षेत्रामध्ये सुधारणा करण्यासाठी लोकांनी कोणकोणत्या उपाय योजना सुचवल्या आहेत ते बघितले.

या चार क्षेत्रांपैकी सर्वप्रथम तुमच्या गावामध्ये कोणत्या क्षेत्रात सुधारणा घडून याव्यात व त्यांचा क्रम काय असावा असा प्रश्न लोकांना सर्वात शेवटी विचारण्यात आला. लोकांनी आपल्या गावातील स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन या चार क्षेत्रांची प्राधान्यता ठरवली. त्यासंबंधीची माहिती पुढील तक्त्यांमधून देण्यात आली आहे. ही प्राधान्यता गाव, तालुका व जिल्हा पातळीवर भिन्न असल्याचे आढळते मात्र त्या सर्वांचा कल लक्षात घेऊन मध्यप्रदेशासाठी प्राधान्याचा क्रम सर्वात शेवटी दिला आहे.

### तक्ता क्र. ५२ : गावामधील चार क्षेत्रांच्या सुधारणेसाठीचा प्राधान्यक्रम

(अ) पहिली प्राधान्यता

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता | ४ | ९ | ११ | १४ | ३८ |
| % | ९.१% | १९.२% | २२.५% | ३१.१% | २०.५% |
| वीज पुरवठा | १३ | २१ | ३२ | २० | ८६ |
| % | २९.६% | ४४.७% | ६५.३% | ४४.४% | ४६.५% |
| रस्ते सुधारणा | २७ | १६ | ६ | ११ | ६० |
| % | ६१.४% | ३४% | १२.२% | २४.४% | ३२.४% |
| दूरध्वनी | ० | १ | ० | ० | १ |
| % | ०% | २.१% | ०% | ०% | ०.५% |

पहिल्या प्राधान्यतेचा क्रम जिल्ह्यानुसार बदलत असल्याचे दिसते.

छत्रपूर जिल्ह्यामध्ये लोकांनी सर्वप्रथम प्राधान्य रस्ते सुधारणेला दिला आहे. तेथील २७ गावांनी (६१%) हा कौल दिला आहे. धार जिल्ह्यामध्ये वीजपुरवठा का रस्ते सुधारणा असा संभ्रम गावकऱ्यांच्या मनात असल्याचे दिसते. तरीदेखील तेथे सुमारे ४५% गावांनी वीजपुरवठा नियमित होण्याच्या बाजूने मत व्यक्त केले आहे. इंदोर जिल्ह्यातील लोकांनी निःसंदिग्धपणे (६५%) वीज पुरवठा व्यवस्थेत सर्वप्रथम सुधारणा होणे आवश्यक असल्याचे सांगितले आहे. पन्ना जिल्ह्यातील गावे दूरध्वनी सोडून अन्य तीन क्षेत्रांच्या सुधारणेची मागणी करताना दिसतात. तरी तेथील सर्वात जास्त २० गावांनी (४४%) वीजसुधारणेला प्राधान्य दिले आहे.

मध्यप्रदेशातील वीज पुरवठ्याची परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. म्हणूनच तेथील ४७% गावांनी सर्वप्रथम वीज पुरवठा व्यवस्थेत बदल व्हावा अशी आग्राची मागणी केल्याचे दिसते.

## (ब) दुसरी प्राधान्यता

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता | १२ | ११ | १५ | १२ | ५० |
| % | २७.३% | २३.४% | ३०.६% | २६.७% | २७% |
| वीज पुरवठा | १५ | १७ | १० | १७ | ५९ |
| % | ३४.१% | ३६.२% | २०.४% | ३७.८% | ३१.९% |
| रस्ते सुधारणा | १२ | १६ | २३ | १६ | ६७ |
| % | २७.३% | ३४% | ४६.९% | ३५.६% | ३६.२% |
| दूरध्वनी | ५ | ३ | १ | ० | ९ |
| % | ११.४% | ६.४% | २% | ०% | ४.९% |

छत्रपूर जिल्ह्यामध्ये दुसरी प्राधान्यता ठरवताना लोकांना ठामपणे कुठल्याही क्षेत्रात सुधारणेचे नाव सुचवता आले नसले तरी तेथील १५ गावांनी (३४%) वीज पुरवठा क्षेत्राला दुसरी प्राधान्यता दिली आहे.

धार जिल्ह्यात गावांनी दुसरे प्राधान्य रस्ता सुधारणेला दिले आहे असेच म्हणावे लागेल (कारण तेथील गावांनी यापूर्वीच वीज सुधारणेसाठी अग्रक्रम दिला आहे) पन्ना जिल्ह्यात देखील हीच परिस्थिती आहे. इंदोर जिल्ह्यातील ४७% गावांनी रस्ते सुधारणेला दुसरा अग्रक्रम दिला आहे.

एकंदरित मध्यप्रदेशचा विचार केला तर ३६% गावांनी गावातील अंतर्गत व बाह्य रस्ता सुधारणेला दुसरी प्राधान्यता दिली आहे.

## (क) तिसरी प्राधान्यता

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| **एकूण सर्वेक्षित गावे** | **४४** | **४७** | **४९** | **४५** | **१८५** |
| पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता | १२ | १२ | १८ | १२ | ५४ |
| % | २७.३% | २५.५% | ३६.७% | २६.७% | २९.२% |
| वीज पुरवठा | १४ | ९ | ६ | ७ | ३६ |
| % | ३१.८% | १९.२% | १२.२% | १५.६% | १९.५% |
| रस्ते सुधारणा | ५ | १२ | १७ | १८ | ५२ |
| % | ११.४% | २५.५% | ३४.७% | ४०% | २८.१% |
| दूरध्वनी | १३ | १४ | ८ | ८ | ४३ |
| % | २९.६% | २९.८% | १६.३% | १७.८% | २३.२% |

पहिली व दुसरी प्राधान्यता सर्व जिल्ह्यांनी वीज पुरवठा व रस्ते सुधारणेला दिली असली तरी देखील बऱ्याच गावांनी या दोन क्षेत्रांना तिसरे प्राधान्य दिल्याचे दिसते. म्हणूनच यापूर्वीचे जिल्ह्यासाठी ठरलेले दोन प्राधान्यक्रम लक्षात घेतले तर सर्व जिल्ह्यांनी पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता क्षेत्रास तिसरे प्राधान्य दिल्याचे स्पष्टपणे दिसते.

मध्यप्रदेशासाठी देखील पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता ही तिसरी प्राधान्यता आहे.

(ड) चौथी प्राधान्यता

| जिल्हा | छत्रपूर | धार | इंदोर | पन्ना | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४४ | ४७ | ४९ | ४५ | १८५ |
| पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता | १६ | १५ | ५ | ७ | ४३ |
| % | ३६.४% | ३१.९% | १०.२% | १५.६% | २३.२% |
| वीज पुरवठा | २ | ० | १ | १ | ४ |
| % | ४.६% | ०% | २% | २.२% | २.२% |
| रस्ते सुधारणा | ० | ३ | ३ | ० | ६ |
| % | ०% | ६.४% | ६.१% | ०% | ३.२% |
| दूरध्वनी | २६ | २९ | ४० | ३७ | १३२ |
| % | ५९.१% | ६१.७% | ८१.६% | ८२.२% | ७१.४% |

सर्व जिल्ह्यातील बहुतांश गावांनी दूरध्वनी सेवेला सर्वात शेवटचे म्हणजे चौथे प्राधान्य दिले आहे. कारण लोकांच्या दृष्टीने बाकी तीन क्षेत्रांमध्ये सुधारणा होणे अत्यावश्यक आहे, दूरध्वनी असला, नसला तरी त्यांच्या जीवनात फारसा फरक पडणार नाही.

मध्यप्रदेशमध्ये १३२ गावांनी (७१%) दूरध्वनी क्षेत्राला चौथी प्राधान्यता दिली आहे.

अशा प्रकारे मध्य प्रदेशमधील ग्रामीण भागातील उपरोक्त चार क्षेत्रातील सुधारणांचा प्राधान्यता क्रम पुढीलप्रमाणे देता येईल.

**१) वीज पुरवठा**
**२) रस्ते सुधारणा**
**३) पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता**
**४) दूरध्वनी**

❑❑❑

# ❖ समारोप ❖

आत्तापर्यंत आपण मध्यप्रदेशातील धार, इंदोर, छत्रपूर व पन्ना या चार जिल्ह्यातील पायाभूत सोयीसुविधांचा अभ्यास केला, तुलनात्मक आकडेवारी बघितली. एकूणच सर्वच क्षेत्रांमध्ये सर्वच जिल्ह्यांमध्ये मागासलेपण असल्याचे जाणवते. त्यातल्या त्यात इंदोर जिल्ह्याची परिस्थिती बरी म्हणायची.

मध्यप्रदेशामध्ये ग्रामीण भागात राज्य परिवहन मंडळाच्या बसेस अभावानेच आढळतात. खाजगी बससेवा उपलब्ध असली तरी ती ठराविक मार्गांवरच उपलब्ध आहे. हमरस्त्यापासून आत वसलेल्या गावांसाठी वाहतुकीची साधने उपलब्ध नाहीत. सर्वच जिल्ह्यांमधून प्रवासी वाहतुकीसाठी प्रति किलोमीटर जवळजवळ सारखाच खर्च येतो. पन्ना व इंदोर जिल्ह्यातच मालवाहतुकीसाठी कमी खर्च येतो तर धार जिल्ह्यात सर्वात जास्त खर्च होताना दिसतो.

अंतर्गत व बाह्य रस्त्यांची स्थिती सर्वच जिल्ह्यात सारखीच आहे. बहुतेक ठिकाणी रस्ते कच्चा व खराब किंवा अतिशय खराब अशा वर्गवारीतच मोडतात. रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती होत असल्याचे आढळून आले नाही. सर्वच जिल्ह्यातून रस्ते बांधणीच्या कामात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असल्याचे सांगण्यात आले.

ज्या ज्या गावातून अंतर्गत वा बाह्य रस्त्यांची कामे झाली आहेत तेथे गावातील उच्च जातीय, प्रतिष्ठित व श्रीमंत यांच्या वस्तीतच वा वस्तीपर्यंत सुधारणा झाल्याचे दिसते. गावकुसाबाहेर राहणाऱ्या आदिवासी, हरिजन वा इतर मागासवर्गीयांच्या वस्तीपर्यंत रस्ते पोहोचले असल्याचे चित्र अभावानेच बघायला मिळाले.

दूरध्वनी क्षेत्रामध्ये, सर्वच जिल्ह्यांमधून दर दोन-तीन गावांमध्ये एक सार्वजनिक दूरध्वनी उपलब्ध होता. हे सार्वजनिक दूरध्वनी अनेकदा गावच्या उच्च जातीय जमीनदाराकडे बसवले असल्याचे पहायला मिळाले. त्यामुळे हरिजन व मागासवर्गीय लोकांना अशा दूरध्वनीचा वापर करता येत नाही. छत्रपूर व पन्ना या जिल्ह्यात खाजगी दूरध्वनींची संख्या नगण्यच म्हणावी लागेल. सर्वात जास्त खाजगी दूरध्वनी इंदोर व त्याखालोखाल धार जिल्ह्यात आढळले. दूरध्वनी सेवा खंडित होण्याचे प्रमाणदेखील बरेच आहे. मोबाईल दूरध्वनी व इंटरनेटबद्दल सर्वच जिल्ह्यातील लोक अनभिज्ञ असल्याचे दिसते. अपवाद फक्त धार जिल्ह्याचा. या जिल्ह्यात 'ज्ञानदूत' हा इंटरनेटचा प्रकल्प सुरू असल्याने थोड्या प्रमाणात लोकांना त्याबद्दलची माहिती आहे.

विजेच्या बाबतीत एकूण मध्यप्रदेशातील स्थिती अतिशय गंभीर आहे. धार व इंदोर या जिल्ह्यात सर्वात जास्त घरातून वीज पोहोचली आहे, त्यामानाने छत्रपूर व पन्ना येथे कमी घरातून वीज

उपलब्ध आहे. धारचा अपवाद वगळता इतर सर्वच जिल्ह्यातून अनधिकृतपणे विना मीटर वीज जोड घेणाऱ्यांची संख्या जवळजवळ निम्म्यापेक्षा जास्त आहे.

दर दिवसाच्या, आठवड्याच्या व पावसाळ्यातील तीन महिन्यातील वीज उपलब्धतेनुसार क्रम लावला तर धार व इंदोर जिल्ह्यात सर्वात जास्त तर छत्रपूर व पन्ना येथे सर्वात कमी वीज उपलब्ध होत असल्याचे दिसते. पन्ना जिल्ह्यात तर परिस्थिती अतिशय गंभीर आहे. असे असले तरी छत्रपूर व पन्ना जिल्ह्यात नविन घरगुती वीजजोड घेताना फारच थोड्या गावातून लाच घ्यावी लागते. या लाचेचे प्रमाण सर्वात जास्त इंदोर व त्याखालोखाल धार जिल्ह्यात आहे. विजेच्या बाबतीत देखील जातीभेद दिसून येतो. हरिजन वस्तीपर्यंत विजेचे खांब अनेक गावातून पोहोचलेले नाहीत.

धार व इंदोर जिल्ह्यात निम्म्यापेक्षा जास्त गावांना नळपाणीपुरवठा योजना झाल्या आहेत. तर छत्रपूर व पन्ना जिल्ह्यात अशा योजना जवळजवळ नाहीतच, अपवाद फक्त दोन तीन गावांचा. सर्व जिल्ह्यातून हातपंप उपलब्धतेचे प्रमाण जवळजवळ सारखे आहे. मात्र छत्रपूर व पन्ना जिल्ह्यात हातपंप बंद असण्याचे प्रमाण कमी आहे. आदिवासी बहुल अशा धार जिल्ह्यात जवळजवळ निम्मे नादुरूस्त आहेत. छत्रपूर व पन्ना जिल्ह्यात भूजल पाण्याची पातळी बरीच वर असल्याने तेथे बाराही महिने पाणी उपलब्ध असते. धार व इंदोर जिल्ह्यात काही गावांना उन्हाळ्यात पाणी टंचाई जाणवते. अशा गावातील लोकांना उन्हाळ्यात पाणी खरेदी करावे लागते.

धार व इंदोर जिल्ह्यात काही प्रमाणात अंतर्गत रस्त्याच्या बाजूने गटारांचे काम झालेले आहे. इंदोर जिल्ह्यात सर्वात जास्त संख्येने संडास असून त्यांच्या वापराचे प्रमाणदेखील मोठे आहे. धार जिल्ह्यात अत्यंत कमी संडास आहेत मात्र त्यातील बहुतेक सर्व संडासाचा वापर केला जातो. छत्रपूर जिल्ह्यात एकूण संडासांपैकी केवळ निम्मेच संडास वापरले जातात.

इतर पायाभूत क्षेत्रांप्रमाणेच गावातील गटारे, संडास वगैरे साठीच्या शासकीय योजनांचा लाभ उच्च जातीच्या लोकांनीच घेतलेला दिसतो. आदिवासी व हरिजन कुटुंबे या लाभापासून वंचितच राहिलेली दिसतात.

वरील चर्चेवरून असे लक्षात येते की इंदोर जिल्ह्यातच पायाभूत सोयीसुविधांचा विकास बऱ्यापैकी झालेला दिसतो. आदिवासी बहुल धार जिल्हा तसेच अनुसूचित जमातींची मोठ्या प्रमाणावर (सुमारे २५%) वस्ती असलेले छत्रपूर व पन्ना तुलनेने खूपच मागास राहिले आहेत.

इंदोर ही होळकरांची राजधानी होती. मध्य भारतातले एक महत्त्वाचे शहर व व्यापाराचे केंद्र म्हणून इंदोरची ओळख होती. स्वातंत्र्योत्तर काळात इंदोर व आसपासच्या ग्रामीण भागात औद्योगिक केंद्रे निर्माण झाली. कृषी क्षेत्रात देखील प्रगती होऊन गहू, सोयाबीन, हरभरा यासारखी नगदी पिके

तेथे घेतली जाऊ लागली. त्यामुळे या भागात समृद्धता आली. जातीव्यवस्थेचा पगडा असला तरीदेखील विकास प्रकिया ग्रामीण भागापर्यंत पोहोचली.

धार संस्थानावर पवारांचे राज्य होते. छत्रपूर व पन्ना जिल्ह्यात अनेक छोटी छोटी संस्थाने होते. स्वातंत्र्योनंतर जरी ही संस्थाने भारतात बिलीन करण्यात आली. तरीदेखील तीच परंपरा कायम राहिली. सरंजामशाहीची जागा नोकरशाहीने घेतली. मोठ्या जमीनदारांनी नोकरशाहीला ताब्यात ठेवल्याने तसेच जातीव्यवस्था कायम राहिल्याने विकासाची प्रक्रिया जनसामान्यापर्यंत वा आदिवासी आणि हरिजनांपर्यंत पोहोचू शकली नाही. या तीन जिल्ह्यात कृषी क्षेत्रात सुधारणा झाल्याचे दिसत नाही. येथील राजकारण जातीपातीवर आधारित असल्याने लोकप्रतिनिधी विकासाच्या कामाला गती देण्यात असमर्थ ठरले. या सर्व गोष्टींचा एकत्रित परिणाम म्हणजे या जिल्ह्यात असलेले मागासलेपणा.

पायाभूत सोयीसुविधांचा विचार केला तर त्यात शहरी-ग्रामीण, जिल्ह्या-जिल्ह्यात, तालुक्या-तालुक्यात भेदाभेद असल्याचे दिसून येते. स्वातंत्र्य मिळून ५५ वर्ष होत आली तरी देखील ग्रामीण भागाचा कायापालट होऊ शकलेला नाही. हिंदी पट्ट्यातील बिहार, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश राजस्थान या राज्यातील चित्र फारच निराशाजनक आहे. नोकरशाहीतील भ्रष्टाचार, जातीभेद या मुख्य कारणांमुळे येथे विकास होऊ शकलेला नाही. विकासाची रूंदावत चाललेली दरी कशी कमी करायची? संतुलित विकास कसा साधायचा? हे प्रश्न आपल्या समोर आहेत.

जागतिकीकरण, खुली अर्थव्यवस्था, खाजगीकरण या सर्व गोष्टींमुळे विकासाची सर्व समीकरणेच बदलू पहात आहेत. अशा परिस्थितीत मागास प्रदेशांचा विकास व त्यातल्या त्यात अशा भागातील आदिवासी व अनुसूचित जातींचा विकास हे एक मोठे आव्हानच आहे.

मध्यप्रदेश व अन्य राज्यातील मागास भागातील पायाभूत सोयीसुविधांचा विकास करण्यासाठी एक नवे धोरण आखणे गरजेचे आहे. त्यासाठी संशोधक, तज्ज्ञमंडळी, नियोजनकर्ते, लोकप्रतिनिधी यांनी एकत्र येऊन प्रारूप आराखडा तयार करावा. हा आराखडा तयार करताना स्थानिक जनतेची मते देखील विचारात घेतली पाहिजेत. तसेच अशा कामांवर देखभाल व देखरेख करण्यासाठी लोक सहभाग घेतला पाहिजे. काम करताना योग्य दर्जा राखला पाहिजे. तसेच भ्रष्टाचार व होण्याची दक्षता घेतली पाहिजे. निर्णय प्रक्रियेचे विकेंद्रीकरण करून पंचायत राज्य संस्थांचा सहभाग वाढवला पाहिजे. तरच विकासाच्या वटवृक्षाची फळे समाजातील तळागाळातील लोकांना चाखायला मिळतील व समृद्ध भारताचे स्वप्न साकार होऊ शकेल.

❑❑❑

## ■ लेखकांसाठी ■

*'हाकारा' त्रैमासिक गेली २३ वर्षे अखंडपणे काढण्यात येत आहे. कै. प्रा. गं. बा. सरदार यांच्या प्रेरणेने सुरू झालेले 'हाकारा' हे मराठी भाषेतील आदिवासी व वंचित समूहांच्या प्रश्नांना वाहिलेले एकमेव नियतकालिक आहे.*

*हाकारामधून आदिवासी, वंचित समुहांचे जीवन, संस्कृती, साहित्य, सण, उत्सव, कला, विकासाचे प्रश्न तसेच आदिवासी व वंचित समुहांमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे अनुभव, संशोधन सेवाभावी व्यक्तींची व्यक्तीचित्रणे याशिवाय आदिवासींसंबंधीच्या कथा, कविता वगैरे सर्व प्रकारच्या लेखनांस प्रसिध्दी दिली जाते. आदिवासी विचारवंत व साहित्यिकांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून द्यावे हेच आमचे ध्येय आहे. आपण आपले साहित्य अवश्य पाठवावे, त्याचे स्वागतच होईल.*

*- संपादक*

**(फॉर्म, ४ नियम ८ नुसार निवेदन)**

| | | |
|---|---|---|
| १. प्रकाशन स्थळ | : | ६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७. |
| २. प्रकाशन काळ | : | त्रैमासिक |
| ३. मुद्रक, प्रकाशक व संपादक | : | रामचंद्र केशव मुटाटकर |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | ६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७. |
| ४. स्वामित्व | : | महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद<br>६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७. |

मी, रा. के. मुटाटकर जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीनुसार व समजुतीनुसार खरा आहे.

३१ जानेवारी २००३

**रा. के. मुटाटकर**
**प्रकाशक**

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन, कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण. शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकत्र व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिक शास्त्र यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यतः आदिवासींबाबत अभ्यासकांना एकत्र आणणे.

मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाचे मूर्त स्वरूप म्हणून 'हाकारा' त्रैमासिक सुरू करण्यात आले आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारून आपणही या कार्यात सहभागी व्हावे. (संस्थांना 'हाकारा' चे केवळ वार्षिक सदस्यत्व मिळेल.)

## महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

- आजीव सभासद ६०० रूपये (फक्त व्यक्तींसाठी)
- 'हाकारा' वार्षिक सभासद ६० रूपये (व्यक्तींसाठी)
- 'हाकारा' वार्षिक सभासद १०० रूपये (संस्थांसाठी)

परिषदेच्या आजीव सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (दि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ॲन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड ड्राफ्ट अथवा मनीऑर्डरने पाठवावी. मनीऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.

**पत्रव्यवहाराचा पत्ता**


**सचिव**

*महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद*

*६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७*

आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा !

Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80





Printed by Jnana Prabodhini Mudran Vibhag, Pune-30.